१९५१८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ७८७



# माझ्या बाई

REFBK-0008893

हेलेन केलर

# माझ्या बाई

## लेखिका : हेलेन केलर

— जिला दृष्टि, वाचा आणि श्रवणशक्ति नाहीं अशा स्त्रीनें—हेलेन केलरनें—लिहिलेलें हें पुस्तक आहे.

— निसर्गानें लादलेल्या आपत्तीशीं झगडून विजयी होणारी जगप्रसिद्ध, अद्वितीय विदुषी हेलेन केलर आणि तिला अंधःकारमय जगांतून बाहेर खेंचून काढून यशाच्या उत्तुंग शिखरावर नेऊन पोंचविणारी तिची अलौकिक कर्तृत्ववान् शिक्षिका ॲन सलिवन मेसी यांच्या जीवनाची ही कथा आयुष्यांत यश मिळवण्यासाठीं महान् आपत्तीशीं झुंज देणाऱ्यांना आणि डोळस असूनहि दुबळेपणानें अंधारांत चांचपडत फिरणाऱ्यांना स्फूर्तिदायक ठरो.

—प्रकाशक

अनुक्रमांक ................ वि: ................
क्रमांक ... ..................... नों: दि: ................
REFBK-0008893

दोन रुपये

कैलास प्रकाशन २.

*

प्रथमावृत्ति

मार्च १९५७

*

वेष्टन

स्टुडिओ डी. जी. जी.

*

: मुद्रक :

त्र्यं. रा. शिगरे,

सर्वोदय मुद्रणालय,

४५० बुधवार, पुणें २.

*

: मूळ लेखिका :

हेलेन केलर

*

मराठींत संपादन

नारायण पुराणिक

*

: प्रकाशक :

कैलास प्रकाशन,

१२ त्रिभुवन रोड,

मुंबई ४.

संग्रहालय ... स्थलप्रत.
वि. ...
नों: दि: ...

# हेलेन आणि तिच्या बाई

*( मूळ पुस्तकाला श्रीमती नेला ब्रॅडी हेनी यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेच्या आधारें )*

हेलेन केलर यांचा जन्म २७ जून १८८० रोजीं तस्कुंबिया (अलाबामा) येथें झाला. जन्मतः त्या अगदीं निरोगी होत्या. पण एकोणीस महिन्यांच्या असतांना त्यांना कसला तरी आजार झाला. (त्या आजाराचें निदान अजूनही झालेलें नाहीं.) त्यामुळें त्यांची दृष्टि गेली व त्यांना ऐकूं येईनासें झालें. ऐकूं येईनासें झाल्यानें बोलण्याची इच्छा त्या अर्भकाचे मनांत तयारच झाली नाहीं व त्याचा परिणाम त्या मुक्या होण्यांत झाला. त्यांचें शरीर एरवीं धडधाकट असलें तरी आंधळ्या, बहिऱ्या आणि मुक्या झाल्यानें त्यांची मनोवस्था नीट कळण्यासारखी नव्हती. कोणी म्हणत ही मुलगी वेडसर आहे. त्यांच्या आईवडिलांना हें पटत नसे. पण आपली मुलगी वेडी नाहीं हें सिद्ध करणें त्यांना शक्य नव्हतें. तिच्यांत बुद्धिमत्ता असली तरी त्या बुद्धिमत्तेपर्यंत पोंचण्याचें साधन नव्हतें. त्यामुळें बाह्य जगाचे सर्व संबंध तुटलेल्या हेलेनची अवस्था, त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर 'जग नसलेल्या जगांत वावरणाऱ्या भुतासारखी' होती.

भविष्याबद्दल कसलीहि आशा न ठेवतां पांच वर्षें ती या 'नसलेल्या जगांत' जगली. एक दिवस तिची आई 'अमेरिकन नोट्स' वाचीत असतां लॉरा ब्रिजमन नांवाच्या हेलेनसारख्याच आंधळ्या व बहिऱ्या असलेल्या मुलीला, डॉ. सॅम्युअल ग्रिडले हॉव यांनीं बोस्टनमधील अंधांच्या पर्किन्स इन्स्टिटयूटमध्यें बोटांच्या हालचालीनें स्पेलिंग करून कसें शिकविलें ह्याची हकीकत तिच्या वाचनांत आली. लॉरा ह्या शिक्षणामुळें, सर्वसामान्य मुलांसारखें इतरांशीं 'बोलूं' शकत होती व 'लिहूं', 'वाचूं' शकत होती. हा प्रयोग डॉक्टरांनीं पन्नास वर्षांपूर्वीं केला होता. शिवाय बोस्टन त्यांच्या घरापासून फारच दूर होतें. म्हणून हेलेनच्या आई-वडिलांनीं ह्याबाबत कांहींच केलें नाहीं. हेलेन सहा वर्षांची झाली तेव्हां तिचे डोळे दाखविण्यासाठीं त्यांनीं तिला बाल्टिमोर येथील एका नेत्रवैद्याकडे नेलें. हेलेन जन्मभर

आंधळी आणि बहिरी राहणार असेंच मत इतर डॉक्टरांचेंप्रमाणें त्यांनीहि दिलें. पण हेलेनला शिक्षण कसें देतां येईल ह्याबद्दल वॉशिंग्टन येथील डॉ. अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल ह्यांच सल्ला घेण्यस सांगितलें. डॉ. बेल, ह्यांच्या सूचनेवरून हेलेनच्य वडिलांनीं-कॅप्टन केलर ह्यांनीं. डॉ.हॉव ह्यांच्या मृत्यूनंतर पर्किन इन्स्टिटयूटचे मुख्य झालेल्या मि. मायकेल ॲनग्नॉस ह्यांना पत्र लिहिलें व त्या पत्राप्रमाणें हेलेनसाठीं कांहीं करतां येईल कीं नाहीं तें पाहण्यासठीं ॲनग्नॉस ह्यांनीं आपल्य संस्थेंत नुकत्याच शिक्षण संपविलेल्या एकवीस वर्षांच्या ॲन् सलिवन मेसीला केलर ह्यांचेकडे पाठविलें.

यशाची अपेक्षा कुणालाच नव्हती. डॉ. हॉव ह्यांनीं लॉराला शिकविण्याचा प्रयोग केला त्याला आतां पन्नास वर्षें झाली होतीं. ह्या अर्धशतकांत बऱ्याच तज्ज्ञांनीं इतर बहिऱ्या व अंध मुलांसाठीं प्रयत्न केले, पण कोणालाच यश आलें नाहीं. ॲनी कांहीं तेवढी मोटी तज्ज्ञ नव्हती व तिलाहि फारसें यश येईलसें वाटत नव्हतें. पण कॅप्टन केलर ह्यांनीं देऊं केलेली नोकरी नाकारण्यासारख्या परिस्थितींत ती नव्हती.

ॲन सलिवन् मेसी हिचा जन्म अमेरिकेंत स्थायिक झालेल्या एका आयरिश कुटुंबांत, फीडिंग हिल्स, मॅसॅशुएट येथें ता. ४ एप्रिल १८६६ रोजीं झाला. त्या काळीं त्या समाजांत आयरिश लोकांना फार कमी प्रतीचें लेखण्यांत येई. ॲनीला कळायला लागल्यापासून डोळे फार दुखत असल्याचें तिला आठवतें. ॲन्‌ची आई तिच्या वयाच्या आठव्या वर्षीच वारली. ॲन्‌ला आणखी दोन भावंडें होतीं. आईच्या मृत्यूनंतर तिचे वडील तिन्ही मुलांना टाकून निघून गेले. त्यांचें काय झालें तें ॲन्‌ला कधींच कळलें नाहीं. ॲन्‌च्या धाकट्या बहिणीला, मेरीला, त्यांच्या नातेवाईकांकडे ठेवण्यांत आलें आणि ॲन् व तिचा सात वर्षांचा धाकटा भाऊ जिमी ह्या दोघांना ट्यूक्सबरीच्या भिक्षागृहांत पाठविण्यांत आलें. ॲन् आंधळी व हूड असल्यानें कामासाठीं उपयोगी नव्हती व जिमीला हाडांचा क्षय झाल्यानें तो लंगडाच होता. दोन्ही मुलें अशीं निरुपयोगी असल्यानेंच त्यांची रवानगी भिक्षागृहांत करण्यांत आली असावी.

१८७६ च्या फेब्रुवारींत हीं दोघें भिक्षागृहांत आलीं व मेमध्यें जिमी चारला. ह्या भिक्षागृहांत ॲन् पुढें चार वर्षें राहिली. बाहेर ती कुणाला नको होती. भिक्षागृहांतील एकानें तिला सांगितलें कीं आंधळ्यांना शिकविण्यासाठीं खास शाळा आहेत. मध्यें किती काळ गेला कोण जाणे, पण तिची शिक्षणाची ओढ वाढत गेली. त्या दारिद्र्यांतून आणि रोगराईतून सुटका करून घेणें मात्र अशक्य होतें. ह्या भिक्षागृहांतील गैरव्यवस्थेचा पुढें इतका गवगवा झाला कीं 'स्टेट बोर्ड ऑफ चॅरिटीज' नें चौकशी समिती नेमली. समितीच्या सदस्यांनीं आपण होऊन ॲन्‌चा प्रश्न हातीं घेतला नाहीं. समितीच्या कार्याध्यक्षांचें नांव गृहांतील सर्व आश्रितांना कळलें होतें. समितीचे सदस्य जेव्हां गृहांत आले तेव्हां कार्याध्यक्ष कोण हें माहीत नसतांहि ॲनी ओरडली, "मि. सॅनबर्न, मि. सॅनबर्न, मला शाळेंत जायचंय्."

१८८० च्या ऑक्टोबरमध्यें ती पर्किन्स इन्स्टिटयूटमध्यें दाखल झाली. वयाच्या चौदाव्या वर्षी बोटांनीं स्पेलिंग करण्याचें ती शिकली व तिच्या शिक्षणास सुरुवात झाली. सुटीच्या दिवसांत संस्थेंत मुलांची काळजी घेण्यासारखें कोणी राहात नसे, म्हणून तिला पथिकाश्रमांत नोकरी करण्यास पाठवीत. तेथें राहणाऱ्या एका गृहस्थाच्या मदतीनें तिनें मॅसेशुएट येथील डोळे व कानांच्या आजारावर उपचार करणाऱ्या धर्मार्थ हॉस्पिटलमध्यें प्रवेश मिळविला. डॉ. ब्रॅडफोर्ड ह्यांनीं ऑगस्टमध्यें तिच्या डाव्या डोळ्याचें ऑपरेशन केलें. पुढच्या ऑगस्टमध्यें त्यांनीं ॲनीच्या उजव्या डोळ्याचेंही ऑपरेशन केल्यामुळें ॲनीला दिसूं लागलें. तरी डोळस मुलांच्या शाळेंत जाण्याइतकें चांगलें दिसत नव्हतें. पुढें सहा वर्षें ती पर्किन्स इन्स्टिटयूटमध्यें राहिली व तिथला शिक्षणक्रम तिनें १८८६ सालीं पुरा केला. संस्थेला करतां येईल तेवढें संस्थेनें तिच्यासाठीं केलें होतें. आतां पुढचें भवितव्य तिच्या हातांत होतें.

चांगल्या राहणीचा अभाव व अपुरें शिक्षण ह्या आपल्या मर्यादांची तिला जाणीव होतीच; पण त्याहिपेक्षां तिची अनिश्चित दृष्टि ही तिच्या मार्गांतील मोठी अडचण होती. तरी तिनें केवळ एका बहिऱ्या व आंधळ्या मुलीच्या संगोपनाची जबाबदारी घेतली होती असें नाहीं, तर त्याहिपेक्षां

अधिक अपेक्षा ठेवली होती. कॅप्टन केलर ह्यांनीं आपल्या मुलीला शिकविण्याची देऊं केलेली नोकरी इतर सर्व कामांत चांगली म्हणून तिनें पत्करली. ती नोकरी पत्करल्यावर तिनें कांहीं महिने लॉरा ब्रिजमनवरच्या डॉ. हॉव ह्यांनीं केलेल्या शैक्षणिक प्रयोगाच्या अहवालाचा अभ्यास करण्यांत घालविले. तिच्या अधुऱ्या दृष्टीमुळें हें वाचन तिला अतिशय तापदायक झालें. आधींपासूनच बोटांनीं स्पेलिंग करून कसें लिहावयाचें तें तिला माहीत होतें. इतर विद्यार्थ्यांप्रमाणें तीहि लॉराशीं 'बोलण्यास' शिकली होती. मात्र लॉरा सतत पर्किन्स संस्थेंतच राहात होती. कारण अंधांना मोकळेपणा वाटेल असें वातावरण संस्थेंत होतें नि तशा वातावरणाबाहेर राहण्यासाठीं हवी असणारी तयारी लॉराची झालेली नव्हती. तरीहि लॉराला मिळालेलें शिक्षण व तिनें केलेली प्रगति हीं सर्वत्र आदर्श समजलीं जात !

नुकत्याच केलेल्या शस्त्रक्रियेनें आणि सतत घरची आठवण येते म्हणून रडून रडून डोळे लाल झालेली ॲन् ३ मार्च १८८७ रोजीं तस्कुंबियाला—हेलेनच्या घरीं पोंचली. हेलेन ह्या दिवसाला 'माझ्या आत्म्याचा जन्मदिन' म्हणते. आल्याबरोबर ॲनीनें आपल्या बोटांनीं हेलेनच्या हातावर स्पेलिंग करून निरनिराळीं अक्षरें लिहायला सुरुवात केली. हेलेनही आपल्या बोटांची हालचाल करी, पण तिच्यांतील मानवी जीवन जागें व्हावयास पुरा एक महिना लागला. पांच एप्रिल रोजीं हेलेनच्या हातावर पंपांतील पाणी पडत असतां हेलेनला जाणीव झाली कीं ॲनीनें तिच्या हातावर पाणी म्हणून जें लिहिलें तें पाणी आहे आणि पाण्याला तें कुठेंही असलें तरी पाणीच म्हणतात. ज्ञानाची ही संवेदना झाल्याबरोबर जणुं जीवनाच्या बंद झालेल्या कवाडांची किल्ली तिला मिळाली. प्रत्येक गोष्टीला नांव असतें हें तिला कळलें नि मग प्रत्येक गोष्टीचें नांव शिकण्याची तीव्र इच्छा तिच्या मनाशीं तयार झाली. तिनें ॲनीकडे प्रश्नार्थक बोट केलें. "बाई ( टीचर )" ॲनीनें तिला 'सांगितलें' त्या दिवसापासून हेलेनला ज्ञानाचीं भांडारें खुलीं झालीं आणि ॲनी तिच्या 'बाई' झाल्या.

नंतर हेलेननें प्रचंड गतीनें केलेल्या प्रगतीमुळें एक असाधारण शिक्षिका डॉक्टर हॉवपेक्षांहि अधिक मोठें कार्य करीत असल्याचें

शिक्षण–तज्ज्ञांच्या लक्षांत आलें. दहाव्या वर्षी मुक्यासारखें बोटांनीं बोलायचें सोडून सर्वसाधारण माणसासारखें तोंडानें बोलायचा आपला निश्चय हेलेननें जाहीर केला नि बोलायचें कसें ह्याचे अकरा धडे घेतल्यावर जेव्हां ' मी मुकी नाहीं ' हें वाक्य तिनें तोंडानें बोलून दाखविलें तेव्हां ही मुलगी काय वाटेल तें करूं शकेल ह्याबद्दल सर्वांची खात्री पटली. पण त्यामुळें समाजांत दोन गट तयार झाले. हेलेन हा ' चमत्कार ' आहे असें एक गट म्हणूं लागला नि त्यांनीं शिक्षिकेची दखल घ्यायचें नाकारलें; तर दुसऱ्या गटानें सारें श्रेय शिक्षिकेला देऊन हेलेन हें एक ' यंत्र ' असल्याचें जाहीर केलें. पुढें हेलेन बारा वर्षांची असतांना तिनें एक गोष्ट नकळत ' वाङ्मयचौर्य ' करून प्रसिद्ध केल्याचें कळतांच ' हेलेन एक थोतांड आहे ', ' शिक्षिका ढोंगी आहे ' असें जाहीर करणारा तिसरा गट तयार झाला.

ह्या हल्ल्यानें बाईंना व हेलेनला मनस्वी यातना झाल्या, व आजही होतात. पण कांहीं विचारी लोकांच्या लक्षांत बाईंचे व हेलेनचे गुण आले. एक निश्चयी गुणी शिक्षिका व हुशार आणि उत्सुक विद्यार्थिनी ह्यांची जोडी शिक्षण-क्षेत्रांत अतिशय आश्चर्यकारक यश मिळवीत असल्याचें त्यांनीं मान्य केलें. डॉ. बेल अशा लोकांपैकींच एक होते. विसाव्या वर्षी हेलेन कॉलेजमध्यें गेली. दृष्टि व वाचाशक्ति असलेल्या इतर सर्व मुलींच्या बरोबरीनें शिक्षण घेऊन तिनें पदवी मिळाविली.

ॲनच्या मृत्यूपर्यंत ( १९३६ ) एक फार महत्त्वाचा प्रश्न नेहमीं विचारला जाई. ' हेलेन केलर हींत स्वतःचें स्वतंत्र व्यक्तिमत्व किती आणि ॲन सलिवनचें हेलेनच्या रूपानें दिसणारें व्यक्तिमत्व किती ? ' ह्या प्रश्नाचें उत्तर सोपें नाहीं. दोघी एकजीव झालेल्या होत्या, दोघींचें एकमेकींशिवाय चाललें नसतें.

हेलेनचें कॉलेजचें शिक्षण पुरें झाल्यावर त्यांचा दोघींचा काळ कांहींसा चांगला गेला. रेंथम ( मॅसशुएट ) येथें स्वतःच्या घरीं त्या राहावयास गेल्या. एक वर्षानंतर ॲननें जॉन मेसी ह्यांचेशीं लग्न केलें. जॉन मेसी विख्यात टीकाकार, साहित्यिक, हुशार वक्ते व उत्तम सोबती होते. त्यांच्यामुळें त्या

कुटुंबाला पूर्णत्व आलें. त्या वातावरणांत हेलेन पुस्तकें लिहूं लागली. हेलेनची आत्मकथा लिहिण्यांत जॉननीं तिला मदत केली. १९०४ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्या आत्मकथेच्या तेव्हांपासून एकामागें एक आवृत्त्या निघत आहेत.

' ऑप्टिमिझम ' हें पुस्तक हेलेननें ती कॉलेजमध्यें असतांनाच लिहिलें होतें. त्यांत लोक तिच्याबद्दल दाखवीत असलेल्या दयेचा प्रतिकार केला होता. पुढें रॅंथमला तिनें ' द वर्ल्ड आय् लिव्ह इन् ' हें पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली. ज्या शहाण्यांनीं तिच्यासारख्या आंधळ्या व बहिऱ्या बाईनें रंगांचीं व आवाजांचीं वर्णनें लिहिल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें होतें त्यांना तिनें खोडसाळपणें ह्या पुस्तकांत उत्तर दिलें. तिचें म्हणणें,—' सर्व दृष्टि आत्मिक असते.' मेणबत्तीची ज्योत, विस्तवाची आग आणि उन्हाची प्रखरता ह्यांचा फरक तिला कळत असे. ज्यावेळीं तिचे गाल उष्णतेनें लाल होत तेव्हां त्यांचा रंग लाल आहे हें तिला कळे व वसंतामध्यें जेव्हां पालवी फुटे तेव्हां त्या पानांचा रंग हिरवा आहे हेंहि तिला माहीत होई. एकाच फळाच्या निरनिराळ्या चवी, एकाच फुलाचे निरनिराळे वास, ती घेऊं शके आणि म्हणूनच एकाच रंगाचे निरनिराळे प्रकार असतात ह्याचेंहि अनुमान तिला काढतां येई. ती आपल्या हातांनीं संगीत कसें **ऐकूं** शकते हें आपल्याला कळणें कठीण. पण **ऐकणें** वगैरेसारखे परिचित शब्द न वापरतां तिला जें सांगायचें आहे तें ती सुलभ रीतीनें सांगूं शकली असती. भाषा नेहमीं वापरली जाते तशीच तिनें वापरली व म्हणूनच ' मी पाहतें ' किंवा ' मी ऐकतें ' ह्यासारखे शब्द वापरण्यास तिला हरकत वाटत नसावी.

हेलेननें त्यानंतर लिहिलेल्या पुस्तकांपैकीं एका पुस्तकानें तिला चांगलाच धक्का दिला. अनेक विषयांवर तिनें लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह होता व त्यांतील एका लेखांत उपदंशाच्या विकारानें जन्माचे वेळीं बालकाचे डोळ्यांवर परिणाम होऊं नये म्हणून, बालकाचे डोळ्यांत सिल्व्हर नायट्रेट घालण्याची सूचना तिनें केली होती. ह्या लेखामुळें केवळ तिच्यावर टीका झाली असें नव्हे, तर हीं मतें तिच्यातर्फे बाईनीं मांडलीं असाहि आरोप करण्यांत आला. ती त्यामुळें संतापली, पण मागें हटली नाहीं. त्यामुळें

लेखनाच्या प्राप्तीवर जगण्याची तिची कल्पना मात्र ढासळली. बाईंचें वैयक्तिक जीवनहिं ह्या काळांत दुःखी झालें. त्यांची दृष्टि फारच अधू झाली, प्रकृति ढांसळूं लागली, पैशाची वाण तीव्रतेनें भासूं लागली.

हेलेन बोलायला शिकली होती, पण तिला स्पष्ट बोलतां येत नव्हतें. तरी बाईंच्या आधारानें तिनें व्याख्यानांचे कार्यक्रम करावयास सुरुवात केली. बाईंची प्रकृति आटोक्यांत राहती तर ह्याच कार्यक्रमावर त्यांनीं भर दिला असता. परंतु तीन महिन्यांनंतर बाथ येथें बाईंची प्रकृति खूपच बिघडली. हेलेनची देखरेख करायला कोणीच नव्हतें. त्या कशाबशा रेंथमला आपल्या घरीं आल्या. अँड्रयू कार्नेगी ह्यांनीं एकदां हेलेनला देऊं केलेलें पेन्शन हेलेननें नाकारलें होतें; तें तिनें आतां मान्य केलें व एका माणसाला पुरणाऱ्या त्या रकमेच्या आधारावर हेलेन, आजारी बाई व मदतनीस नेमलेली बाई अशा तिघांचा उदरनिर्वाह जेमतेम पार पडूं लागला. म्हणूनच थोडें बरें वाटतांच बाईंनीं पुन्हा रस्ता सुधारला.

दोघी युरोपला गेल्या. मदतनीस असल्याशिवाय दोघींचें भागण्यासारखें नव्हतें. एकदां हेलेनची आई बरोबर गेली होती. परंतु पुढें पॉलीला ती उणीव भरून काढावी लागली. चिटणीस म्हणून त्या दोघींच्या आयुष्यांत आलेली पॉली पुढें आयुष्यभर त्या घरांतली एक होऊन राहिली. बाईंच्या मृत्यूनंतर पॉलीनें हेलेनची सर्व जबाबदारी घेतली.

१९१६ पर्यंत व्याख्यानांचा दौरा चालू होता; पण नंतर महायुद्धाच्या प्रचंड स्फोटांत त्या दोघींचे आवाज बुडाले आणि निराशेनें त्या घरीं परत आल्या. पैशाचे अभावीं त्यांना रेंथमचें घर काढून टाकावें लागलें. बाई पुढें बऱ्याच आजारी पडल्या. त्यांना प्ल्यूरसी झाली व त्यांतच त्यांना क्षय झाल्याचें चुकीचें निदान करण्यांत आलें. ती चूक पुढें लक्षांत आली. विश्रांतिसाठीं त्या अमेरिकेबाहेर गेल्या. तिथून परत आल्यावर फॉरेस्ट हिल्, लॉंग आयलंड येथें एक विटांचें ओबडधोबड घर घेऊन त्या राहूं लागल्या.

बाईंचें कसें होणार ह्याची काळजी हेलेनला फार वाटे. मिळणारें पेन्शन फक्त आपल्यापुरतें आहे व जर आपण बाईंच्या आधीं मेलों तर बाईंना

उपजीविकेचें साधन नाहीं हें लक्षांत घेऊन हेलेननें बाईंची तरतूद करून ठेवायचें ठरविलें व त्यासाठीं स्वतःच्या जीवनावर एक बोलपट काढायची परवानगी हॉलिवुडच्या एका निर्मात्याला दिली. सत्यापेक्षां प्रतीकात्मतेला अधिक महत्त्व देऊन बोलपट काढला गेला. तो अयशस्वी ठरला नि त्यामुळें पैसा मिळविण्याचें हें स्वप्नहि धुळीला मिळून हेलेनला पुन्हा जुन्या कार्यक्रमाकडे वळावें लागलें. आतां ती करमणुकीचे कार्यक्रम करणाऱ्या एका मंडळांत आपल्याला बाईंनीं कसें शिक्षण दिलें ह्याचें प्रात्यक्षिक वीस मिनिटांच्या कार्यक्रमांत दाखवूं लागली. आर्थिक अडचण दूर करण्यासाठीं तेवढा एकच मार्ग तिच्याजवळ होता. कसरतपटू, शिकवलेले प्राणी ह्यांच्या बरोबरीनें हा कार्यक्रम होत असल्यानें हेलेननें केवळ पैशांसाठीं स्वतःचें प्रदर्शन मांडलें आहे हा आरोप तिला सहन करावा लागला. पण स्वतःची भाकरी स्वतः कमवून बाईंची तरतूद करण्यासाठीं हें सारें सहन करूनहि हेलेनला आपल्या कामांत समाधान वाटत होतें. चार वर्षे ती ह्या मंडळींत होती.

अंधांच्यासाठीं काम करण्याची हेलेनची तळमळ शांत होण्यासारखी संधी तिला वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी मिळाली. 'अमेरिकन फाउंडेशन फॉर द ब्लाइंड' ह्या संस्थेंत ती काम करूं लागल्यावर आपल्या आवडत्या क्षेत्रांत आपण काम करीत आहोंत असें तिला वाटूं लागलें.

बाईंची प्रकृति जेव्हां अतिशय बिघडली तेव्हां त्यांना कुणीतरी सांगितलें, "बाई, हेलेनसाठीं तरी तुम्ही बरं झालं पाहिजे. तुमच्याशिवाय हेलेनचं कसं होणार?" "तसं झालं—" बाईंनीं तावडतोब उत्तर दिलं, "तर मी अपयशी ठरेन." आयुष्यभर बाईंनीं हेलेन स्वतंत्रपणें जगावी म्हणून तिची घडण केली व त्यासाठीं आपलें आयुष्य खर्ची घातलें होतें.

वीस ऑक्टोबर १९३६ ला बाई वारल्या.

जगभर प्रवास करून दुसऱ्या महायुद्धांत अंध झालेल्यांच्या पुनर्वसाहतीचा प्रश्न सोडविण्याचें काम करीत असतांनाच हें पुस्तक हेलेननें लिहिलें. १९४६ त आगीनें हेलेनचें घर व ह्या पुस्तकासाठीं आयुष्यभर जमविलेलें संदर्भसाहित्य जळून नष्ट केलें. हेलेननें पुन्हा पुस्तक लिहायला सुरुवात केली.

ह्यांतला कांहीं भाग तिनें नेला ब्रॅडी हेनी ह्यांच्या घरीं लिहिला. दिवसाचे सात तास ती टाइपरायटरवर बसून टाइप करी. तिचे कागद तिचे तीच ठेवी. कचऱ्याच्या टोपलींत टाकलेले कागदही तिचे ती बिनचूक शोधून काढी, म्हणून कचऱ्याच्या टोपलीला कोणी हात लावीत नसे. अर्धवट काम सोडलें तरी शेवटचा शब्द तिला बरोबर आठवे. तिनें स्वतः लिहिलेलें तिला वाचणें शक्य नव्हतें. म्हणून ती सतत पुढें पुढें लिहीत जाई. कांहीं कमी अधिक करावयाचें झालें तरी ती बिनचूक संदर्भ देऊनच तशा टीपा लिहून देई. अखेरचीं मुद्रितें ती दाक्षिण भारतांत असतांना तिच्याकडे पाठविण्यांत आलीं.

हेलेनला संत मानणारे एक गृहस्थ मला भेटले. तिला संत म्हटलेलें आवडत नाहीं असें मीं सांगूनहि ते म्हणाले, “ पण ती संत आहे असंच आम्ही मानतों. ”

हेलेन स्वतःला ईश्वराच्या हातचें एक साधन समजते. ती म्हणते, ‘ जें जें तिला येतें तें तें बाईंनीं दिलेलें आहे.’ तिला खूप मानमरातब मिळाले. त्याबद्दल तिला कृतज्ञता वाटते. पण त्यांत असमाधानाची छटा आहे. तिला तिच्या प्रत्येक पदवीवर, मानपत्रावर स्वतःच्या नांवाबरोबरीनें आणखी एक हवेंसें वाटतें तें नांव **ॲन् सलिवन मेसी**—तिच्या बाई. थोड्या मानपत्रांवर त्यांचीं दोन्ही नांवें एकत्र आहेत. बाईंच्या नांवांत दोघींचेंही व्यक्तिमत्व येतें. हेलेन म्हणते, “ लोकांना वाटतं बाई मला सोडून गेल्या, पण त्या सदैव माझ्याजवळ आहेत.”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# १

१९४८ सालीं मी आणि पॉली आमच्या हॉटेलसमोर उभ्या होतों. अमेरिकन लष्करी विमानानें आम्ही नुकत्याच नेपल्सहून अथेन्सला आलों होतों व पार्थेनॉन पाहिल्याशिवाय अमेरिकेला परत जायचें नाहीं असें आम्हीं ठरविलें होतें.

टेकडीचा चढ बराच होता. पाय ठेवला कीं जुन्या पायऱ्या आणि दगड डगमगत. चढ चढूं लागण्यापूर्वीं तेथील दगडांतील एका खांबाला हात लावून मीं चांचपडून पाहिलें. काळ आणि निसर्ग यांना तोंड देऊनही तो अतिशय गुळगुळीत राहिला होता.

मी जेव्हां वर उभी राहिलें तेव्हां माझ्या मृत बाई, ॲन सलिव्हन मेसी, माझ्याबरोबर होत्या असें मला वाटलें नि त्यांनीं मला शिकविलेल्या ग्रीक पुराणांतल्या कथा आतां माझ्याभोवतीं घडत आहेत असा मला भास झाला.

मीं आणि पॉलीनें त्या टेकडीवरून नजर टाकली. आपला तोतरेपणा घालविण्यासाठीं ग्रीक वक्ता डेमॉस्थनिस आपल्या तोंडांत गोटी धरून याच टेकडीवरून पळत चढत असे. जगाला थक्क करणारें तत्त्वज्ञान प्लेटोनें इथेंच सांगितलें होतें.

टेकडीचा तो कठीण चढ चढतांना मला बाईंची आठवण झाली. आम्ही दोघींनीहि एकमेकींच्या सहवासांत अडचणींचे असेच डोंगर पार केले होते. अंधांच्या क्षेत्रांत जें डोंगराएवढें प्रचंड कार्य पडलें होतें, त्याचेंच एका परीनें हा चढाव प्रतीक होता. तो चढून जातांना एक वेगळेंच आत्मिक बल माझ्या प्रत्ययाला आलें. माझ्यापुढील दारुण शोकांतिका किती जगावेगळी आहे त्याची मला जाणीव होती. पण बाईंची स्मृति, त्यांचा निर्धार नि चिकाटी यांनीं माझ्या पायांत बळ आणलें होतें.

इंग्लंड, फ्रान्स आणि इटलींतील अंधांची पाहणी आम्हीं नुकतीच केली होती. जें झालें होतें तें पाहून आमचीं मनें उदास झालीं होतीं. दीडशे वर्षे मोठ्या कष्टानें अंधांनीं शाळा बांधल्या होत्या. अंध शिक्षणासाठीं सारी हयात खर्च करणारे शिक्षक व शिक्षिका जमविल्या होत्या. ब्रेल लिपींत बहुमोल ज्ञानसंग्रह जमविला होता. दुसरें महायुद्ध आलें नि एखाद्या झंजावाताप्रमाणें त्यांनीं जमविलेलें हें सारें घेऊन गेलें. बऱ्याच अंधांचीं घरें नष्ट झालीं, कुटुंबें नाहींशीं झालीं. कष्टानें बांधलेल्या शाळा आणि परिश्रमालयें नाझींच्या बॉंबहल्ल्यांत नष्ट झालीं. ज्या पत्र्यावर ब्रेल लिपींत त्यांनीं आपले ज्ञानसंग्रह कोरले होते ते पत्रे दारुगोळ्यासाठीं वितळवून टाकले गेले. त्यांचीं पुस्तकें इंधन म्हणून जाळलीं गेलीं.

धडधाकट अंधांना नोकऱ्या नि काम देणाऱ्या संघटना मोडून पडल्या. ते सर्वत्र उघडे पडले. त्यांच्या या अनाथावस्थेंत त्यांना विशिष्ट शिक्षण देण्याची अधिक आवश्यकता होती, कारण त्यांची भाकरी त्यांना त्याशिवाय कमावतां आली नसती. अमेरिकन जनता कितीही उदार असली तरी युरोपांतील हें सर्व नुकसान भरून काढणें, नव्या शाळा बांधणें, मोडलेल्या दुरुस्त करणें, ब्रेल लिपी छापणारे किमती छापखाने उभे करणें, जन्मांध असलेल्या आणि युद्धांत अंध झालेल्या सर्वांच्या शिक्षणाची सोय करणें आणि त्यांचीं नष्ट झालेलीं जीवनें पुन्हा नव्यानें उभारणें हें त्यांच्या आंवाक्याबाहेर आहे हें मला कळत होतें. इंग्लंडला जाणारें विमान पकडण्यासाठीं आम्ही रोमला जेव्हां वाट पहात होतों तेव्हां माझ्या डोक्यांत या विचारांची गर्दी झाली होती.

आम्ही एक्सेलशिअर हॉटेलमध्यें असतांना आमचें कॉनेटिकटमधील 'ऑर्कन रिज' येथलें लाकडी घर जळाल्याची तार आम्हांला मिळाली. आमची जणू वाचाच खिळली. मुक्या मनानें मी व पॉली एकमेकींच्या गळ्यांत गळा घालून बसलों. एका क्षणांत आमचें सर्वस्व नष्ट झालें होतें. आम्ही दोघांनीं, हर्बर्टनें व फ्रायडेनें आमचे उरलेले दिवस ज्या घरांत घालवावयाचें ठरविलें होतें तें घर जळून खाक झालें होतें. मीं आणि पॉलीनें

जपानहून आणलेल्या सर्व वस्तूंचा बहुमोल संग्रह नष्ट झाला होता, आमच्या स्नेही-मंडळींनीं प्रेमानें दिलेल्या भेटी, माझें वाचनालय, आई व आमच्या बाई यांनीं मला लिहिलेलीं आणि साऱ्या जगभर पसरलेल्या आमच्या हित-चिंतकांनीं पाठवलेलीं पत्रें—सारें नष्ट झालें होतें. गेल्या वीस वर्षांत बाईंच्या आठवणी मीं लिहून काढल्या होत्या, तें बहुमोल हस्तलिखित नाहींसें झालें होतें. माझ्या शरीराचा एखादा अवयव तुटल्यासारखें मला वाटलें. पण असें मी पॉलीला सांगत असतांनाच माझ्या हृदयांत एक तेजस्वी ज्योत पेटूं लागली. ती ज्योत दाहक नव्हती, तिनें मला डोळस केलें, मला पुढचा मार्ग दाखविला, प्रकाश दिला. ज्यांचें जीवन असेंच नष्ट झालें आहे, अशा युरोपांतील मुलांचा विचार माझ्या मनांत आला. मी पॉलीला म्हणालें, "मी हें सारें धीरानें सहन करीन. बाई गेल्या तेव्हां माझ्या जीवनाचीं पाळेंमुळें कोणींतरी खणून काढल्यासारखें मला वाटलें होतें. आतांचें नुकसान कांहीं तेवढें नाहीं."

"हो" पॉली म्हणाली, "आपण सारें धीरानें सहन करूं. अनेकांची आपल्यावर भिस्त आहे. आपण त्यांना तोंडघशीं पाडतां कामा नये." "शिवाय" मी म्हणालें, "आपल्याला खूप चांगले मित्र आहेत आणि लाखों लोकांपेक्षां परिस्थितीही आपल्याला अधिक अनुकूल आहे."

पॉलीचीं बोटें लख्कन् तळपलीं. या बोटांतलें धैर्य म्हणालें : "खरंच, परिस्थितीनें आपल्याला हें आव्हान दिलें आहे. आपण तें स्वीकारलें पाहिजे."

हर्बर्ट पॅरिसमध्यें होता. गेल्या बारा वर्षांत त्याला विश्रांति मिळाली नव्हती. म्हणून विश्रांति घेण्यासाठीं आम्ही त्याला युरोपमध्यें आणला. आपल्या मित्रांना भेटण्यासाठीं तो हॉलंडला गेला. तिथेंच तो आमची वाट पाहात होता. आम्हीं त्याला भेटलों तेव्हां आमची भीति अगदीं खरी ठरली. आमचें घर पुरें जळून गेलें होतें. "बाईंनीं तुम्हांला माझ्यावर सोंपविलें होतें. कसली बुद्धि झाली नि मी घर सोडलें !" असं दुःखा-तिशयानें तो म्हणाला तेव्हां त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याच्या मनाची

रुखरुख नाहींशी व्हावी म्हणून आम्हीं किती सांगून पाहिलं. पण व्यर्थ. उलट मला मात्र ओढवलेल्या आपत्तीची जशी पुरी कल्पना आली तशी या जिण्याला वेढून राहिलेल्या साऱ्या संकुचितपणावर जीवनानें पुरी मात केल्याची प्रचीति मला येऊं लागली. माझ्या हृदयांत साकार झालेलें हें नवें आत्मिक जीवन प्रबल होतें, डोळस होतें, त्याला ऐकूं येत होतें, माझ्या जीवनाला नवी प्रेरणा देणारें होतें. तें माझ्या हृदयांत उद्‌भवलें, वाढीला लागलें, सारें हृदय त्यानें व्यापून टाकलें. आमचें घर नष्ट झालें असलें तरी या नव्या प्रेरणेनें आमच्यावर पाखर टाकली.

एकीकडे मन या संकटांतून कसें निभावून निघायचें याची विवंचना करीत असतां, आतांपर्यंत कल्पनेनें जीं जीं अग्निदिव्यें पाहिलीं नि अनुभवलीं तीं सारीं दिव्यें माझ्या डोळ्यापुढें सरकूं लागलीं. महायुद्धांतील विमान-हल्ल्यांच्या अग्निप्रलयांत सर्वस्व नष्ट होत असतांही तें टाळण्यासाठीं लढत असलेले, डोळस नि अंध दोन्ही प्रकारचे स्त्री-पुरुष इतकेंच काय पण मुलेंहि मला दिसलीं. नाझींच्या गॅस चेंबरमध्यें शरीराची राख होत असतांही वेदना सहन करणारे लाखों ज्यू मला दिसले. युद्धाच्या आगींत जळणारीं टोकियोंतील कागदासारखीं नाजुक घरें माझ्या नजरेसमोर उभीं राहिली तेव्हां माझ्या हृदयाचें पाणी-पाणी झालें. माझ्या घराला लागलेल्या त्या छोट्या आगीनें कत्तल आणि बलात्कार यांना तोंड देणाऱ्या समाजाचीं दुःखें मला स्पष्ट दिसूं लागलीं. स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, व्यक्तित्व आणि मानवी सुख हीं नष्ट करणाऱ्या दुष्टबुद्धींशीं सामना देण्याचा निर्धार पेटविणारी अखंड ज्योत माझ्या हृदयांत तेवूं लागली. युद्धांत जखमी झालेल्यांच्या जीवनाकडे माझें मन वळलें. एकाएकीं आंधळीं, बहिरीं, थोटीं, वेडीं, विद्रूप झालेलीं तीं जीवनें माझ्या नजरेसमोर उभीं राहतांच मानवी जीवन सुखी करणाऱ्या शक्तीवर भर द्यावयाचा मीं निश्चय केला.

वीस डिसेंबरला आम्हीं वेस्टपोर्टला परत आलों. तेथें गस काकांनीं –प्रि. जी. ए. फीफरनीं–दिलेल्या घरांत आम्ही राहूं लागलों. बाई होत्या तेव्हांपासून गस काकांनीं आमच्यावर मायेची पाखर घातली होती. नाताळच्या

दिवशीं मी, पॉली आणि हर्बर्ट आमच्या जुन्या घराच्या काळ्या थडग्यावर जाऊन उभे राहिलों. मध्ययुगीन काळांत, आरोपीला आपण निर्दोषी आहोंत हें सिद्ध करण्यासाठीं आगीवरून चालत जावें लागत असे. मी या थडग्यावरून चालत जात असतांना मला तसेंच वाटत होतें. सारें जळून खाक झालें होतें. हर्बर्टची खोली आणि गॅरेजचा कांहीं भाग तेवढा शिल्लक होता.

रेंथामचें आमचें घर आम्हीं सोडलें तेव्हां मला आणि बाईंना असेंच दुःख झालें होतें. पण जातांना आमचें सामान आणि आमचीं पुस्तकें आमच्याबरोबर नेलीं होतीं. त्यांच्या गोड सान्निध्यांत आम्हीं परक्या वातावरणांत रमूं शकलों. आतां सारेंच नष्ट झालें होतें. आम्ही पोरकीं झालों होतों. यौवनांत पाऊल टाकल्यापासून ज्यांनीं माझें मन समृद्ध बनविलें होतें तीं सारीं पुस्तकें आज नष्ट झालीं होतीं, त्यांतलीं कांहीं मला आईनें, बाईनीं आणि माझे मानलेले बाबा जॉन हिज यांनीं दिलेलीं होतीं. माझीं बोटें फिरून फिरून ज्या बायबलचीं अक्षरें गुळगुळीत झालेलीं होतीं तें बायबल नाहींसें झालें होतें, बालपणापासून बायबलच्या खालोखाल ज्यानें माझें मन व्यापून टाकलें होतें तो शेक्स्पिअरचा संग्रह नाहींसा झाला होता. आणि माझ्या मुक्या जीवनांत अनेक मधुर नादतरंग उठविणारा माझा साहित्यसंग्रह नष्ट झाला होता. त्यांतल्या कांही पुस्तकांच्या नव्या प्रती नंतर मला मिळाल्या पण जुना संग्रह नष्ट झाल्यानें निर्माण झालेली पोकळी पुन्हा भरून निघाली नाहीं.

आम्ही हळू हळू पावलें उचलीत होतों. पॉलीचें लक्ष आम्ही ज्याला 'बाईंचें झाड' म्हणत असूं त्या ओकच्या झाडाकडे गेलें. बाईंना आवडणारें नाजूक आकारसौष्ठव या झाडांत होतें. त्यामुळें आम्ही त्या झाडाला 'बाईंचें झाड' म्हणत असूं. तें एका बाजूनें खूप होरपळलें होतें व हिंवाळ्यांत घोंघावणाऱ्या गारठ्यांत तें तग धरून राहील कीं काय सांगणें कठीण होतें. परंतु पुढच्याच वर्षी वसंतांत त्याला पिसासारखी हिरवी लवलवीत पोपटी पालवी फुटली. आणि आतां तर तें असें वाढलें आहे कीं उन्हाळ्याच्या झळी त्याच्या गार छायेंत आपोआप निवतात.

कांहीं दिवसांनंतर 'ॲन सलिव्हन मेसी' या पुस्तकाच्या लेखिका नेला ब्रॅडी हेनी ह्यांचेशीं मी आणि पॉली बोलत असतां त्यांनीं एका जुन्या ग्रीक तत्त्वाची आम्हाला आठवण दिली. "अडचणींनीं खचूं नका, अधिक धैर्यानें पुढें जा."

माझी जीवननौका सुरक्षितपणें हाकारण्यासाठीं पॉली व हर्बट आहेत म्हणून त्यांना आनंद झाला. नेला मला म्हणाल्या, "बाईंचें चरित्र तूं जेव्हां पुन्हा लिहिशील तेव्हां बाई तुला एखाद्या पवित्र ज्योतीसारख्याच दिसतील. विनाश पसरविणाऱ्या अग्नीप्रमाणें नाहीं तर ऊब देणाऱ्या, शीतल प्रकाश देणाऱ्या, मार्गदर्शक ज्योतीसारख्या." या शब्दांनीं मला मोठाच धीर दिला. त्या मंगल ज्योतीचा प्रकाश मी माझ्या वाचकांच्या हृदयापर्यंत नेऊन भिडवीन अशी मला आशा आहे.

# २

स्वतः बाईंना बालपणांतच अंधत्वाशीं लढावें लागलें. पुढें त्यांच्या डोळ्यांवरचें ऑपरेशन करण्यांत आल्यावर त्यांना कांहीं प्रमाणांत दिसूं लागलें तरी जन्मभर अंधत्वाशीं त्यांना सामना द्यावा लागला. जगांतील लाखों मानवी जीवांचें आरोग्य आणि सुख नष्ट करणाऱ्या अंधत्वावर बाईंचा फार राग होता. माझ्यासारखी आंधळी, बहिरी आणि मुकी विद्यार्थिनी हातीं येतांच या आपत्तीवर बाई तुटून पडल्या. निसर्गानें मला आपत्ती दिल्या-त्या जागीं प्रेम आणि विचारशक्ति निर्माण करण्याचा निर्धार बाईंनीं केला.

त्या बालपणच्या हेलेनला म्हणजे स्वतःला, मी 'भूत' म्हणतें. कारण श्वापदांना निसर्गतः वाटणाऱ्या गरजांपेक्षां मलाही कांहीं अधिक कळत नव्हतें.

बाईंच्या जीवनांतील या आठवणींनीं मी उदास होतें, जेव्हां बाईंची दृष्टि ऑपरेशननें परत आली आणि त्या स्वतःच्या डोळ्यांनीं वाचूं लागल्या तेव्हां आनंदाची केवढी प्रचंड लाट त्यांच्या मस्तकावरून वाहत गेली ! त्यांच्या प्रेमळ स्पर्शानें अंगीं-मुखीं शहारून निघणारी विद्यार्थिनी त्यांना यावेळीं बघायला मिळती तर किती बरें झालें असतें ! पण नैसर्गिक मानवी प्रेम ( माझ्यांतील ) ' भुता ' ला समजत नव्हतें. स्नेहपूर्ण आवाज आणि हंसरे चेहेरे यांनीं बालपणीं येणारा गोडवा नाहींसा झालेला होता. सांगितलेलें ऐकायचें कळत नव्हतें, दया, प्रेम समजत नव्हतें. मला बाईंच्या त्या विद्यार्थिनीची आठवण येते, ती गुबगुबीत, दणकट, बेछुट आणि कशालाही न भिणारी अशी असल्याची. पहिल्या धड्याचे वेळीं जिन्यावर चढायचें तिनें नाकारलें नि तिला उचलून न्यावें लागलें. एकदां जेवतांना तिचें वागणें चुकलें. या ' भुताला ' आपल्या आणि दुसऱ्यांच्या बशींतील पदार्थ बोटांनीं उचलण्याची संवय होती. बाईंना हें असें वागणें पसंत पडणें शक्य नव्हतें. त्यांनीं ' भुता ' ला शिकवायचा प्रयत्न केला नि ' भुता ' नें मारामारी करायला सुरुवात केल्याचें पाहून कुटुंबांतील इतर माणसें उठून निघून गेलीं. आपल्याला शिकवणाऱ्या बाईंना ' भुता ' नें मारलें, बोचकारलें व जवळ जवळ खुर्चीतून खालीं पाडलें पण बाईंनीं शेवटीं एक तासाच्या मारामारीनंतर ' भुता ' ला चमच्यानें जेवायला लावलें. बशींत बोटें घालण्याचेंहि त्यानें बंद केलें. एक दिवस ' भुता ' नें नवे शब्द शिकायचें नाकारलें. शब्दांचा अर्थच कळत नसे. खालीं बसायचें नाकारून ' भुता ' नें टेबलाला लाथ मारली आणि तें पाडलें. बाईंनीं टेबल पुन्हा व्यवस्थित ठेवून शिकवणी चालू ठेवायचा आग्रह धरला तेव्हां ' भुता ' नें बाईंना जबरदस्त ठोसा मारला आणि त्यांचे पुढले दोन दांत पाडले.

सद्हेतूनें काम करणाऱ्या कुणालाही यापेक्षां अधिक वाईट परिस्थितीला तोंड द्यावें लागलें नसेल. जेव्हां बाई ' भुता ' ला शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत तेव्हां ' भुता ' चे आईबाप मध्यें पडत. म्हणून बाईंनीं त्यांची परवानगी घेतली व घराजवळ असलेल्या दुसऱ्या शांत जागीं

'भुता'ला नेलें. 'भुता'ला ओळखूं येणार नाहीं असें नवें सामान भरलें आणि घरांतल्या माणसांनीं रोज तिला भेटायला यायचें पण तिला कळूं द्यायचें नाहीं असें ठरलें. बाईनीं पुढें सांगितलेल्या आठवणींवरून मला असें कळलें कीं हा आम्हा दोघींचा एक प्रकारचा पिंजराच होता नि स्वतःच्या जीवाला धोका पत्करून बाईनीं तो बंदिवास स्वीकारला होता.

'भुता'च्या आणि बाईच्या झटापटींच्या आठवणी मी इथें सांगतें तें मला सर्व कांहीं आठवतें म्हणून नव्हे, तर बाईनीं हातीं घेतलेलें काम किती कठीण होतें याची कल्पना यावी म्हणून. मी माझी जीवनकथा लिहिली, त्यांत मी एका आनंदी तरुण स्त्रीच्या दृष्टिकोनांतून लिहिलें. त्यांत बाईनीं सहन केलेल्या अडचणींची पुरी कल्पना येऊं शकत नाहीं. त्या पुस्तकांतले इतर कांहीं दोषही मला सुधारले पाहिजेत.

या नव्या घरांत माझ्यांतलें 'भूत' नव्या वातावरणांत आल्याचें मला आठवतें. एखाद्या श्वापदाप्रमाणें आपल्याला शिस्त लावणाऱ्या हातांना तें 'भूत' बोचकारीत-चावीत होतें, बेछुट होऊन लाथा मारीत होतें, आपल्या कल्पनेंत आपली शत्रु समजणाऱ्या व्यक्तीशीं लढत होतें. एकदां पलंगाच्या भोंवतीं गोल गोल फिरत, मारामारी करीत असल्याची आठवण आहे. शेवटीं बाईनीं 'भुताला' कपडे घालावयास नि काढावयास लावल्याचेंही आठवतें.

'भुता'ला वेळेची जाणीवच नव्हती. 'भुता'ची इच्छाशक्ति नष्ट न करतां तिला काबूंत आणण्यासाठीं बाईनीं तासामागें तास, दिवसामागें दिवस कसे घालवले असतील याची मला कल्पना यावयास कित्येक वर्षें गेलीं. हें काबूंत आणणें सुद्धां आम्ही पुन्हा घरीं राहावयास गेलों तेव्हां पुरें झालें नव्हतें. घरीं गेल्यावर तें 'भूत', 'पाणी' आणि 'भांडें' यांतला फरक शिकविणाऱ्या बाईवर रागावलें. मला अजूनही आठवतें कीं त्यावेळीं कांहीं पाऊलें वाजलीं, ( तीं माझ्या आईचीं होतीं ) नि मग आईनें मला उचललें नि खरपूस मार देण्यासाठीं ती मला घेऊन गेली. त्या मारानंतर 'भुता'ची वागणुक सुधारूं लागली पण बरोबर आणि चूक यांतला फरक 'भुता'ला

कळत नसे. 'भुता'चें शरीर वाढत होतें परंतु मन अंधाऱ्या जगांत जखडून बांधलें गेलें होतें. पण शेवटीं ५ एप्रिल १८८० रोजीं, बाई आल्यानंतर बरोबर एक महिन्यानें, ॲननें, बाईंनीं, ' पाणी ' या शब्दाच्या आधारानें ' भुता'ची संस्कारक्षमता जागी केली. तें सारें विहिरीजवळ झालें. 'भूत' पाण्याचें भांडें नळाखालीं धरून उभें होतें आणि बाई पंप मारीत होत्या. पंपाच्या नळांतून भांड्यांत पडणारें पाणी भांडें भरल्यानें ओसंडून 'भुता'च्या हातावरून वाहत असतां बाई दुसऱ्या हाताच्या बोटांनीं भुताच्या रिकाम्या हातावर स्पर्शानें पाण्याचें W A-T-E-R हें इंग्रजीतील स्पेलिंग करून दाखवीत होत्या. त्या बोटांच्या स्पर्शानें 'भुता'च्या मनांत एकदम ज्ञानाचें पांखरूं पंख फडफडवूं लागलें– 'भुता'ला शब्दाचा अर्थ कळला. त्या आनंदाच्या भरांत ' भूत ' पुढें झालें नि बाईंचा हात धरून भोंवतालच्या प्रत्येक वस्तूला स्पर्श करून त्यांचीं नांवें विचारूं लागलें, नवे शब्द शिकूं लागलें. एक एक ठिणगी हृदयांत शिरूं लागली. त्यांनीं हृदयांत ऊब निर्माण केली आणि तिथें प्रथमच प्रेम जन्माला आलें. त्या विहिरीपासून जेव्हां त्या व्यक्ति निघाल्या तेव्हां एक हेलेन होती, दुसरी ' बाई ' होती. खरोखर सुखाचा असा एक क्षणही अंधःकाराच्या युगानुयुगापेक्षां अधिक मोलाचा आहे.

माणूस म्हणून माझी जी वाढ झाली तींतच बाईंचें जीवितकार्य समाविष्ट असल्यानें पुनरावृत्तीचा धोका पत्करूनहि माझ्या लहानपणाबद्दल मला सांगितलें पाहिजे. माझी दृष्टि आणि वाचा मी फक्त एकोणीस महिन्यांची असतांना गेली. नशिबाच्या एका फटकाऱ्याबरोबर चिमुकली हेलेन प्रकाशापासून खेंचली जाऊन अंधःकाराच्या जगांत फेंकली गेली–तिचें भूत झालें. हवेंतून आवाज येणें बंद झालें आणि तिच्या जीवनांवर निःशब्दतेचा दाट पडदा पडला. तिचें मन खुरटूं लागलें, तिला येणारे थोडे शब्दहि नाहीसे झाले. दिशा दाखवणारा सूर्यप्रकाश विझला, हंसरे चेहेरे पहात वाढलेली तिची दृष्टि अंधःकारांत नाहींशी झाली. पानाफुलांनीं डंवरलेला वसंत तिला मोहित करीना, फळांनीं समृद्ध असलेला उन्हाळा तिच्याकडे न बघतांच निघून गेला. हिंवाळ्यांत आलेली पीक-पाण्याची समृद्धीहि तिला कधीं

कळली नाहीं. तिच्या हृदयांतल्या पांखरांचें कूजन बंद झालें कारण ती त्यांना साद घालूं शकत नव्हती. तिचें शरीर नितळ, गोरें होतें. पण प्रत्येकाच्या हृदयांतील आनंद हलवून जागें करणारें तिचें स्मित नाहींसें झालें होतें. शब्दांना ती साद घालूं शकत नव्हती. बालकाचे लडिवाळ बोल, हृदयाला मोहरून टाळणारे खेळ आणि आनंद या सर्वांचा तो मृत्यु होता. साऱ्यांच्या डोळ्यादेखत 'भुता' सारखे तिचे हात अनेक वस्तु चांचपडत पण त्या वस्तूंचा बोध तिला होत नसे.

हें 'भूत' आपल्या अंधःकारमय जीवनांतून प्रकाशाचा मार्ग शोधीत नव्हतें. कारण प्रकाश असतो हें त्याला माहीत नव्हतें. 'भुता'ला मरणही नको होतें. कारण मृत्यूची जाणिवसुद्धां कधीं तयार झाली नाहीं. ज्याला ज्याला तें स्पर्श करी तें सर्व शून्यवत् होतें. त्यांत कधीं औत्सुक्य, अपेक्षा, जाणीव नव्हती. गर्दींत उभें राहिलें तरी माणसांचें अस्तित्व त्याला कधीं जाणवत नसे. कशाचा कशाशींही संबंध नव्हता. आज ह्यावेळीं येणाऱ्या तीव्र रागाची आठवण येते तीहि मनांत उद्‌भवणारा विकार म्हणून नव्हे तर रागाच्या भरांत ज्या वस्तूला लाथा मारल्या त्या वस्तूमुळें ती येते. गालावरून ओघळणारे अश्रु आठवतात पण ते ज्यामुळें ओघळूं लागले तें दुःख आठवत नाहीं. त्या जाणीवांना शब्दच नसत आणि म्हणून त्यांच्या आठवणी राहिल्या नाहींत. कसल्याही 'सावली'ची जाणीव होण्याची शक्यता नव्हती कारण ज्या 'अस्तित्वा'ची सावली पडते तें अस्तित्वच जाणवलें नव्हतें. त्या 'भुता'ला सौंदर्य माहीत नव्हतें, आकार माहीत नव्हता, प्रमाणांची जाणीव नव्हती. कळे ती फक्त गरज नि ती भागवणें. विहिरीवर घडलेल्या त्या प्रसंगापर्यंत 'भुता'चें अस्तित्व हें असें होतें. नंतर कांहींतरी निश्चित गोष्टीकडे मन वेधूं लागलें. तरीहि ती जाणीव अगदीं प्राथमिक होती.

विहिरीवरील त्या प्रसंगानें जीवनांतलें रितेपण गेलें पण खऱ्या विश्वांत तें 'भूत' उतरलें नाहीं. वस्तु आणि नांव यांचा संबंध जोडतां येऊं लागला, स्पर्शानें 'पंप', 'जमीन', 'मूल' 'बाई' कळूं लागल्या आणि शारीरिक

गरजा स्पष्ट करतां येऊं लागल्याचा हर्ष झाला. बाईंची विलक्षण ओढ वाटूं लागली ती कृतज्ञतेच्या भावनेनें नाहीं तर निसर्गाच्या ज्या ओढीनें मूल आईच्या स्तनाकडे झेंप घेतें त्याच ओढीनें. नवनवे शब्द बाईंच्या बोटांच्या स्पर्शानें शिकण्यासाठीं. ज्या शब्दांचा उपयोग होत असे त्यांचाच विचार छोटी हेलेन करी. तिला कळलेले पहिले शब्द बर्फ वितळायला लावणाऱ्या सकाळच्या सूर्यकिरणांसारखे होते. बर्फाचा एकेक खडा वितळायला सुरुवात झाली होती. पुष्कळ नामें शिकल्यावर विशेषणें शिकण्याला सुरुवात झाली; अधिक बर्फ वितळूं लागलें. शेवटीं बाईंनीं क्रियापदें शिकवायला सुरुवात केली, कधीं एखादेंच क्रियापद तर कधीं पुष्कळ क्रियापदें एकदम; पण तिच्या मनांत अजूनही एका शब्दाचा दुसऱ्या शब्दाशीं कांहीं संबंध नव्हता, त्यांना आकार नव्हता, अर्थ नव्हता. खूप प्रयत्नांनीं हळू हळू तिनें साधे प्रश्न विचारायला सुरुवात केली. आपण वाक्यें ज्या आधारावर बोलतों तें 'काय?' 'कुठें?' 'कसें?' आणि 'कां?' तिच्या मनांत अजून शिरलें नव्हतें. पण जेव्हां तिला तें कळूं लागलें व ती एकेक प्रश्न विचारूं लागली तेव्हां बाईंच्या बोटांनीं, स्पर्शानें दिलेलीं उत्तरें मिळतांच तिचा एकाकीपणा नाहींसा झाला. त्यानंतर बाई हेलेनशीं सारख्या 'बोलत'—त्या हस्त-स्पर्शांत विलक्षण जादू होती. त्या छोट्या मुलीच्या मनांत कसले विचार चालले आहेत तें कळून घेण्यास बाईंना सर्वस्व पणाला लावावें लागत असलें पाहिजे. मुलीचें औत्सुक्य जसजसें वाढत गेलें आणि चपळतेनें तिचीं बोटें जेव्हां हलूं लागलीं तेव्हां ती बोटांची हालचाल समजावून घेतांना बाईंच्या अधू डोळ्यांना विलक्षण ताण सहन करावा लागला असणार.

जसजसा जीवनाचा अर्थ हेलेनला स्पष्ट होत गेला तसतसें तिच्यांतलें 'भूत' नाहींसें झालें. आतां आयुष्याचें दार सताड उघडलें होतें. आई, बाबा, छोटी मिल्ड्रेड, लीला आणि तिच्या दोन मुली आणि तिचें सारें सहन करून तिच्याशीं प्रेमानें वागणारीं निग्रो मुलें या निरनिराळ्या व्यक्तींच्या रूपानें जीवनाला हा अर्थ प्राप्त झाला. भाषा शिकण्यांत हेलेननें जी तथाकथित 'अद्‌भुत' प्रगति केली ती प्रगति नव्हे, तर हीं जीं जीवाभावांचीं नातीं

तिला नव्यानें आकललीं त्या नात्यांची जाणीव हाच हेलेनचा त्या कालांतला सर्वांत मोठा सुखाचा ठेवा होता.

बाईनीं पहिल्यानें हेलेनला खेळायला शिकविलें. बहिरी झाल्यापासून हेलेन हंसली नव्हती. जेव्हां हेलेन सांगितलेलें ऐकूं लागली व तिच्यांत थोडी सहिष्णुता आली तेव्हां एक दिवस बाई मोठमोठ्यानें हंसत तिच्या खोलींत आल्या. बाईनीं हेलेनचा हात धरला व तो आपल्या तोंडावर ठेवून आपण स्वतः हंसत असतां 'लाफ' या शब्दाचें स्पेलिंग बोटानें तिला शिकविलें व तिला गुदगुल्या केल्या. हेलेन हंसली. घरांतील साऱ्यांचे चेहेरे आनंदानें फुलून गेले. बाईनी याची पुनरावृत्ति केली आणि याच पद्धतीनें तिला उड्या मारणें, धावणें, घसरणें अशा क्रियांच्या अनुरोधानें ते ते शब्द शिकविले. थोड्याच दिवसांत हेलेन इतर मुलांसारखी झाली. ती आणि बाई अनेक खोड्या काढीत. बाईहि हेलेनच्या सहवासांत आपलें लहानपण पुन्हा जगत होत्या. निरनिराळ्या क्रिया, हालचाली हेलेन बाईच्या बोटांतून मिळणाऱ्या स्पेलिंगच्या आधारानें शिकत होती. हेलेनचें अवघें शरीर कसल्यातरी अननुभूत प्रकाशानें लपेटलें होतें.

हेलेनसाठीं बाईनीं कांहीं कबुतरें पाळलीं होतीं. कबुतरांना पिंजऱ्या-बाहेर सोडलें की फडफड करीत तीं साऱ्या घरभर उडत आणि बाई त्यांना पकडण्यासाठीं त्यांच्या मागें धावत. त्यांच्या पंखांच्या फडफडण्यामुळें तयार होणारा वारा हेलेनच्या लक्षांत यावा व त्यामुळें पक्षी हवेंत कसे तरंगतात व त्यांचे पंख कसे असतात हें हेलेनच्या लक्षांत यावें हा बाईचा उद्देश होता. पुढें कबुतरें हेलेनला बुजेनाशीं झालीं. तीं तिच्या डोक्यावर व खांद्यावर येऊन बसत आणि ती त्यांना खाऊं घाली. त्यांचा आकार, त्यांचे पंख चांचपडून पाही, त्यांचें घुमणें तिला आवडे. म्हणूनच तिच्या आयुष्यांत तिनें अंधत्वामुळें कधींही न पाहिलेल्या पक्ष्यांनाहि, फुलें आणि दगड यांचे प्रमाणेंच महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

हेलेनच्या घरांत माणकासारखे चकचकीत डोळे असलेले पांढरे ससे होते. बाईनीं पूर्वीं ससे कधीच पाहिले नव्हते नि त्यांचीं लुबलुब हलणारीं

नाकें बघून त्यांना मोठी गम्मत वाटे. पण ससे ज्या पद्धतीनें पाला कुरतडून खातात ती पद्धत बाईंना चुकीची वाटे व एकदां त्यांनीं पाला चावून खाण्यास सशांना शिकवायचा जेव्हां प्रयत्न केला तेव्हां आई व बाबा तें दृश्य बघून डोळ्यांत पाणी येईतों खदखदा हंसत सुटले. तसें बाईंचें प्राणिशास्त्र कच्चेंच होतें. त्यांना फक्त सहाच वर्षें शाळेंत जातां आलें. पण घरांतल्या सशांच्या वागणुकीवरून त्यांनीं व हेलेननें रानांत ससे कसे वागत असतील त्याचे आडाखे बांधले. हा त्यांचा मनोवेधक कार्यक्रम चालूच होता नि लवकरच प्रिन्स घोडा कसा खिंकाळतो तें बाईंनीं बोटांनीं स्पेलिंग करून हेलेनला सांगितलें, गाईचें हंबरणें शिकविलें व डुकराच्या डुरडुरण्याची ओळख करून दिली.

मी सांगतें हें सारें ओबडधोबड आहे याची मला कल्पना आहे. परंतु हेलेनच्या बालपणाच्या सौख्याचा तारा पुन्हा उगवलेला मला स्पष्ट दिसतो आहे.

हो, बाईंनीं आपलें सर्वस्व हेलेनला दिलें. आपला उत्साह दिला. आपली बुद्धि दिली. पुस्तकें वाचून मिळालेलें वनस्पति, प्राणी, खनिज पदार्थ यांचें ज्ञान दिलें. बाईंच्या सहवासांत जगण्यांत हेलेन गुंग होऊन गेली होती पण बाईंना आपल्या निश्चयाची जाणीव होती. त्यांनीं निश्चय केला होता कीं आंधळ्या, बहिऱ्या व मुक्या हेलेनच्या बालजीवनांतलें रितेपण ज्ञानचक्षूंनीं, बुद्धिरूप वाचेनें आणि सहवासानें नाहींसें करावयाचें. एका असहाय चिमुकल्या जीवावर आघात करून आंधळ्या–मुक्या–बहिऱ्या निसर्गानें त्या जीवाचें केलेलें नुकसान कांहीं प्रमाणांत का होईना, प्रेम आणि ज्ञान यांनीं भरून काढावयाचें. पुढें पुष्कळ काळ गेल्यावर बाईंना त्यावेळीं असेंच वाटत होतें हें माझ्या लक्षांत आलें. जेव्हां हेलेन एखादें नांव, सर्वनाम किंवा क्रियापद शोधतांना अडखळे आणि आपल्याला तें सांपडत नसल्याचें हावभाव करून दाखवी तेव्हां बाई एखादें नवें वाक्य किंवा निराळे शब्द सांगत आणि मग त्या बालमनांतील कल्पनेला पंख फुटत. हेलेन थोडी मोठी झाली तेव्हां गाणीं म्हणून बाई तिला हंसवीत, कविता म्हणून तिच्या मनाला

उत्तेजित करीत. नेहमीं शिक्षण ज्या पद्धतीनें दिलें जात त्याच पद्धतीनें बाई हेलेनला शिकवीत. प्रत्येक शब्दाचा अर्थ बाईंनीं तिला स्पष्ट करून सांगितला नाहीं. पुष्कळदां हेलेनला तो शोधून काढावा लागे.

बाईंचीं कुशल बोटें कवितांचे अर्थ स्पष्ट करीत, त्याचें सौंदर्य, त्यांतलें संगीत, समृद्ध करीत, हेलेनच्या हातांत हात घालून हर्ष, दुःख व्यक्त करीत. हळूहळू बाईंनीं दिलेलें ज्ञान वाढत गेलें व स्वतः शिकलेल्या नव्या शब्दांतून हेलेन प्रश्न तयार करूं लागली व नवे शब्द शिकूं लागली.

तिला 'स्पेलिंग' करून 'वाचून' दाखविलेल्या व तिनें स्वतः वाचलेल्या पुस्तकामुळें तिचा शब्दसंग्रह वाढत गेला. तिला पुन्हा बोलतां येऊं लागल्यावर तिला सुसंबद्ध विचार करतां येऊं लागल्यानें तिचें व्यक्तिमत्व विकसूं लागलं. पण माझ्या 'जीवन कथे'त या मुलीला शिकविण्यापूर्वींची मुलगी मीं स्पष्ट दाखविली नव्हती. ती कशी भाषा शिकत गेली तें दाखविलें नाहीं आणि बाईंचे मार्ग कसे नैसर्गिक होते तें स्पष्ट केलें नाहीं. एका आंधळ्या, बहिऱ्या व मुक्या मुलीला शक्य तितकें सामान्य माणसाच्या पातळीवर आणण्यासाठीं बाईंनीं जे परिश्रम केले त्या परिश्रमाचें त्यामुळें तेथें नीट दर्शन झालेलें नाहीं.

## ३

बांगण्यांत हेलेन फार वेंधळी, कांहीशी धसमुसळी आहे असें बाई म्हणायच्या. ती चालत असतांना दिव्यासारखी एखादी वस्तु वाटेंत आली कीं रागानें ती वस्तूच फेंकून देई. तिची ही संवय मोडायला बाईंना किती तरी दिवस लागले. मोकळेपणानें हिंडण्या फिरण्यांत हेलेनला जो आनंद वाटे त्या आनंदावर विरजण न घालतां त्यांनीं रस्त्यांत आडव्या येणाऱ्या वस्तु हळूवार उचलून ठेवण्यास तिला शिकवलें. त्यानंतर ती हळुवार हातानें मैनेला हात लावी, मांजराच्या पिलाच्या मऊ मऊ अंगावरून हात फिरवी आणि

आपल्या एक वर्षाच्या बहिणीला, मिल्ड्रेडला घेई. इतर आईबापांप्रमाणेंच बाईंना हेलेनला नीट कसें उभें रहावें, कसें बसावें, कानामागील भाग धूऊन कसा स्वच्छ ठेवावा, केंस कसे विंचरावे आणि स्वच्छ कपडे कां घालावेत तें शिकवावें लागलें. हें सारें शिकविण्यास फार वेळ लागला. कारण आपलें चुकलें आहे असें सांगितलेलें हेलेनला आवडत नसे. हेलेनचा आपल्या आजीवर भारी राग. ती तिला चिमटे काढी. तिची ही संवय घालवायला बाईंना कितीतरी दिवस तिच्या मागें लागून व तिला सारखें समजावून सांगावें लागलें. हेलेनला मार देऊन कांहीं उपयोग होत नसे. पण लहान मुलीच्या हट्टवादीपणालाहि कांहीं सीमा असतेच. तिला हातांचीं नखें कुरतडण्याची फार संवय होती. कांहीं केल्या ती, ती संवय सोडीना. एक दिवस अकस्मात् तिला कानपिचक्या मिळाल्या नि तिचे हात पाठीमागें बांधून ठेवण्यांत आले. हात बांधून ठेवल्यामुळें हेलेनला कुणाशी कांहीच बोलतां येईना. पण त्याचबरोबर हात बांधल्यामुळें वेगळ्या रीतीनें मनांतले भाग व्यक्त करण्याची तिची इच्छा बळावली हेंहि खरें. ही तिला खरीखुरी शिक्षा होती, परंतु त्या शिक्षेचें दुःख तिच्याऐवजी बाईंनाच अधिक झालें. त्यांचें वाचनांत किंवा कसल्याच कामांत लक्ष लागेना आणि त्या सारख्या इकडून तिकडे येरझारा घालूं लागल्या.

यावरून मला हेलेनच्या आणखी एका चुकीची आठवण होते. हेलेनला तोंडानें बोलतां येऊं लागल्यावरही बोटांनीं स्पेलिंग करून बोलायची तिची खोड जाईना. बाईंनीं तिला कितीहि समजावून सांगितलें तरी ती खोड सोडीना. संवयी कशा लागतात तें पुढें मीं एका ठिकाणीं वाचलें. अनेक तारांची वीण गुंफून वीजेची जाड केबल बनविण्यांत येते. इतकी जाड कीं केबल तुटणार नाहीं. तसेंच संवयींचें आहे. एक एक खोडी जडतात नि त्यांनीं मन इतकें कोडगें बनतें कीं संवयी तुटतां तुटत नाहींत.

हें कळल्यावर मींच निर्धार केला व माझे हात कागदांत बांधावयाला बाईंना सांगितलें. पण माझें जगाशीं बोलायचें एकमेव साधन नाहींसें झाल्याचें बाईंना इतकें दुःख झालें कीं त्या रडूं लागल्या. बोटाच्या भाषेंत दुसऱ्याशीं

बोलायच्या या मोहाशीं मीं अशा रीतीनें तासचे तास, दिवसचे दिवस झगडलें नि अखेरीस जय मिळविला. पण अजूनहि जेव्हां जेव्हां माझें मन फार अधीर होतें किंवा मी झोपेंतून उठतें तेव्हां माझीं बोटें शब्दांचें स्पेलिंग करण्याचा चाळा करीत रहातात.

बाईंच्या आयुष्यांतील माझ्या पहिल्या दोन वर्षांच्या काळाकडे मी पुन्हा वळतें. कित्येकदां मी शिकण्याकडे दुर्लक्ष करीं व मग बाई मला कोपऱ्यांत उभी करून ठेवीत. माझ्यामधला आळशीपणा, निष्काळजीपणा बाईंनीं विनोद आणि उपहास यांचा उपयोग करून घालविला. आपलें तेंच खरें मानण्याची माझी खोड घालविण्याचा बाईंनीं मी मोठी होईपर्यंत प्रयत्न केला आणि अजूनहि ती जुनी खोड कधी कधी डोकें वर काढते. माझ्यासाठीं बाईंनीं काय काय केलें तें स्पष्ट करण्यासाठीं मी हें सारें सांगत आहें.

आपल्या अंगावरचे फुलांचे नाजूक तलम कोष भरून यावेत म्हणून फुलझाडाचीं मुळें काळेंशार, दाट अंधारानें व गारठ्यानें भरलेलें कवच फोडून जीवनरस शोषून घेण्यासाठीं खोल खोल जात असतात. बाईंना त्या काळांत माझ्यावर संस्कार करतांना तसेंच कांहीं तरी वाटलें असेल. आपल्या व्यक्तित्वाचा प्रकाश आणि शक्ति यांचें उगमस्थान बाईंना गवसलें होतें. त्या नेहमीं म्हणत कीं त्यांच्या जीवनांतला हा काळ अतिशय समाधानाचा होता. आपलें जीवन अज्ञान आणि अमानुषता घालविण्यासाठीं खर्च करणाऱ्या त्यागी शिक्षकांचीं उदाहरणें बाई नजरेसमोर आणीत. आत्मत्यागाच्या त्या उदाहरणांतून त्यांना स्फूर्ति मिळे, शक्ति मिळे.

मीं वाचलेल्या कांहीं लेखांतून बाईंचें जें वर्णन करण्यांत आलें आहे तशा त्या ‘ मास्तरीण काकू ’ मुळींच नव्हत्या. त्या मनाच्या जिवंत होत्या व छोट्या हेलेनची वाढ घडवून आणण्यांत जें यश त्यांना मिळालें त्या यशानें त्यांच्या आकांक्षांना उत्तेजन मिळालें होतें. एका आंधळ्या, बहिऱ्या जीवाचें आयुष्य निराशेंतून काढून त्यांतून उपयोगी मानवी जीवन निर्माण करण्याचें त्यांचें स्वप्न होतें. ह्या कल्पनेनें उत्तेजित हो.न त्यांचीं बोटें

उल्कांसारखीं त्या छोट्या पोरीच्या हातावर नाचत नि त्या तेज:शलाकांचा मागोसा घेत तिचीहि इच्छाशक्ति नवी भूमि नांगरीत पुढें सरे. आजहि बाईच्या त्या विजेसारख्या बोटांच्या स्पर्शांची आठवण आल्याशिवाय माझी इच्छाशक्ति जागी होत नाहीं. माझ्यावर विनाकारण होणाऱ्या स्तुतीच्या वर्षावाचें मला खरेंच वाईट वाटतें. आंधळेपणा, मुकेपणा आणि बहिरेपणा या तिन्ही आपत्तींनीं नष्ट होत असलेलें जीवन पुन्हा उपयोगी करणाऱ्या नि त्याला आकार नि स्वरूप देणाऱ्या ॲन सलिवनच्या प्रयत्नांची कोणीं स्तुति केली म्हणजे मात्र त्या स्तुतीचा मला खरा आनंद होतो. हें कांहीं लहान काम नव्हे. कुठल्याहि दैवी चमत्कारानें हें झालें नाहीं. नर भवितव्यता घडविणाऱ्या प्रेषिताच्या अद्‌भुत दृष्टीनें आणि आंतरिक ज्योति प्रज्ज्वलित करून बुद्धाला चालना देणाऱ्या जन्मजात शिक्षकाच्या अभिजात गुणांमुळेंच हें घडून आलें.

बाईची नजर जरी नष्ट झाली तरी दृष्टि आणि कान ज्या शक्तींच्या जोरावर काम करतात त्या त्यांच्या शक्ति खूपच कार्यक्षम होत्या. हेलेनला शिकविण्यांत ॲनीचें (बाईचें) शुद्ध इंग्रजी आणि सौंदर्यप्रेम हें महत्त्वाचें होतें. त्यांच्या अपुऱ्या शिक्षणामुळें निर्माण झालेली उणीव त्यांनीं साहित्य-विषयांची अत्यंत चोखंदळ अभिरुचि, उत्तम चारित्र्य आणि चतुर संभाषण यांनीं भरून काढली. या गुणांच्या जोरावर त्यांनीं आपली गरिबी, आर्थिक अडचणी आणि रागीटपणा यांवर विजय मिळविला.

लहानपणापासून ओढवलेल्या आपत्तींना आणि नंतर पूर्ण अंधत्व आल्यावर सर्वस्वीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागल्यानें जीं संकटें आलीं त्या संकटांना तोंड देतांना त्यांना केवढें धैर्य दाखवावें लागलें असेल याची कुणाला कल्पना तरी असेल का? आपल्या भुकेल्या मनाच्या विद्यार्थिनीची दृष्टि आणि भाषा यांची उणीव भरून काढतांना त्या विद्यार्थिनीच्या व्यक्ति-मत्वाच्या विकासासाठीं त्यांनीं तिच्या सर्व गरजा पुरविल्या. त्या स्वत: कांहींशा चमत्कारिक स्वभावाच्या होत्या; पण दुसऱ्यासाठीं कांहीं करतांना ‘ जमेल तेवढें करतें ’ असें त्यांनीं कधीं सांगितलें नाहीं. चांगलें करायचेंच

या निर्धारानें त्यांनीं चांगलें केलें. त्यांच्या विद्यार्थिनीचा ज्यापासून फायदा होईल असेंच चांगलें केलें. वास्तविक इतर कुठल्याही क्षेत्रांत ॲन चमकल्या असत्या. अर्धशतकाचा सबंध काळ माझ्याबरोबर त्या कां राहिल्या याचें मला अजूनहि आश्चर्य वाटतें.

ट्यूक्सबरीच्या भिक्षागृहांत बाईंनीं घालविलेल्या आयुष्याची छाया त्यांनीं माझ्यावर कधीं पडूं दिली नाही. उलट त्यांच्या चौसष्टाव्या व माझ्या पन्नासाव्या वर्षापर्यंत हें गुपित त्यांनीं कधीं सांगितलें नव्हतें. ज्या फीडिंग हिल्स खेड्यांत त्या जन्माला आल्या त्या गांवाबद्दल नि त्यांचा भाऊ जिमी यांचेबद्दल मात्र त्या माझ्याजवळ मोकळेपणानें बोलत असत. जिमी वारला तेव्हां त्यांना विलक्षण दुःख झालें. आपली बहीण मेरी आणि इतर मुलींच्याबद्दलही त्या बोलत आणि त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितलेल्या आयर्लंडच्या लोकांच्या गोष्टी सांगत.

ज्या विश्वासानें त्या आपलें काम करीत त्याचें मला अजूनहि कौतुक वाटतें. एक आंधळा आणि बहिरा जीव कांहीं विशिष्ट मर्यादेपलीकडे सामान्य माणसासारखें जीवन जगूं शकेल अशी कोणीहि खात्री दिल्याचें आजपर्यंत आठवत नाहीं. पण बाई मात्र त्या स्वप्नाच्या पंखांवर आरूढ झाल्या होत्या. हें स्वप्न त्यांच्या हृदयांत कसें तयार झालें नि तें साध्य करून घेण्यासाठीं आपलें जीवित त्यांनीं कां खर्ची घातलें तें मला माहीत नाहीं. पण आमचीं बोटें जेव्हां एकमेकींशीं आमच्या हृदयांतील भावना व्यक्त करीत तेव्हां मला कळलें तें हें कीं दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या जीवांचा उद्धार करणाऱ्या युवतीचें जीवन जगण्याचें स्वप्न त्यांच्या नजरे-समोर होतें. हें स्वप्न साकार करण्यासाठीं त्या जगत होत्या. त्या जेव्हां एखाद्या नाजूक फुलाला हात लावीत तेव्हां माझ्याबाबत त्यांनीं हृदयाशीं बाळगलेली महत्त्वाकांक्षा मला आठवे. त्यांच्या हृदयांत असणाऱ्या त्या सुंदर स्वप्नांतूनच त्यांचें दृश्य पदार्थांच्या सौंदर्याचें प्रेम निर्माण झालें असावें.

ॲनी सलिव्हनची ( बाईंची ) अभिजात आवड खानदानी, सुसंस्कृत राहणीची होती. काम करणें हें मानवाच्या प्रतिष्ठेचें निदर्शक आहे असें त्या

समजत. आणि कुठलेंहि काम वाईट रीतीनें झालेलें त्यांना आवडत नसे. कुठेंहि कुरूपता दिसली कीं त्याबद्दल त्यांच्या मनांत अप्रीति निर्माण होई. मग ती मानवी चेहेऱ्यांत असो कीं एखाद्या जागेंत असो. पण अशा ठिकाणीं त्यांचा हात ती कुरूपता नाहींशी करण्यासाठीं पुढें होई. मानवाला अप्रतिष्ठा आणणारी गरीबी पाहिली कीं त्यांना अतिशय दुःख होई व ही गरीबी कशी नाहींशी करावयाची याबद्दलच्या विचारांत त्या रात्र रात्र जागून काढीत. एखादा सुंदर चेहेरा, दृश्य किंवा कलापूर्ण वस्तु पाहिली कीं त्या सौंदर्यानें त्यांचें हृदय हेलावे आणि त्यांच्या डोळ्यांत पाणी येई. चिनीमातीचें एखादें सुंदर भांडें किंवा एखादा सुंदर पुतळा फुटला तर जिवंत माणसाला दुखापत झाल्यासारखें त्यांना दुःख होई. एकदां बोस्टनला आम्हीं गेलों असतां त्यांना तेथें एक अतिशय सुंदर कोट दिसला. आपला सारा पगार खर्चून त्यांनीं तो विकत घेतला. 'पर्किन्स इन्स्टिट्यूट'-मध्यें सर्वांनीं आमच्यावर एवढे पैसे खर्च केल्याबद्दल टीका केली. परंतु तें सारें बाईंना असलेली सौंदर्याची आवड आणि स्वतः मिळविलेला पैसा खर्च करण्यांतील अभिमान यांमुळें आम्हीं सहन केलें.

बाईंच्या कार्यामागील प्रेरक भावना ही अशी होती हें दाखविण्यासाठीं मीं एवढें लिहिलें. सौंदर्यावर बाईंचें एवढें प्रेम नसतें तर एका छोट्या गांवीं त्या एवढ्या काळ राहिल्याच नसत्या. किती तरी वेळ त्या मला आपल्याला 'त्याच त्या' आयुष्याचा कंटाळा आल्याचें सांगत. पण त्यांना हवें असणारें तें सुंदर स्वप्न साकार करण्याचा त्यांचा निश्चय अटळ होता. त्या निश्चयाच्या बळावरच त्या तेथें राहिल्या. त्यांच्या त्याच निश्चयानें माझें बालपण आनंदांत गेलें.

माझ्या घरीं येण्यापूर्वीं डॉ. सॅम्युअल हॉव यांनीं लॉरा ब्रिजमनला कसें शिकविलें याची माहिती त्यानीं वाचली. आपली नुकतीच सुधारलेली व आधींच अधु असलेली दृष्टि बाईंनीं या वाचनांत आणखी बिघडवून घेतली. पण अंधांच्या काळोख्या जगांतील शून्यांतून मानवी जीव कसा बाहेर आणतां येईल याचा त्यांना मला शिकविण्यासाठीं अभ्यास करावयाचा होता.

या बाईंच्या त्यागाची कल्पना मला कित्येक दिवस नव्हती. मला वाचून दाखवतां दाखवतां बाईंच्या डोळ्यांवर आणखी ताण पडे नि त्यांचें डोकें दुखूं लागे. त्यांना मळमळ सुटे. पण आपल्या डोळ्यांबद्दल बाई कधींहि बोलल्या नाहींत. जरा बरें वाटतांच बाई उठून बसत व त्यांचीं बोटें मला शिकवूं लागत.

जेव्हां बाईंनी पहिल्यानें आपल्या डोळ्यांबद्दल मला सांगितलें तेव्हां मी नऊ वर्षांची होतें. डोळे तपासून घ्यायला आपल्याला बोस्टनला गेलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या बोलण्याचा अर्थ तेव्हांहि माझ्या नीटसा लक्षांत आला नाहीं. माझ्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, ज्या डोळ्यांची बाईंनीं सतत काळजी घ्यावयास हवी होती त्यांची त्यांनीं विलक्षण आबाळ केली होती. त्यांचे डोळे पुनः पुन्हा जेव्हां दुखूं लागले तेव्हां बाईंना मीं त्याचें कारण विचारलें. ‘ उन्हाचा त्रास होतो ’, ‘ मी फार वेळ लिहीत बसलें होतें. ’ अशीं कारणें बाई मला सांगत. पण एकदां आपल्या डोळ्याला चिकटवून बाई पुस्तक वाचताहेत हें माझ्या लक्षांत आलें आणि त्यांना मीं कारण विचारलें. तेव्हां त्यांनीं खरें उत्तर दिलें. त्या म्हणाल्या, “ सकाळीं जेव्हां भरपूर प्रकाश असतो, तेव्हांच फक्त मला दिसतें.” तेव्हांपासून मीं ठरविलें कीं, यापुढें बाईंचें वाचन फक्त सकाळींच. नंतर मी त्यांना फिरायला घेऊन जावयास किंवा गोष्टी सांगावयास सांगें. एकदां बाई दुपारीं पुस्तक वाचीत असल्याचें माझ्या लक्षांत आलें. मला त्यांच्या हातांतील तें पुस्तक उडवून द्यावेंसें वाटलें. परंतु भलत्याच कशाला तरी आपल्या हाताचा तडाखा लागेल, या भीतीनें मीं तसें केलें नाहीं. “ आतां मला एक इंचावरचेंहि दिसत नाहीं.” बाईंनीं शेवटीं कबूल केलें. आपल्याला ज्ञान देण्यासाठीं बाई आपल्या डोळ्यांवर एवढा क्रूर भार टाकीत होत्या, हें माझ्या लक्षांत यायला कित्येक वर्षें जावीं लागलीं. मी मोठी झाल्यावर बाईंच्या ह्या त्यागानें माझ्या हृदयावर विलक्षण दडपण पडलें. परंतु मला आपली असमर्थताहि कळत होती नि त्या क्रूर जाणिवेनें मला अधिक दुःख होत होतें.

आपल्या विद्यार्थिनीला सामान्य माणसासारखें बोलतां यावें याची बाईंना फार ओढ होती. त्या म्हणत, " भाषेशिवाय मनुष्यत्व येत नाहीं आणि बोलतां आल्याशिवाय मनुष्यत्व पुरें होत नाहीं. " मला बोलायला शिकविण्यासाठीं बोस्टनमधील मिस् सारा फुलर यांचेकडून पहिले अकरा धडे घेतल्यावर बाईंनीं हें काम स्वतःवर घेतलें. पण त्यांना या जबाबदारीची भीति वाटे. उच्चार करण्याचे आधीं माझ्या घशांतील स्नायु कार्यक्षम होतील असें कांही करायला हवें होतें. या बाबतींत बाईंनीं आणि मिस् फुलरनें निष्काळजी राहण्याची चूक केली होती नि त्यामुळें माझे शब्द स्पष्टपणें बाहेर येत नसत. परंतु आपल्याला बोलायला येतें याचा मला विलक्षण आनंद झाला.शब्दांचे अभावीं अडखळून पडणारे विचार आतां बाहेर येऊं लागले. आपल्या घरचीं माणसें आपले शब्द समजूं शकतात हें पाहून मला विलक्षण आनंद झाला. आपल्या विद्यार्थिनींतील नव्या जीवनाच्या ह्या छटा पाहून बाईंनाहि विलक्षण आनंद झाला. त्या म्हणत, "हेलेनला जर सर्वसाधारण माणसासारखें बोलतां आलें तर केवळ या जगांतलेंच नाहीं तर आणखी पुढील जगांतील सारें सौंदर्यहि मी त्यावरून ओवाळून टाकीन. " हेलेन अशा शब्दांनीं गहिवरून म्हणे, " छे, छे बाई " पण पूर्णत्वाचें बाईंचें वेडच मोठें होतें. आपल्या जीवनाचें सर्वस्व देऊन हें पूर्णत्व गांठावयाचा बाईंचा स्वभाव होता. दिवसचे दिवस, वर्षांचीं वर्षें बाईंनीं माझे शब्दोच्चार आणि आवाज यांत पूर्णत्व आणण्यासाठीं खर्च केले. मी करणार असलेल्या अंधांच्या सेवेसाठीं तो आवाज समर्थ केला.

आवाज ज्या स्नायूंनीं तयार होतो त्यांचें ज्ञान आपणास नव्हतें नि त्यामुळें माझ्या लहानपणींच माझ्या त्या स्नायूंची तयारी करून घेतली गेली नाहीं म्हणून बाईंना फार दुःख होत असे. मला संगीताचे धडे देणाऱ्या मि. व्हाईट यांचेकडून त्यांनीं ही माहिती करून घेतली. नंतर त्या बोलत आणि आपल्या तोंडावर माझे दोन्ही हात ठेवीत, म्हणजे तेथील स्नायूंची हालचाल माझ्या लक्षांत येई. मग आम्ही दोघी मिळून शब्द उच्चारीत असुं व मग पुन्हा, पुन्हा, पुन्हा तेच ते शब्द उच्चारीत असूं. माझी भीति जाऊन

माझा आवाज मोकळा होईपर्यंत आम्ही शब्द, वाक्यें पुनः पुन्हा उच्चारीत असूं. बाई प्रयत्न करीत होत्या आणि पूर्णत्वाचें स्वप्न बघत होत्या. तें प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्या करीत असलेले श्रम मला अतिमानुष वाटत होते. माझ्या ओठावर हात ठेवून त्या त्यांचा आकार योग्य कसा असावा तें दाखवीत, माझें तोंड कसें हलतें तें बघत, माझा चेहेरा सर्वसाधारण माणसासारखा कसा राहील तें सांगत. माझे शब्द वेडेवाकडे का असेनात, पण मी ते बोलत होतें व इतरांना ते कळत होते ह्यांत माझा मनुष्य म्हणून केवढा तरी उपयोग होता. ह्या अमोल देणगीबद्दल मी बाईंची, ॲनी सलिवनची ऋणी आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४ ................ वि: ...... ......
क्रमांक ......................... नों: दि: ......... ...

मला बोलतां येऊं लागलें तशी स्वतःच्या मानसिक बाल्यावस्थेंतून मी बाहेर पडलें. आणि प्रथमच माझ्यांतील वेगळा, सुजाण व कांहींसा आत्मनिर्णयकारी ‘ मीपणा ’ जागा झाला. माझ्यांत तयार झालेली ही स्वतःबद्दलची जाणीव बाईंच्या लक्षांत आली नि ती जाणीव न दुखावतां ती अधिक उच्च विचाराकडे कशी वळवतां येईल ह्यासाठीं त्यांनीं प्रयत्न सुरू केले. मला स्वातंत्र्य हवें होतें. बाईंनीं तें देतां येईल तेवढें दिलें. मी जेव्हां जेव्हां स्वतंत्र होण्याच्या गप्पा मारी तेव्हां तेव्हां मी इतरांपेक्षां कशी निराळी आहें, हें त्यांच्या लक्षांत येई. त्या म्हणत “माझी दृष्टि अधू असल्या-मुळें, मला ऐकायला येतं तरी मला मदत लागते. लक्षांत ठेव, कांहीहि झालं तरी खरं स्वातंत्र्य तुझ्या मनांत आणि हृदयांतच तुला मिळेल.”

“ मला आतां वाचतां येतं, मी सर्व पुस्तकं वाचून काढीन.” मी म्हणें.

“ स्वतंत्र होण्याचा हा फार छान मार्ग आहे.” बाई म्हणत, “ पण तो पुरेसा नाहीं. तूं पुस्तकांतला किडा बनलीस तर जगाला तुझा काय

उपयोग ? तुझ्या पुस्तकांचा तूं इतरांना आनंद देण्यासाठीं कसा उपयोग करतेस तें पाहूं."

वॉल्टर स्कॉटच्या छोट्या मैत्रिणीची गोष्ट मग बाईंनीं मला सांगितली. ही छोटी मुलगी स्कॉटच्या कविता इतरांना वाचून दाखवून त्यांचीं मनें आनंदित करी. मीहि पुष्कळ कविता शिकलें नि त्या पाठ केल्या. मला आवडणाऱ्या कविता व गोष्टी पाठ करण्याला बाई मला उत्तेजन देत.

पुष्कळदां मी 'लास्ट डेज ऑफ पॉंपी 'सारखें पुस्तक वाचीत असलें म्हणजे बाईंच्या हातीं सापडे. त्यांना भलतें सलतें पुस्तक माझ्या हातीं असलेलें चालत नसे. कांहीं वेळा बागेंतील फुलांचा मधुर वास दरवळत असला कीं मोहित होऊन मी तेथें बसून राही. त्या ओरडत, "सुंदर शब्दांचीं नि विचारांचीं इतकीं पुस्तकं पडलीं आहेत नि तूं मात्र इथें एखाद्या खुंभासारखी अगदीं निर्विकार चेहेरा करून बसली आहेस." मग सबंध दिवस त्या माझ्याशीं बोलत नसत. पुन्हा मात्र त्या रागवत नसत. हंसून त्या म्हणत "चल, मोठमोठे शब्द बोलायची आपण संवय करूं या."

आम्ही एकदां बोस्टनला गेलों असतां आमचे एक कलावंत मित्र आल्बर्ट मन्सेल मला म्हणाले : "तुझे हात कलावंताचे आहेत. एखाद्या पुतळ्यावरून ते फिरवूं लागलीस कीं तुला किती आनंद होतो हें मला समजतं. शिल्पकला तुला शिकतां येईल कीं नाहीं तें प्रयत्न करून कां बघत नाहींस ?"

ह्या शब्दांनीं बाईंना व मला एखादा नवा शोध लागल्याचा आनंद झाला. मला शिल्पकला कशी शिकवतां येईल ह्याची खटपट त्या करूं लागल्या. सुरुवातीला आम्ही दोघींनीं मेणाच्या वस्तू केल्या व नंतर चिकण-मातीला हात लावला. मी करीत असलेल्या कपबशा, टोपल्या, फळें इत्यादींचे आकार पाहून त्यांना कौतुक वाटे. पक्ष्यांचे आकार मी जेव्हां करूं लागलें तेव्हां नव्या आशेनें त्या भारल्या गेल्या. मला त्या म्हणाल्या, "फुलांना हात लावतेस तशा नाजुक हातानें वस्तू चाचपडून बघ. नंतर ती वस्तू

सारखी सारखी मनांत आण, माझा आवाज लक्षांत ठेवतेस तशीच ती लक्षांत ठेव नि मग चिकणमातीनें तो आकार जशाचा तसा तयार कर." मी थकून जाई. पण मला त्यांना बरें वाटेल तें करावयाचें होतें. त्या मला यशस्वी शिल्पकारांचीं चरित्रें वाचून दाखवीत व त्यांनीं यशस्वी होईपर्यंत निश्चयानें कसे प्रयत्न चालू ठेवले तें सांगत.

एकदां एका वेलीचा आकार मला नीट येईना. त्यांनीं मला पुन्हा पुन्हा काम करायला लावूनहि मला तें जमेना. त्या रागावल्या व रागाच्या भरांत त्यांनीं चिकणमातीचा गोळा माझ्या गालावर फेकून मारला. नंतर कांहीं वेळानें त्या माझ्याजवळ आल्या नि म्हणाल्या, "मला क्षमा कर हेलेन मी तुझ्यावर इतकं प्रेम करतें कीं तूं बहिरी आणि आंधळी आहेस ह्याची कल्पनाच मला सहन होत नाहीं. पण तूं माणूस आहेस ह्याची मीं जाणीव ठेवली पाहिजे व अधून मधून तुला विश्रांति घेऊं दिली पाहिजे."

## ५

बाईंच्या व्यक्तित्वाला सौंदर्य पूजेचें जें अस्तर होतें तें मी चांगलें ओळखीत होतें. पण ह्याखेरीज त्यांच्या व्यक्तिमत्वाचे निराळे पैलू मला जाणवूं लागले. तेव्हां माझें वय पंधरा वर्षांचें होतें नि त्यांचें एकोणतीस. मी जसजशी मोठी होत गेलें तसतशा त्यांच्या स्वभावांतील सर्व छटा माझ्या परिचयाच्या होत गेल्या व त्यामुळें भविष्यकाळीं आपत्तींना मी तोंड देऊं शकलें.

पंधराव्या वर्षीं जेव्हां मी त्यांना जवळून पाहूं लागलें तेव्हां त्यांचे भाव सतत बदलतात हें माझ्या लक्षांत आलें. "मी जें तुला सांगतें आहें तें पुन्हा बोलूं नकोस." त्या मला सांगत. इतर स्त्रियांनीं सांगितलेल्या कंटाळवाण्या कटकटींचा त्यांना कसा वीट येतो तें त्या सांगत. एकमेकींच्या

सहवासांत आम्ही अनेक अवस्थांतून जगलों. पुष्कळ वेळां प्रसिद्ध लोकांच्या सहवासांत आम्ही असूं. त्यांत कांहीं सुंदर स्त्रियाहि होत्या. त्या स्वभावानेंहि चांगल्या असत. पण त्यांच्या भाषणांनीं बाई चिडत. ज्यांत सौंदर्य आणि सौष्ठव नाहीं असे शब्द किंवा हालचाल बाईंना सहन होत नसे. ज्यांना ह्या गुणांचा विकास करण्याची कधीं संधीच मिळाली नाहीं त्या गरिबांचे अंगीं हे नसले तर त्यांना कांहीं वाटत नसे. पण ज्यांना सर्व अनुकूल असूनही हे दोष घालवितां आले नाहींत त्यांचा त्यांना राग येई.

त्यांना कधीं कधीं अतिशय एकाकी वाटे. त्यामुळें त्यांचेवर प्रेम करणाऱ्या व्यक्तींच्या प्रेमाची दखल घेण्यासही त्या असमर्थ होत. अशा वेळीं त्या राईत जाऊन बसत किंवा पाण्याजवळ असल्या तर किनाऱ्यावर ठेवलेल्या रिकाम्या होड्यांआड तासचे तास लपून बसत. पण मग त्या परत येत नि सुहृदांची क्षमा मागत. अशा मनोव्यापारांची कल्पना पुष्कळांना नाहीं नि म्हणून मी सारें सांगत नाहीं. पर्किन्स संस्थेंत असतांना त्यांना अशी लहर येत असे व सर्व जन्मभर अधून मधून त्या अशा वागत पण मग त्या स्वतःवर ताबा मिळवीत व आपल्या अडचणी स्पष्टपणें समजावून घेऊन त्यांतून मार्ग शोधीत.

बाईंचें बोलणें तर्कशुद्ध नव्हतें. पण वाद घालून त्यांत विजयी होणारी माझ्या माहितीची बाई ही एकच स्त्री आहे. जेव्हां त्या स्पष्टपणें आपलीं मतें मांडीत किंवा उत्साहानें बोलूं लागत तेव्हां त्यांच्या तिखट उत्तरांची जाणीव ऐकणाराला होत असे. शिक्षण, राजकारण, अर्थशास्त्र अशा अतिपरिचयाच्या विषयांचा त्यांना कंटाळा येई पण मार्क ट्वेन किंवा डॉ. अलेक्झांडर ग्रॅहम बेल ह्यांच्या भाषणानें त्या उत्साहित होत. मला त्या निरुत्तर करतील ह्याची खात्री असल्यानें मी त्यांचेशीं वाद घालायचें नेहमीं टाळीत आलें.

बाई कविताहि सुंदर करीत. माझी खात्री आहे कीं त्यांची दृष्टि चांगली असती तर काव्यांतून निसर्गाच्या सौंदर्याशीं त्या एकरूप झाल्या असत्या.

# ६

बाईंचें व्यक्तिमत्व स्पष्ट होण्यासारखे आणखी कांहीं प्रसंग माझ्या लहानपणीं घडले. १८९७–९८ च्या हिंवाळ्यांत आणि उन्हाळ्यांत आम्हीं आमचे स्नेही श्री. व सौ. चेंबर्लिन ह्यांच्या रेंथॅम येथील घरीं राहावयास गेलों. ते आठ महिने आपल्या आयुष्यांतील अतिशय सुखाचे होते असें बाई म्हणत. माझ्याकडे आल्यापासून प्रथमच त्यांना असें स्वातंत्र्य मिळत होतें.

मध्यंतरीं 'फ्रॉस्ट किंग' वादळानें बाई अतिशय निराश झाल्या होत्या. मी दहा वर्षांची असतांना 'फ्रॉस्ट किंग' नांवाची गोष्ट लिहिली होती. मीं जेव्हां ती गोष्ट लिहिली तेव्हां मीं माझ्या कल्पनेंतूनच ती रचली ह्याबद्दल माझी खात्री होती. पर्किन्स इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर मि. ॲनॉगमास ह्यांना मीं ती गोष्ट वाढदिवसाची भेट म्हणून पाठविली. त्यांना ती इतकी आवडली कीं, त्यांनीं ती प्रसिद्ध केली. ती प्रसिद्ध झाल्यावर मात्र माझ्या आणि बाईंच्या छातींत धस्स झालें. ती गोष्ट मिस् मार्गारेट केनबाय्च्या 'बर्डी अँड हिज् फेअरी फ्रेंड्स' ह्या पुस्तकांत पूर्वीं प्रसिद्ध झालेली होती. बाईंच्या खेरीज कोणी तरी दोन-तीन वर्षांपूर्वी ती मला वाचून दाखविली होती. ती माझ्या मनांत घोळत होती, पण मीं जेव्हां ती लिहून काढली, तेव्हां आपल्याला इतर कोणीं ही गोष्ट सांगितली आहे हें मला आठवलें नाहीं व माझी म्हणून मीं ती गोष्ट दिली. मिस् केनबाय् फार समजूतदार होत्या व इतरहि स्नेह्यांना आमचें म्हणणें पटत होतें. माझ्या मनांतील निराशा घालवून मला पुन्हा लेखनप्रवृत्त करण्यासाठीं बाईंनीं 'युथ्स कंपॅनियन' ह्या नियतकालिकासाठीं मला आपलें आत्मचरित्र लिहावयास सांगितलें. परंतु माझ्यानें आतां लिहून होईना. आपण वाचलेलें दुसऱ्याचें लिखाण नकळत आपल्या हातून आपलें म्हणून लिहिलें जाईल अशी मला सारखी भीति वाटत असे. मुलें आपल्या मनांतील इतरांनीं दिलेल्या कल्पना इतरांची नक्कल करूनच व्यक्त करतात, हें ज्यांच्या

लक्षांत येत नाहीं, अशांनीं माझ्यावर जी टीका केली, त्यामुळें बाईंना फार दुःख झालें.

आतांपर्यंत माझ्या शिक्षणाची योजना मोठ्या आत्मविश्वासानें बाईंनींच आंखली होती. आतां तो मार्ग संपल्यासारखें त्यांना वाटे. पण माझें मन इतर कुठें तरी भटकत न ठेवतां शिक्षणावर केंद्रित करूनच त्याचा विकास केला पाहिजे हा त्यांचा निश्चय होता. तज्ज्ञांचे देखरेखीखालीं आतां माझें शिक्षण झालें पाहिजे असें त्यांना वाटे. पर्किन्स इन्स्टिटय़ूटमध्यें वाङ्मय-चौर्याच्या आरोपाच्या चौकशीस मीं तोंड दिलें होतें. मला आतां तिथें राहावयाचें नव्हतें. पण मी जाणार कुठें? आणि माझ्या शिक्षणाच्या नव्या प्रयोगांत बाईंना पदोपदीं जो सल्ला लागला असता तो तरी पर्किन्स-खेरीज त्यांना इतरत्र कुठें मिळाला असता?

१८९३ च्या हिंवाळ्यांत आम्ही हल्टन येथील मि. विल्यम वेड ह्यांचे घरीं गेलों असतां मला हवें तें शिक्षण देण्याची संधि मिळेलसें बाईंना वाटलें. मि. वेड ह्यांचे शेजारीं मि. आयर्न्स नांवाचे लॅटिन भाषेचे तज्ज्ञ राहात असत. त्यांनीं मला शिकवायचें कबूल केलें. मि. आयर्न्सच्या तज्ज्ञ नि वैशिष्टयपूर्ण हातोटीनें माझ्यांतली खरी विद्यार्थिनी जागी झाली. बाईंना नेमकें हेंच हवें होतें. ते मला अंकगणितहि शिकवीत. मीं टेनिसनचें 'इन् मेमोरियम्' संपविलें. परकी भाषांवर प्रभुत्व मिळविण्याच्या गोड स्वप्नांवर मी तरंगूं लागलें. परंतु हल्टनचें आमचें वास्तव्य तीन महिन्यांतच संपलें आणि बाईंना पुन्हा सुकाणूं गेलेल्या नावेसारखें वाटूं लागलें. त्या पुन्हा मला काय शिकतां येईल ह्यासाठीं चौकशी करूं लागल्या. माझे वडील बाईंना कित्येक वर्षें पगार देऊं शकले नव्हते. परंतु बाई माझ्याशीं त्याबद्दल कांहींच बोलल्या नाहींत. माझ्या ओळखीच्या लोकांत बाईंच्याएवढें दरिद्री दुसरें कोणी नव्हतें. जेव्हां मी मोठी झालें तेव्हां त्यांचें एक तत्त्व माझ्या लक्षांत आलें. त्यांना असें वाटे कीं एखाद्याच्या खिशांत एक पैहि नसली तरी हरकत नाहीं. त्यानें इभ्रतीनें, मान वर करूनच उजाडत्या दिवसाचें स्वागत केलें पाहिजे, आणि आकाशाला गवसणी घालणारी महत्त्वाकांक्षा ठेवली पाहिजे. निर्धनतेच्या

भीतीपेक्षां त्यांना माझें शिक्षण कसें पुरें होईल ह्याचीच धास्ती अधिक वाटत होती. माझ्यासाठीं त्या सतत खटपट करीत असत. आम्हाला बहिऱ्यांच्या परिषदेस जातां यावें म्हणून डॉ. बेल्सारखे सुहृद् पैसे देऊन मदत करीत असत. मला सामान्य माणसासारखें बोलतां यावें म्हणून त्या मला 'राइट ह्युमासन स्कूल फॉर द डेफ' ह्या शाळेंत न्यूयॉर्कला घेऊन गेल्या. पण आमच्या पदरीं निराशाच यायची होती. तिथलें स्नेहाचें वातावरण माझ्या आठवणींत कायम राहिलें तरी माझ्यावर आणि बाईंच्यावर प्रेम करणारे बोस्टनचे मि. जॉन स्पॉल्डिंग ह्यांच्या मदतीनेंच मला तिथलें शिक्षण घेणें शक्य झालें.

ह्यावेळीं मी सोळा वर्षांची होतें आणि कॉलेजांत जावयाचें ठरविलें होतें. मी कॉलेजांत न जातां रॅडक्लिफ कोर्स पुरा करावा व इंग्लिश वाङ्मयाचा विशेष अभ्यास करावा असें पुष्कळ सुहृदांनीं मला समजावून सांगितलें. परंतु बाईंच्या पाठिंब्याच्या आधारावर मीं कॉलेजांतच जावयाचें ठरविलें. एखाद्याच विषयाचें सखोल ज्ञान मिळविण्याइतकी माझी तयारी आहे असें मला वाटत नव्हतें व निव्वळ मी इतर सामान्य माणसांसारखी नाहीं म्हणून कुणीं कांहीं सांगितलें तरी तें ऐकावयास मी तयार नव्हतें. ज्यांना दृष्टि आहे आणि ज्यांना ऐकायला येतें अशा मुलींशीं स्पर्धा करून सर्वसामान्य ज्ञान मिळवावें व मग कोणत्या क्षेत्रांत काम करावयाचें तें ठरवावें हें मला अधिक पसंत होतें. माझ्या ह्या मार्गांत बाईंनीं किती निष्ठेनें व निग्रहानें मला पाठिंबा दिला! आज माझ्या तें लक्षांत येतें. माझें बरोबर होतें कीं चूक तें बाईंनीं मला कधींच सांगितलें नाहीं. त्यांची धाडसी मनोवृत्ति ह्यावेळीं उसळून वर आली. मला काय शिकवायचें ह्याचा सतत विचार केल्यानंतर माझा मींच निर्णय घेतलेला पाहून त्यांना हायसें वाटलें. केंब्रिजला मी तयारी करीत असतां, आपण एखादें भाड्याचें घर घेऊन एकत्र राहूं आणि घरकाम करायला ब्रिजेट क्रिमिन्स आमच्याबरोबर येऊन राहील असें त्या ठरवीत होत्या. ब्रिजेट आयरिश होती नि तिच्यावर आम्हा दोघींचेंहि प्रेम होतें.

इतर मुलींशीं स्पर्धा करून उच्च शिक्षण घेण्याच्या माझ्या निर्णयाला इतर लोक मान्यता देतील; सद्हेतूनें वागणारीं पण इतरांच्या व्यवहारांत नेहमीं

तोंड घालणारीं माणसें मला त्रास देणार नाहींत व माझ्यावर टीका करणारांचीं तोंडें बंद होतील अशी बाईंची तिहेरी भावना होती. पण तसें झालें नाहीं. इथें बाईंनीं माझ्यासाठीं केलेल्या कांहीं गोष्टींचा उल्लेख मला करावयाचा आहे. मला आयुष्यभर त्यांचा फायदा झाला.

अंध हे सामान्य माणसापेक्षां निराळे नाहींत आणि त्यांच्या आवडी-प्रमाणें व लायकीनुसार त्यांना शिक्षण मिळण्याचा, करमणुकीचीं साधनें मिळण्याचा व व्यवसाय मिळण्याचा अधिकार आहे अशी बाईंची दृढ श्रद्धा होती. म्हणूनच आम्हां दोघींना अंधांच्या पर्किन्स इन्स्टिटयूटमध्यें ठेवण्याचा मि. ॲनाग्नास ह्यांचा बेत त्यांनीं अमान्य केला. मि. ॲनाग्नास आमचे हितचिंतक होते. माझें त्यांच्यावर प्रेम होतें. कारण बाईंना त्यांनींच माझ्याकडे पाठविलें होतें. पर्किन्समध्यें मला कांतीव उठावदार अक्षरांच्या छपाईचीं पुस्तकें मिळालीं होतीं व तेथील अंध विद्यार्थी माझ्या हातांत बोटांनीं स्पेलिंग करून माझ्याशीं बोलत व माझ्याशीं मैत्री ठेवीत. पण ज्या अंधांना सामान्य माणसासारखें सर्वसाधारण परिस्थितींत जगतां येत असेल त्यांना संस्थेंत ठेवण्याच्या बाई विरुद्ध होत्या. जेव्हां आम्हीं संस्था सोडली तेव्हां मि. ॲनाग्नास ह्यांनीं आमचा संबंध सोडला. ' राइट ह्युमासन स्कूल फॉर द डेफ ' मध्यें मी जरी सुखी होतें नि म्हणून बाईंना बरें वाटत होतें, तरी त्या संस्थेंतहि मीं राहावें असें त्यांना वाटत नव्हतें. म्हणूनच त्यांनीं मला केंब्रिजच्या मुलींच्या गिल्मन प्रिपरेटरी स्कूलमध्यें इतर सर्व मुलींबरोबर घातलें. मी इतर सर्व मुलींबरोबर सामान्य मुलीसारखी राहीन ह्याची त्यांना खात्री होती. त्यांचा हा निर्णय बरोबर असल्याचें पुढें काळानेंच ठरविलें. पण माझ्या आयुष्याच्या मार्गांत हस्तक्षेप करणारांपासून मला वांचविण्या-साठीं बाई फार निग्रहानें वागल्या. आम्ही दहा वर्षें एकत्र जीवन जगल्या-नंतरहि गिल्मन स्कूलमध्यें आमची एकमेकांपासून ताटातूट करण्याचे प्रयत्न करण्यांत आले. तसें करणारांनीं आमच्या भावनांचा विचारहि केला नाहीं. शाळेंत मीं किती वर्षें राहावें ह्यावर हे मतभेद झाले. पहिल्यानें असं ठरलें होतें कीं मी पांच वर्षें शाळेंत रहावें, पण माझ्या अभ्यासाची प्रगति पाहून ॲसिस्टंट प्रिन्सिपॉलनें असें सुचविलें कीं तीन वर्षेंही पुरे होतील. मलाहि

तें बरें वाटलें नि बाईंनाहि. माझी व्यवस्था कशी करावयाची ह्यावर बाईंचे आणि मि. गिल्मन ह्यांचे मतभेद झाले. आलेल्या कटु अनुभवांअंतीं बाईंना एक ठाऊक झालें होतें कीं आम्हांला मदत करण्यासाठीं पुढें येणारे लोक शेवटीं स्वार्थासाठींच माझा उपयोग करीत आणि पुढें घडलेल्या घटनांवरून मलाहि असें वाटतें कीं हा आरोप मि. गिल्मन ह्यांचेवर लागू होतो.

माझ्या हिताचा नि प्रगतीचा रात्रंदिवस विचार करणाऱ्या व्यक्तीला वाईट वागणूक मिळण्याचें माझ्या नाशिबीं पुन्हा आलें. बाईंच्या विरुद्ध कट रचण्यांत आले. आपल्याभोंवतीं असे कट रचले जात असतांहि बाई वर्गांत माझ्याजवळ बसत आणि प्रत्येक शिक्षकाच्या सूचना मला ' स्पेलिंग ' करून समजावून सांगत. मला हवे असणारे शब्द आपल्या अतिशय अधू झालेल्या डोळ्यांनीं फ्रेंच किंवा जर्मन शब्दकोषांतून शोधून काढीत. जें ब्रेल लिपींत नसे तें सर्व वाचून त्या मला समजावून देत. ग्रीक लिहिण्यासाठीं मला हवें असणारें सामान लवकर आलें नाहीं. बाई ब्रेलमध्यें पदार्थ-विज्ञानांतलीं व बीजगणितांतलीं प्रमेयें माझ्यासाठी लिहीत आणि भूमितीच्या आकृति कडक कागदावर माझ्यासाठीं कोरीत. बाई माझ्यासाठीं हें सर्व करीत असतांनाच कांहीं कृष्णहृदयें आमची ताटातूट करण्याचीं कारस्थानें शिजवीत होतीं. हे दुःखद प्रसंग मीं इतरत्र लिहिले आहेत, पण एक प्रसंग मात्र मी मरेपर्यंत विसरणार नाहीं.

त्या भयंकर रात्रीं माझी आणि बाईंची ताटातूट करण्याचें कारस्थान मि. गिल्मन ह्यांनीं चालू केल्याचें बाईंना कळलें, तेव्हां आमचे खरे हितचिंतक मि. व मिसेस रिचर्ड डर्बी फुलर ह्यांना भेटण्यासाठीं त्या बोस्टनला निघाल्या. त्या भयंकर चिंताक्रांत झाल्या होत्या! चार्ल्स् रिव्हर नदीजवळ आल्याबरोबर नदींत उडी टाकण्याची अनिवार इच्छा त्यांना झाली. त्या इच्छेपासून परावृत्त होणें त्यांना फार कठीण होत होतें! पण एखाद्या देवतेचा हात जणूं त्यांना स्पर्शून अडवून सांगत होता कीं, " थांब, आतांच नको." त्यानंतर त्या केंब्रिजला परत आल्या नि मला नि माझी बहीण ह्यांना भेटल्याशिवाय किंवा जबरदस्तीनें उचलून फेंकून दिल्याशिवाय

करायला मिळावा हाहि उद्देश होता. त्या कुटुंबांतलीं सारीं माणसें इतकीं स्पष्ट बोलत कीं मला त्यांच्या ओठांवर हात ठेवून सारें समजे. मोठ्या मुलांच्यापैकीं बेटी नांवाची मुलगी बोटांनीं स्पेलिंग करूं शके. माझी बहीण मिल्ड्रेडप्रमाणेंच तीहि माझी चांगली मैत्रीण झाली. वयाच्या मानानें ती बरींच प्रौढ पुस्तकें वाचीत असे. मला घराबाहेर नेऊन इतर मुलांच्याबरोबर खेळायला लावण्यासाठीं ती कांहीं ना कांहीं हिकमती शोधून काढी. जेव्हां आम्ही खेळून खेळून थकत असूं तेव्हां लहान मुलें माझ्याभोंवतीं गोष्टी सांगा म्हणून गिल्ला करीत व मग मीं सांगितलेल्या गोष्टींत तल्लीन होऊन जात. मी सर्व मुलांसारखी राहातें हें पाहून बाईंना बरें वाटलें. त्यांच्या मनावरचें दडपण त्यामुळें कमी झालें. आपल्या श्रमाचें योग्य मूल्यमापन ह्या घरांत होत आहे ह्याची त्यांना जाणीव झाली. त्यांचेंभोंवतीं सर्वत्र साधेपणा, निरामय सहानुभूति आणि ग्रामीण वातावरणांतील दिलखुलास प्रसन्नता भरली होती. वसंत ऋतु आला आणि अनेक वर्षांचें निराशेचें ओझें आपल्या डोक्यावरून उतरल्यासारखें बाईंना वाटलें. त्यांच्या ठिकाणीं पूर्वींची सहजसुलभता व चपळाई आली. थोडीशी सहानुभूतिशील वागणूक, थोडी सहनशीलता नि थोडासा विनोद एवढ्या अल्पगोष्टींनींहि त्यांच्या अंतःकरणाचा पीळ कसा सुटत असे हें पाहणेंहि मोठें हृद्य होतें. मे महिना आला तेव्हां त्यांच्या हृदयांतून आनंद ओसंडून वाहत होता. त्यांच्या नसानसांतून कसलेंतरी नवें रक्त खेळूं लागलें होतें.

'रेड फार्म' ही जागा 'किंग फिलिप्स पॉंड'च्या किनाऱ्यावर होती. लुसलुशीत हवेंत किनाऱ्यावरील वृक्षाखालीं बसून मावळत्या सूर्याच्या किरणांनीं झाडांच्या पानांत गुंफलेलें रंगसंगीत ऐकणें किंवा पाण्यावर लसलसणारी सुवर्णशोभा पाहात राहाणें मोठें आल्हाददायक असे. बाईंची तर समाधीच लागे. थोडीशी झाडी, इकडचे तिकडचे खडक आणि छोट्या डोंगरांच्या ओंजळींत विसावलेला छोटासा तलाव ह्यांनीं बाईंपुढें निसर्गशोभेचे किती विविध रांजण उपडे केले होते! अंतराळांत दूरवर उडणारे पक्षी त्यांना दुर्बिण लावल्याशिवाय दिसत नसत, परंतु पक्ष्यांचें किलबिलणें त्यांना नादमुग्ध

करून सोडी व ते आवाज, तें पाणी, तें डोंगर आणि तें आकाश ह्यांनी बाईंवर कसलातरी जादूटोणा केला होता.

मि. चॅंबर्लिन ह्यांचें काम 'बोस्टन ट्रॅन्स्क्रिप्ट' साठीं लेखकांचीं हस्तलिखितें ऐकणें हें होतें व त्यामुळें त्यांचेकडे नेहमी लेखक, कवि, नट, टीकाकार ह्यांची ये जा असे. त्यांच्या चर्चा ऐकून बाई उत्साहित होत. त्या उत्साहानें चर्चेंत भाग घेत. ह्या वातावरणांत बाई विजेसारख्या भारल्या गेल्या. वर्षाऋतूंतील जलधारांत फुलांचे ताटवेच्या ताटवे बहरून यावेत तशी त्यांच्या मनांतील विचारांना येथें चालना मिळाली.

ॲन सलिवन् मेसी अतिशय हुशार आहे आणि तिच्या बोलण्यांत अतिशय आकर्षकता आहे असें पुष्कळांनीं सांगितलें. कित्येकदां त्यांचेवर प्रेम करूं पाहणाऱ्या तरुण पुरुषांची बाई चेष्टा करीत. नव्या कल्पना ऐकून त्या आत्मसात करण्याला त्या नेहमीं तत्पर असत. मि. चॅंबर्लिन ह्यांनीं जेव्हां वॉल्ट व्हिटमनचें काव्य त्यांना वाचून दाखविलें तेव्हां आपण एका नव्या जगांत प्रवेश करीत आहोंत असें त्यांना वाटलें. बाई आतां एकतीस वर्षांच्या झाल्या होत्या. पहिल्यानें त्यांचा व्हिटमनविरुद्ध ग्रह झाला होता. पण त्यांची निराशा आतां नाहींशी झाली होती आणि भविष्यकाल जरी स्पष्ट दिसत नव्हता तरी माझ्याबद्दलच्या त्यांना वाटत असलेल्या शंका कमी झाल्या होत्या. आतां त्या अधिक आत्मविश्वासानें आयुष्य जगत होत्या. त्यांचा अधिकार आणि त्यांचें कार्यक्षेत्र वाढत होतें. मला एखाद्या लहान मुलासारखें वागविणें त्यांनीं बंद केलें. त्या मला आतां आज्ञा करीनातशा झाल्या.

आयुष्यांतल्या सत्य घटनांच्या तुलनेनें पुस्तकी ज्ञान कुठें खोटें ठरतें तेंहि आतां बाईंना कळूं लागलें होतें. मनुष्याला हवें असणारें सर्व ज्ञान पुस्तकांत असतें आणि पुस्तकें मनुष्याला फार लवकर ज्ञान देऊं शकतात ही आपली समजूत चुकीची असल्याचें त्यांनीं कबूल केलें. एकदां त्या मला म्हणाल्या– "आयुष्याबद्दलचं माझं तत्त्वज्ञान मी सतत बदलीत असतें. त्यामुळें मला कधीं कंटाळा येत नाहीं." बाईंचें वागणें कधींच तर्कशुद्ध नव्हतें हें मीं पूर्वींच सांगितलें आहे. भावनेच्या उमाळ्याबरोबर

आपलीं मतें बदलणें म्हणजे बीं पेरल्यावर तें उगवलें कीं नाहीं तें पाहण्यासाठीं वाढीला लागलेलीं रोपटीं उपटून काढून त्यांचीं मुळें शोधण्यासारखें घातक आहे हें त्यांच्या लक्षांत येत नसे. त्यांच्या मतें रोज आपण आपल्या व्यक्तिमत्वापैकीं जुनें कांहीं तरी टाकून देतों. आपलीं स्वप्नें भंग पावतात, आपलीं मतें बदलतात, आपले स्नेहसंबंध नाहींसे होतात आणि जें जें आपल्या सहवासांत असतें तें तें आपल्या हातांतून निसटून जातें. आपण स्वतःशींच इतके परके होतों कीं जणुं आपण आयुष्य जगलोंच नाहीं. पण अशा विचारांनींहि त्यांचेतील कल्पनांची संवेदनक्षमता नष्ट झाली नाहीं. ह्याचें कारण बाह्य सौंदर्यावरील त्यांचें अमर्याद प्रेम.

बाई लहानपणीं वाद घालतांना चटकन् चिडत व आक्रमक भाषा वापरीत. त्या वादांत दुसऱ्याला लागतील असे चार कटु शब्द बोलत असत आणि दुसऱ्यानें वापरलेले शब्द त्यांना झोंबत असत. आपल्या विरोधकाचें मन जिंकण्याऐवजीं आपलें म्हणणें त्याच्या गळीं उतरवण्याची त्यांची प्रवृत्ति असे. त्यांना तो आपल्या अभिमानाचा प्रश्न आहे असें वाटे. ह्याचें कांहीं अंशीं कारण, त्या स्वतः परिस्थितीला न नमण्याइतक्या कणखर होत्या हें आहे. दुसऱ्यावर सत्ता गाजविण्याच्या अर्थानें त्या कणखर होत्या असें मी म्हणत नाहीं तर त्यांना माणसाचें व्यक्तिमत्व हें संपत्ति किंवा नशीब ह्यापेक्षां अधिक मोलाचें वाटे. डॉ. अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल ह्यांचेप्रमाणें त्या विरोधकास "कदाचित् तुमचं म्हणणं बरोबर असेल. आपल्या कल्पना एकमेकांशीं किती जुळतात तें आपण पाहूं; कदाचित् मला तुमच्याकडून कांहीं शिकतां येईल." असें कधीं म्हणायच्या नाहींत, पण दुसऱ्यांत असलेली स्वतंत्र प्रवृत्तीची ठिणगी दिसतांच तिच्यावर फुंकर घालून स्वतंत्र विचारांचा अग्नि त्या प्रज्ज्वलित करीत. त्यांना स्पष्ट विचारलें तर त्या आपलीं मतें कधीं लपवीत नसत. अश्रद्धेची मात्र त्यांना फार चीड होती. भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या हृदयांतील सहानुभूतीनें वागवण्याचा त्यांचा गुण अजून तेवढा वाढला नव्हता. पुढें बाईंना भेटणाऱ्यांनीं कधीं अनपेक्षितपणें आपल्या आशाआकांक्षा त्यांचेजवळ मोकळेपणानें व्यक्त केल्या आणि त्या साध्य करणें त्या व्यक्तींना शक्य

आहे असें दिसलें कीं, बाईंचें हृदय आनंदानें भरून येई. त्या मला म्हणत असत, " हेलेन, ठाऊक आहे, बरेच लोक एकमेकांना न ओळखतांच जगतात. मलाहि अगदीं सामान्य माणसांचा कंटाळा आहे. पण असे किती तरी मुके जीव असतील कीं, ज्यांचे विचार एखाद्या महाकवीनें काव्यांत उतरविले किंवा एखाद्या महात्म्यानें जगाला समजावून सांगितले तर सारं जग त्या विचारांनीं हलून उठेल. जर तुझी ईश्वरावरील श्रद्धा खरी असेल तर ईश्वरानें अशा लोकांच्या व्यक्तिमत्वांत काय लिहून ठेवलं आहे तें जरूर समजावून घे. "

रेड फार्मवरील वास्तव्यांतील बाईंच्या अवस्थेचें हें माझें शब्दचित्र आहे. आतां मी लिहीत आहें ही माझ्या कुंचल्यानें ओढलेली त्यांच्या ह्या चित्राची शेवटची रेघ. माझ्या बालपणापासून मला त्यांच्या तोंडावरून हात फिरविणें फार आवडत असे. तो चेहेरा सुंदर होता, भावनापूर्ण होता, संवेदनाक्षम होता, माणसावरील प्रेमानें जिवंत वाटत होता. त्यांचे डोळे नेहमींच दुखत असत, परंतु ज्यांनीं त्यांच्या डोळ्याकडे पाहिलें आहे असे स्नेही मला सांगत कीं, " अधु दृष्टि असलेल्या व्यक्तींच्या डोळ्याप्रमाणें ते दिसायला सौंदर्यहीन वाटत नसत." त्यांचा चेहेरा सुंदर होता आणि त्यांचें शरीर डौलदार होतें. त्यांच्या मुखावर प्रेम विलसत होतें. माझ्या बालमनानें मला वाटणाऱ्या आंतरिक ओढीनें मी त्यांचे पापे घेईं आणि त्या माझीं जीं चुंबनें घेत त्यांची आठवण झाली कीं अजूनहि माझें हृदय मायेच्या उबेनें भरून येतें. त्यांच्या भुंवया सुंदर होत्या, आणि त्यांची मान वर करून बघण्याची पद्धत आकर्षक होती. आई म्हणे, " त्या खूप सुंदर आहेत ! " पुढें जॉन मेसीनेंहि त्या सुंदर आहेत हें माझें म्हणणें कबूल केलें. जगाच्या मूर्खपणाबद्दल त्यांना वाटणारे कांहींसे दुःखाचे, कांहींसे विनोदी असे भाव त्यांच्या चेहेऱ्यावर उमटलेले असत. परंतु त्यामुळें त्यांचा उसळता आनंद कमी झाला नाहीं. जॉनपासून त्या वेगळ्या झाल्या तेव्हांच त्यांच्यावर विषण्णतेचा ठसा उमटला. पण त्यानंतरहि ज्यांच्यावर त्यांचें प्रेम होतें त्यांचेकडे त्या स्मितवदनानेंच बघत असत.

माझ्या आवाजांत नैसर्गिकता यावी म्हणून बाईंनीं निष्ठाशीलपणें किती परोपरीनें यत्न केले ! खुद्द त्यांचा आवाज म्हणजे तर ईश्वरदत्त देणगीच होती. त्यांनीं वक्तृत्वाचें शिक्षण कोठें घेतल्याचें मला आठवत नाहीं. परंतु त्यांचे उच्चार स्पष्ट असत. एक शब्दहि वेंधळा नसे कीं त्यावर नको तेथें जोर नसे. गायिका होणें त्यांना आवडलें असतें असें त्या स्वतः पुष्कळ वेळां म्हणत असत. त्या गायिका झाल्या असत्या म्हणजे त्यांना आनंदाचें, सुखाचें संगीत गातां आलें असतें.

आम्ही रेड फार्मवर राहात असतांनाच अमेरिकेनें स्पेनविरुद्ध युद्ध पुकारलें. बाईंनीं लष्करांत नर्स होण्यासाठीं अर्ज केला. त्यांनीं हें काम करावें असें आम्हा दोघींनाहि वाटत होतें. परंतु नंतर त्यांना कळलें कीं नर्स होण्यासाठीं जेवढा वेळ शिक्षण घ्यावें लागतें तेवढ्या वेळांत एखादें जहाजसुद्धां सहज बांधून झालें असतें. म्हणून त्यांनीं आपला नर्स होण्याचा विचार सोडून दिला. मग त्यांना वेगळीच स्फूर्ति आली. त्या मला म्हणाल्या, " आपण क्यूबाला किंवा कॅरिबियन बेटांपैकीं एखाद्या बेटावर जाऊं या. तिथें आपण संत्र्यांच्या किंवा लिंबांच्या बागा लावूं. आपण शांतपणें म्हातारपणापर्यंत तिथें जगूं शकूं नि तुला हवं तर लेखनहि करतां येईल." त्या कल्पनेनें माझेंहि अंतःकरण उचंबळून आलें. पण अधिक विचार केल्यावर मीं त्यांना सांगितलें कीं, असें कांहीं करतां येण्याइतका पैसा एक तर आपल्याजवळ नाहीं, नि यदाकदाचित् पुरेसा पैसा उभा राहिला असें मानलें तरी त्यांचे डोळे अधु असल्यानें जिथें चांगले डॉक्टर मिळणार नाहींत, अशा कोणत्याहि जागीं जावयास मी तयार नाहीं. त्यांनींहि फार आग्रह केला नाहीं. कांहीं दिवसांतच त्या हें सर्व विसरून गेल्या. ह्यावरून त्यांना तें एक कल्पनारम्य स्वप्नच पडलें असावें असें मला वाटतें. ' लेक वालो मानापॉग ' जवळ बाईंनीं भाड्यानें घेतलेल्या जागीं आम्ही लवकरच ' रेड फार्म ' सोडून जाणार होतों. पुढें रेंथमला घर घेईपर्यंत दर उन्हाळ्यांत आम्ही ह्या जागीं येऊन राहात असूं.

# ७

ह्या नव्या जागीं बाई अधिक मोकळेपणानें वागत असत. त्यांचें हृदय सद्‌गुणरूपी रत्नांची खाण होती. मीं त्या खाणीकडे पाहिलें नि त्यांतली मौल्यवान् रत्नें माझ्या नजरेस येऊं लागलीं. बाईंनीं आई, मिल्ड्रेड आणि माझा धाकटा भाऊ फिलिप्स ह्यांना उन्हाळ्यांत तिथेंच राहावयास बोलावलें. खरं म्हणजे बाईंना हा सर्व खर्च झेपण्यासारखा नव्हता. आम्ही सर्व एकत्र आल्यानें आमची सुटी अतिशय आनंदांत गेली. इतक्या आनंदांत पूर्वीं आम्हांला क्वचित्‌च सुटी घालवायला मिळाली असेल. माझ्या घरचीं माणसें हीं आपलींच माणसें आहेत असें समजून बाई त्यांचेवर प्रेम करीत. बाबांच्या मृत्यूनंतर माझ्या कुटुंबीयांनीं रेंथमच्या तळ्याच्या किनारीं, डोंगरांत आणि झाडींत जे दिवस घालविले ते आमच्या आयुष्यांतले अतिशय सुखाचे दिवस होते. माझी एक नाव होती. शिवाय बाईंनीं एक होडी आणि एक तराफा ठेवला होता. कितीतरी प्रकारचे पाहुणे ह्या आमच्या कॅंपमध्यें येऊन जात! प्रसिद्ध व्यक्ति आणि सामान्य माणसेंहि येत. 'एड्'काकांच्या ओळखीचीं माणसें येत नि चेंबर्लिन मंडळीहि येत. एका उन्हाळ्यांत बोस्टनला जेव्हां बहिऱ्या लोकांचेसाठीं काम करणाऱ्या समाजसेवकांचा मेळावा भरला होता, तेव्हां त्यांपैकीं पुष्कळ कार्यकर्ते एक दिवस सकाळीं आमच्याकडे येऊन उभे ठाकले आणि त्यांनीं बाईंना आश्चर्यचकित करून सोडलें. ते फार आनंदांत होते. छानपैकीं वनभोजन करायचें, खूप भटकायचें आणि पोहायचें असा त्यांचा बेत होता. बाईंची न्याहारी नुकतीच संपली होती आणि भांडींकुंडीं आवरून त्या आणि ब्रिजेट मोकळ्या होत होत्या. तोंच इतके लोक पुन्हा न्याहारीसाठीं आलेले. त्यांची पोहण्याची, खाण्याची व्यवस्था करून त्यांच्या आनंदांत भर टाकणें ही बाईंची परीक्षाच होती. जेव्हां ही पाहुणे-मंडळी परत गेली तेव्हां त्यांना आपला वनभोजनाचा कार्यक्रम अतिशय यशस्वी झाला असें वाटलें. दुसऱ्याला सुखी करण्यांत बाई अतिशय तत्पर असत. बहिऱ्यांच्याकरतां ही मंडळी ज्या मार्गानें काम करीत ते मार्ग

बाईंना फार जुनाट वाटत आणि बाईंनीं तसें बोलूनहि दाखवलें. पण सर्व मंडळी गेल्याबरोबर बहिरे किंवा अंध ह्यांच्या शिक्षणाच्या कार्यांत स्वतःला नीट कळायला लागेपर्यंत पडूं नकोस असें त्यांनीं मला बजावून सांगितलें. अपंगांच्या सेवेच्या दृष्टीनें माझी नीट तयारी होण्यापूर्वीं मीं प्रसिद्धीच्या आहारीं जाऊं नये व प्रसिद्धीमुळें माझी समग्र जीवन—दृष्टि डागळूं नये, विकृत होऊं नये ह्यांसाठीं त्या फार जपत.

बाईंच्या आनंदी स्वभावामुळें सारें वातावरण आनंदानें भरून जाई. आम्ही कितीतरी खेळ खेळत असूं. त्यांतल्या कांहीं खेळांत मी भाग घ्यायची. पाण्यावर तरंगणें, पाण्याखालीं सूर मारून पोहणें, (मी स्वतःच्या कमरेला दोराचें एक टोंक बांधून दुसरें किनाऱ्यावर किंवा नावेला बांधायची म्हणजे मग मला मोकळेपणानें पोहतां येई. ) होड्यांच्या शर्यती असे अनेक खेळ आम्ही खेळत असूं. होड्यांच्या शर्यतीच्या शेवटीं आम्ही खूप दंगामस्ती करून एकमेकाला पाण्यांत ढकलीत असूं. आम्ही वॉटर पोलोहि खेळत असूं. रात्रीच्या वेळीं झाडींत भटकणें, तलावाच्या किनाऱ्या किनाऱ्यानें फिरत जाणें अशा कितीतरी गंमती करीत असतांना बाई आमच्यापेक्षां वयानें मोठ्या असल्याचें त्यांनीं कधीं भासूं दिलें नाहीं.

निकोप आरोग्य हें मानवी स्वातंत्र्यांतलें पहिलें स्वातंत्र्य आहे असें बाईंना वाटे. माझ्या अंगीं असलेल्या शक्तीचा जास्तींत जास्त उपयोग करतां आल्यामुळें मला एक प्रकारचें नवेंच स्वातंत्र्य मिळाल्यासारखें वाटत होतें. पोहणें, घोडदौड ह्यांमुळें शारीरिक शक्तीची जाणीव होऊन आत्मविश्वास वाढला. निरोगी जीवनाचा हाच पाया आहे. ह्या नव्या मार्गांनीं मला सुखी करण्यांत बाईंनीं माझें जीवन अधिक समृद्ध तर केलेंच, पण माझी जीवनेच्छाहि दुणावली.

नौकाविहार करतांना त्या किंवा मी वल्हीं मारीत असूं. त्यावेळीं ग्रीष्मांतील पिकून पिवळ्या झालेल्या शेतांची सायंकालीन शांत प्रसन्नता किंवा वसंतागमनाबरोबर वातावरणांत दरवळणारा सफरचंदांचा मोहर पाहून बाई हरखून जात. निसर्गसौंदर्याशीं समरस होऊन आनंदानें नाचणारा

बाईंची ही रसिकता आम्हीं परिचितांनाहि आश्चर्यचकित करी. कधीं त्या उदास असल्या तरी दुसऱ्याच्या जीवनांत आनंद निर्माण करीत. त्यांना वाटे कीं मानवाला एकंदरींत दुःखापेक्षां सुखच अधिक मिळतें... तसें नसतें तर मानवजात कधींच नष्ट झाली असती.

लहानपणीं बाईंना पाण्यांत खेळायची संवय नव्हती तरी त्या उत्तम पोहूं लागल्या. जेव्हां पोहत पोहत किनाऱ्यापासून आम्ही दूर जात असूं तेव्हां बाईंच्या पाण्यांतील डौलदार हालचालींची जाणीव मला होई. त्या मला फार आवडत. एकदां दुपारीं मी आणि फिलिप आंघोळ करीत असतां त्यानें माझा हात धरला. त्याला हातानें स्पेलिंग करतां येत नव्हतें. मी त्याच्या ओठावर बोटें ठेवून त्याचे शब्द वाचले. " बाई दिसत नाहींत " तो म्हणाला. आम्ही धांवत किनाऱ्यावर आलों नि आईला हाका मारूं लागलों. आईनें आरडाओरड करून बरींच माणसें जमविलीं. त्यांनीं तलावांत होड्या घातल्या. तलावाच्या मध्यावर पोंचल्यावर त्यांना बाई दिसल्या. स्वतःच्या शक्तीवर वाजवीपेक्षां जास्त विश्वास ठेवून त्या एका बेटाकडे पोहत निघाल्या होत्या. जेव्हां त्यांना शोधायला गेलेल्या माणसांनीं त्यांना नावेंत ओढून घेतलें तेव्हां त्या फार थकून गेल्या होत्या. त्यांना परत आणल्यावर गरम पेय पीत असतां किंचित् हंसून त्या म्हणाल्या, " काळजी करूं नका. मला कांऽहीं झालं नाहीं. असा मोह कां होतो हें तुला ठाऊक आहे हेलेन. " दुसऱ्या दिवशीं त्या पुन्हा पोहायला गेल्या. त्यांना भीति वाटत नव्हती. पण त्या एक धडा शिकल्या होत्या.

बाईंना अश्वविद्या चांगली अवगत होती. गाडीला जुंपण्याचे घोडे असोत किंवा कामाला लावलेले घोडे असोत, बाईंना घोडा हा प्राणी मनापासून आवडे. बाई घोडागाडी चांगली चालवीत असत. मात्र रस्त्यावर फारशी रहदारी नसावी. कामाला जुंपलेल्या घोड्यांच्या कष्टाळूपणाचें व सहनशीलतेचें त्यांना कौतुक वाटे. त्यांची दृष्टि जर अधिक चांगली असती तर मला वाटतें त्या शर्यतीच्या घोड्यावर स्वार झाल्या असत्या नि घोड्याच्या वेगाबरोबर बाईंनीं आपल्या हृदयांतील चैतन्याचे लगामहि सैल सोडले असते.

एकदां एका घोड्यावर त्या स्वार झाल्या. तो नवखा घोडा आपल्या स्नेहपूर्ण आवाजानें नि प्रेमळ स्पर्शानें आपल्या आटोक्यांत येईल असें त्यांना वाटलें. पण अनपेक्षितपणें त्यानें बाईंना आपल्या पाठीवरून फेंकून दिलें. त्या जोरानें रस्त्यावर कोसळल्या नि त्यांचें डोकें एका अणकुचीदार दगडावर आदळून त्याला खोंक पडली. त्यांच्या मानेवरून रक्त ओघळूं लागलें. त्यांना चक्कर आली तरी त्या स्वतःवर कसा ताबा ठेवूं शकल्या कोणास ठाऊक, परंतु उठून त्यांनीं त्या घोड्याचा लगाम हातांत धरला आणि त्याला घेऊन त्या ' रेड फार्म ' वर आल्या. मिसेस चेंबर्लिन ह्यांनीं डॉक्टरांना बोलावून त्यांची जखम बांधली. जखम चिघळेल असें सर्वांना वाटलें. परंतु ती लवकरच भरून आली. त्या पुन्हा घोड्यावर बसूं लागल्या. कांहीं दिवसांनीं आमचे एक स्नेही मि. सँडर्स यांनीं बाईंना एक घोडा नजर केला. आम्ही त्याचें नांव ' लकी स्टार ' ठेवलें. हा घोडा फार विश्वासू आणि प्रेमळ होता. बाईंना चाबूक वापरायची गरज त्यानें कधीं पडूं दिली नाहीं. बाई त्याचें सारें आनंदानें करीत. त्याला खरारा आणि तोबरा देतांना त्यांना फार आनंद होई. तोहि फुरफुरत जणूं आपल्याला काय हवें, काय नको तें त्यांना सांगे. त्या त्याच्यावर स्वार होण्यापूर्वीं तो त्यांचा दंड चाटीत असे. त्या स्वार झाल्या कीं, मग जिवलग मित्रासारखा तो दुडक्या चालीनें त्यांना फुलांनीं डंवरलेल्या रानाच्या रस्त्यानें नेई. त्यानें रुबाबानें आपलें डोकें वर केलें कीं बाईंचें मन अभिमानानें भरून येई. त्याच्या तुकतुकीत मानेवरून नि छातीच्या पिळदार स्नायूंवरून अभिमानानें त्यांचा हात फिरे. तो जलदगतीनें चालूं लागला कीं त्याच्या निरोगी कसदार शरीराचा स्पर्श त्यांना जाणवे. पुष्कळ वेळां बाई जातांना बरोबर एकादें पुस्तक घेऊन जात नि सावलीच्या जागीं पुरेसा प्रकाश असला कीं उतरून त्या पुस्तक वाचीत तेथें पडत. ' लकी स्टार 'चा लगाम त्यांच्या पायावरच पडलेला असे. आधाशीपणें वाचण्यांत बाई मग्न झालेल्या असत नि ' लकी स्टार ' गवत खात किंवा बाजूच्या झुडपांवरील पाला ओरबाडीत फिरे. तें दृश्य खरोखरच नयनरम्य असलें पाहिजे. पुढें केंब्रिजला आम्ही जेव्हां परत गेलों तेव्हां

'लकी'च्या वियोगाचें त्यांना अनावर दुःख झालें. जणूं त्यांच्याचसाठीं तो प्राणी जन्माला आला होता ! पण आम्हांला जायलाच हवें होतें. कॉलेजांतलें हें माझें शेवटचें वर्ष होतें. आम्हीं नव्यानेंच घेतलेलें घर उन्हाळ्याच्या सुटींत राहण्यायोग्य करण्यासाठीं आम्हांला दुरुस्ती–खर्चहि बराच आला होता.

## ८

रॅडक्लिफ कॉलेजांत असतांना पहिल्यांदा मनावर जे ठसे उमटले ते आठवले कीं मन उदास होतें. प्रेमळ मैत्रिणींचा अभाव किंवा अभ्यासाची अडचण हें ह्याचें कारण नव्हतें; तर दिवसेंदिवस अधू होत असलेले बाईंचे डोळे हें ह्या काळजीचें कारण होतें. कॉलेजच्या अभ्यासक्रमांत मला कोणतीं पुस्तकें लागतील ह्याचा अंदाज मला आधीं नसे व त्यामुळें ब्रेल लिपींत तीं लिहून यावयास फारच वेळ लागे. मला अडणारे पुष्कळ शब्द शोधून काढण्यासाठीं बाईंना शब्दकोष पालथे घालावे लागत. इंग्लिश वाङ्मयाच्या अभ्यासासाठीं लागणाऱ्या पुस्तकांतील फारच थोडीं पुस्तकें उठावदार ( Raised ) अक्षरांत छापलेलीं असत. त्यामुळें पुष्कळ पुस्तकें बाईंनाच मला वाचून दाखवावीं लागत. फ्रेंच व जर्मन भाषांतलीं पुस्तकेंहि त्याच वाचून दाखवीत. पुष्कळदां त्यांचे डोळे इतके बिघडत कीं त्यांना कांहींहि दिसेनासें होई. म्हणून त्यांनीं डॉ. मॉर्गन ह्या नेत्रवैद्यांना आपले डोळे दाखविले. माझ्यासाठीं रोज पांच ते सहा तास बाई वाचीत असतात हें जेव्हां डॉक्टरांना समजलें तेव्हां ते जवळ जवळ ओरडतच म्हणाले, "बापरे ! हा अक्षरशः वेडेपणा आहे. मिस सलिवन, जर मिस् केलरनें आपलें शिक्षण पुरें करावें असें तुम्हांला वाटत असेल तर तुम्हीं आपल्या डोळ्यांना पुरी विश्रांति दिली पाहिजे."

त्यावेळीं पुस्तकांचा मला भयंकर राग आला. मला पुस्तकें वाचून दाखविण्यासाठीं त्यावेळीं कोणी मिळणें शक्य नव्हतें. आपल्या दुखऱ्या

डोळ्यांनीं बाई ते कष्ट उचलीत असलेल्या पाहून माझ्या अंतःकरणाला विलक्षण यातना होत. जेव्हां कांहीं परिच्छेद पुन्हा वाचून दाखवूं का असें बाई विचारीत तेव्हां मी खोटें बोलून त्यांना सांगे कीं तो भाग तर माझा पाठ झालाय्. खरं म्हणजे कांहीं वेळां तो मजकूर मी पूर्णपणें विसरून गेलेली असें. शेवटीं लेनॉर किनी हिनें मला पुस्तकें वाचून दाखवायला सुरुवात केली. तिचें फिलिप स्मिथ ह्या भूगर्भशास्त्रज्ञाशीं लग्न झालें होतें. तिला बोटांनीं शब्दांचें स्पेलिंग करतां येत असे. तिनें केलेल्या मदतीमुळें माझ्या मनावरचें केवढेंतरी दडपण नाहींसें झालें. मीं जन्मभर तिची कृतज्ञतेनें आठवण ठेवीन. मी जो मजकूर विसरलें होतें तो मीं तिला पुन्हा वाचून दाखवायला सांगितला. पण त्याचें कारण तिला कधींच सांगितलें नाहीं. सोडलेला बहुतेक भाग तिनें वाचून दाखविल्यामुळें मी माझी सहामाही परीक्षा पास झालें.

बाईंना लिहितां येणें अशक्यच होतें. आपल्या नाकाच्या शेंड्यापर्यंत त्यांना जेमतेम दिसत होतें. त्यामुळें त्या लिहायला लागल्या कीं पेन्सिलीनें कोणतें अक्षर लिहिलें जात आहे ह्यावर त्यांना सारें लक्ष केंद्रित करावें लागे. ह्यामुळें त्यांच्या सहनशीलतेवर भलताच ताण पडला आणि त्यांची स्फूर्ति व लिहिण्याची इच्छा नाहींशी झाली. मला टायपिंग यायला लागल्यावर मी बाईंचे हिशेब, नोंदी आणि पत्रें टाइप करून दिलें. त्यांच्या अडकलेल्या विचारांना नि स्फूर्तीला त्यामुळें मोकळा रस्ता मिळाला नि पुन्हा मोकळेपणानें त्यांचे विचार बाहेर पडूं लागले. बाईंचें छोटेंसें काम करण्यांत का होईना मी त्यांच्या उपयोगी पडलें ह्याचा मला अतिशय आनंद झाला.

ज्या ज्या स्नेह्यांना आमच्या अडचणी कळल्या त्यांनीं त्यांनीं त्या दूर करण्यांत आम्हांस मदत केली. जॉन मेसी हे त्यांपैकींच. माझ्या ‘ जीवन कथेचें ’ त्यांनीं संपादन तर केलेंच पण रॅडक्लिफ कॉलेजांतील शेवटच्या दोन वर्षांचा अभ्यासक्रमहि त्यांनीं अशा रीतीनें आंखून दिला कीं त्यामुळें बाईंच्या डोळ्यांवर फार ताण पडूं नये. जेव्हां जेव्हां शिकवण्याच्या कामांतून त्यांना वेळ मिळे तेव्हां तेव्हां ते स्वतः मला वाचून दाखवीत.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक ........ वि:
क्रमांक .............. नों: दि:


बोस्टनचे डॉ. गोल्डवेट ह्यांचेबद्दल कृतज्ञतेनें उल्लेख केला पाहिजे. बरेच दिवस बाईंना पट्टयानें पाय बांधून चालावें लागे. बहुधा लहानपणीं जरुरीपेक्षां लहान आकाराचे बूट वापरल्याचा तो परिणाम असावा. कॉलेजांतील माझ्या शेवटच्या वर्षी तर त्या लंगडूं लागल्या. जॉननीं त्यांना डॉक्टरांचेकडे पाठविलें. डॉक्टरांनीं ऑपरेशन करणें आवश्यक असल्याचें सांगितलें. माझी शेवटची परीक्षा होईपर्यंत त्यांनीं ऑपरेशन करून घ्यावयाचें नाकारलें. डॉक्टरांनीं स्पष्टपणें सांगितलें, "मिस् सलिवन, हेलेन केलरच्या शिक्षणापेक्षां तुमचें आरोग्य अधिक महत्त्वाचें आहे." त्यांनीं असें स्पष्ट सांगितलें तेव्हां आनंदानें त्यांच्या गळ्यांत पडावें असें मला वाटलें. हॉस्पिटलमध्यें बाईंना राहतां येईल इतके पैसे त्यावेळीं आमचेजवळ नव्हते. तेव्हां डॉक्टरच आमच्या राहत्या जागीं आले. त्यांनीं ऑपरेशन करावयाचीं हत्यारें आणि एक परिचारिका आपल्याबरोबर आणली. ब्रिजेटनें स्वयंपाकघराची जमीन अगदीं झिजून जाईल एवढी घासून घासून स्वच्छ केली. एक टेबल तिथें टाकण्यांत आलें. डॉक्टरांनीं बाईंना भूल दिली. त्यांनीं आपल्या हातांनीं उचलून बाईंना स्वयंपाकघरांतील टेबलावर नेलें तेव्हां ते उंच, धिप्पाड आणि देखणे दिसत होते. जन्मभर बाई लंगड्या व्हायच्या, पण डॉक्टरांनीं त्यांना बरें केलें. एक महिन्यांत बाई माझ्याबरोबर चालूं--फिरूं लागल्या.

'मिड्स्ट्रीम' ह्या माझ्या पुस्तकांत मला माझें शिक्षण अर्धवट सोडायला लावण्याचे जे प्रयत्न झाले त्याबद्दल मी लिहिलेंच आहे. माझ्या नांवावर आंधळ्या व बहिऱ्या मुलांचेसाठीं एक शाळा स्थापन करण्याची ती योजना होती. माझ्या स्वभावांतील प्रेमळ बाजू माझ्यावर टीका करून मला सांगत होती कीं मनाच्या आणि शरीराच्या दुर्बलतेच्या दुहेरी पिंजऱ्यांत अडकलेल्या बालकांना मीं अवश्य मदत केली पाहिजे. मीहि त्याच अंधःकारांत एकदां खितपत पडलें होतें. पण त्याचबरोबर सुरु केलेलें कॉलेजचें शिक्षण पुरें करून अशा दुहेरी दौर्बल्यानें अडकलेलें मूलहि किती प्रगति करूं शकतें हें जगाला दाखवून देणें हा माझा हक्क होता नि कर्तव्यहि होतें. कुठल्याहि शाळेच्या

स्थापनेसाठीं मीं अभ्यास सोडून जाऊं नये असा बाईनीं निश्चय केला होता. आम्हांला ज्या निराशा पदरीं घ्याव्या लागल्या त्यांची कल्पना यावी म्हणूनच केवळ मीं ह्या गोष्टींचा उल्लेख केला. ज्या ज्या विषयांचा मीं अभ्यास केला त्या विषयांत मला सर्वांत उच्च यश मिळालें नाहीं म्हणून बाईंना फार वाईट वाटलें. माझ्यांत पुरेसा उत्साह नसल्यानें त्या फार दुःखी झाल्या. असें कांहीं झालें कीं त्या फार दुःखी होत. अशा वेळीं त्यांचेशीं प्रेमानें वागावें लागे. आयुष्यांत कांहीं नवें करून दाखवितां येईल अशी शक्यता दिसूं लागतांच त्या पुन्हा आनंदी होत. बाईनीं दिलेल्या ह्या शिकवणुकीबद्दल मी त्यांची फार कृतज्ञ आहें. त्यांच्या मृत्यूनंतर पुढील आयुष्यांत आमच्यावर सत्ता गाजवणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहून दोन स्वतंत्र स्त्रिया म्हणून आयुष्य जगणें त्यामुळेंच मला व पॉलीला शक्य झालें.

# ९

रेंथॅमला आम्ही स्थायिक झालों तेव्हां जॉनशीं लग्न करावें किंवा नाहीं, ह्याबद्दल वर्षभर बाईंचें निश्चित् कांहीं ठरेना. मी मनाशीं म्हणायची 'प्रेमाचा मार्ग कधींच सरळ नसतो.' त्यांच्या कार्यांत आणि सुखदुःखांत भागीदार होणारा चांगला पुरुष त्यांना भेटला, असं त्या वेळीं मला वाटलं. मी वाट पहात होतें. एकदां बोस्टनला आंधळ्यांचेसाठीं झालेल्या सभेंत माझें भाषण झालें. जॉननें माझें भाषण मोठ्यानें म्हणून दाखविलें. संध्याकाळीं परत आल्यावर बाईंच्या खोलींत मी बसलें असतां त्या म्हणाल्या, "तूं फार सुंदर दिसत होतीस भाषण करतांना!" नंतर त्या चटकन् म्हणाल्या, "मी कधींच लग्न करणार नाहीं." तें ऐकतांच मीं ओरडलें, "बाई, जॉनवर तुमचं प्रेम असलं नि त्यांना तुम्ही जाऊं दिलंत तर जन्मभर माझा मला तिरस्कार वाटेल."

भूतकालांतील त्या अनिश्चित् घटनांची आठवण झाली नि त्यांचा अर्थ मी लावूं लागलें कीं मला वाटतें कीं आपलें लग्न झालें आहे हें सत्य

ॲनीनें पूर्णपणें कधींच आत्मसात् केलें नाहीं. तिनें उलट स्वतःवर अधिक ताबा मिळविला. आपल्या मनोवृत्तींना तिनें अधिक ताब्यांत ठेवलें. पण अधून मधून हे मनोविकार गुरगुरत आणि मग स्वतःवर ताबा ठेवण्यासाठीं आपणाला माझी गरज असल्याचें ती सांगे. माझ्या वाङ्मयीन कामांत मला जॉन बहुमोल मार्गदर्शन करीत. ॲनीला सुंदर सुंदर पुस्तकें ते वाचून दाखवीत नि तिची उदासीनता घालवीत. जॉनचे डोळे निसर्गाचें सौंदर्य टिपून घेत. पण त्यांना साध्या, स्वावलंबी, खडतर मार्गानें आक्रमण करणाऱ्या जीवनाचा परिचय नव्हता. आमच्या सुखांत ते सहभागी झाले नि त्यांत त्यांनीं भरहि घातली.

पण त्या दोघांच्या जीवनसंगीतांत त्यांच्या सुरांचा मेळ कधींच जमला नाहीं. बाईंचे भाव आधींच भराभर बदलत असत. त्यांत दुखावलेल्या मनानें ते अधिक तीव्र होत. साध्या माणसांच्या लक्षांत त्यांची ही मनस्थिति तर येत नसेच, पण हुशार आणि जाणत्यांनाहि त्यांच्या मनोव्यापारांचा पुरा अंदाज घेतां येत नसे. त्यांच्या स्वभावांतील छायाप्रकाशाचा खेळ त्यांचेवर खरेंखुरें मनापासून प्रेम करणारांनाच उमगे. त्यांच्यांतील अस्वस्थता कुठेंतरी बाहेर पडायचा मार्ग शोधीत असे. कुठेंतरी नव्या जागीं जावें, कांहींतरी नवें बघावें अशी त्यांना सतत ओढ लागे. ह्यांत शिणलेल्या मनाची करमणूक करण्याचा हेतु नव्हता तर जीवनांतील नवे नवे अनुभव घेण्याची अभिलाषा होती. " आपण संवयींचे दास आहोंत "—त्या म्हणत. मला आजहि वाटतें कीं ह्या त्यांच्या उपदेशाकडे मीं अधिक लक्ष दिलें असतें तर बरें झालें असतें. मी नेहमीं निरनिराळ्या तरुण लोकांना भेटावें व त्यामुळें माझ्या भोंवतालच्या वातावरणांत सतत बदल होत रहावा म्हणून त्या नेहमीं खटपट करीत. मला आतां वाटतें, पक्षी जसे पिसें झाडून नवे होतात तसें आपणहि वागावें. योग्य बदल केला कीं आपल्या कल्पनांतहि बदल होतात, आपले आत्मे नवें रूप धारण करतात, अधिक उच्च पातळीवर जाऊं शकतात आणि अनेक नवीं आकर्षणें जीवनांत तयार करूं शकतात. कुणास ठाऊक, सामाजिक बदल घडवून आणण्याचाहि हा मार्ग असूं

शकेल. दुसऱ्यांत ऐक्य आणि गोडवा निर्माण करून एकाद्याला आपलें कर्तव्य करतांनाच सुखहि निर्माण करतां येईल, सत्कृत्य आणि सौंदर्य हीं एकत्र आणतां येतील. मला वाटे, बाईंच्याबरोबर पृथ्वीच्या टोंकापर्यंत प्रवास करीत रहावें. पण मीं स्वतःला वाङ्मयीन कार्याशीं जखडून घेतलें होतें. तें कामाचें जूं मानेवर बसतांच माझ्या मनांतील बंडखोरीचे बैल रागानें फुरफुरले, त्यांनीं लाथा झाडल्या पण अखेरीस तें जोखड त्यांनीं मुकाट्यानें स्वीकारलें. आतां पुरेसें यश मिळाल्याशिवाय मला त्यापासून दूर व्हावयाचें नव्हतें. बाईंना ह्याचा फार राग आला. परंतु आपल्या व्यक्तिमत्वाइतकीच दुसऱ्याच्या भावनांची त्यांना कदर होती. चहाच्या पेल्यांतलें आमचें तें वादळ लवकरच शांत झालें.

बर्मुडाला जाण्याचा बेत त्यांनीं पुन्हा एकदां बोलून दाखविला. हिशेब पाहिल्यावर सुरुवातीला कराव्या लागणाऱ्या खर्चाइतकेसुद्धां पैसे आमच्याजवळ नाहींत असें मला आढळलें. बाईंनीं रागावून बरीच आरडा-ओरड केली, पण त्या प्रवासाचीं वर्णनें लिहूनहि पुढें एवढे पैसे जमा होतील असें मला वाटलें नाहीं. त्यांचा राग शांत झाला परंतु त्यांची निराशा केल्याचें दुःख मला झालें.

त्यांच्यांतील बेछुटपणाचा आनंद चाखायला मिळावा म्हणून मी पुष्कळदां हातांतलें काम टाकून त्यांचेबरोबर वनभोजनाला किंवा फिरायला जाई; नाहींतर वाळलेल्या काटक्या गोळा करून त्यांची शेकोटी पेटवी. त्या ज्वाला उंच उंच जात आणि मग इंधन जळलें कीं थंडावत. एकादेवेळीं आम्ही भर पावसांत, भोंवतीं सर्वत्र विजा चमकत असतांना आणि तळ्याच्या पाण्याच्या लाटांचा तुफान नाच चालत असतां पोहण्याचे कपडे घालून तळ्यांत उतरत असूं. पाऊस आमचे कपडे भिजवून चिंब करी, मग आकाश उजाडे. खळबळ उडविणारें कांहींतरी करीत राहणें हा त्यांचा आत्मा होता.

त्या आठवणी झाल्या कीं बाई मला माझ्या टाइपरायटरपासून खेंचून काढायला नेहमीं कां तयार असत ह्याचा अंदाज येतो. केंब्रिजच्या शाळेंत मी शिकत असतां तेथें बाई मला माझ्या शक्तीबाहेर अभ्यास करायला

लावतात असा क्रूर आरोप त्यांचेवर केला गेला होता. हेंच तें कारण असावें. मी कॉलेजांत गेल्यावर डॉक्टरांचेकडे कधींच जात नसें. कारण तोच जुना आरोप बाईंच्यावर कोणी तरी करील अशी भीति मला वाटायची. रोज डोकेंदुखीनें माझा जीव नकोसा होई. त्यामुळें अभ्यास करणें फार जड जात असे. अखेरीस डोकेंदुखी थांबवण्यासाठीं मी दोन दोन दिवस उपास करीं. न्याहारी खाण्याचेंहि मीं बंद केलें. त्याचे जे परिणाम झाले त्यांची जबाबदारी माझ्यावरच आहे. माझी डोकेंदुखी बंद झाली पण मी केलेल्या अतिरेकाबद्दल नशिबानें मला शिक्षा दिली. मला रक्तक्षयाचा व मूत्राशयाचा विकार जडला. त्यामुळें बाईंना किती दुःख झालें असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी.

पण दुसऱ्या एका घटनेनें आम्हांला अधिक समाधान वाटलें. इतरांचे-प्रमाणें माझ्याशींहि मोकळेपणानें बोलण्याची त्यांना आतां मोकळीक होती. माझ्या बालमनावर त्या आपलीं मतें लादतात असा त्यांचेवर आरोप आलेला असल्यानें सामाजिक विषयावरच त्या विशेष बोलत.

स्त्रियांना मतदानाचा अधिकार असावा असें त्यांना वाटत नव्हतें, मला वाटत होतें. मतानें त्या वेळीं त्या बऱ्याच कर्मठ होत्या. त्या आघाडीच्या योद्धया कधींच नव्हत्या. मनुष्यानें घातलेल्या सर्व मर्यादांविरुद्ध त्या लढल्या. मानसिक स्वातंत्र्य त्या पवित्र मानीत. जितका आम्ही अधिक विचार करूं, तितके आमचे मतभेद अधिक स्पष्ट होत. बुद्धि हीच एक मानवजातीचें वैशिष्ट्य आहे ह्या तत्त्वावर मात्र आमचें एकमत होतें. मार्क ट्वेनप्रमाणेंच प्रगतीबद्दल त्यांचें मन साशंक होतें. ह्याबाबतींत अंधांचे क्षेत्रांतील त्यांचें मतहि तसेंच होतें. कांहीं हुषार अंधांनी आपल्या अंधाऱ्या जगांत आपल्या कर्तृत्वानें प्रकाश उजळल्याचें त्यांना माहीत होतें. परंतु सर्वसामान्य अंधांच्या कर्तबगारीबद्दल त्या साशंक होत्या. गेल्या तीन वर्षांत अमेरिकेंत आणि ब्रिटनमध्यें नुसत्या अंधांनीच नव्हे, तर आंधळे आणि बहिरे असणारांनींहि मिळविलेलें यश पाहिलें कीं, मला अभिमान वाटतो.

माझे हे विचार बाईंना कळतील तर काळोखांतली एवढी सर्पीत्त उजेडांत आल्याचा त्यांना आनंद वाटेल.

विवाहानंतर बाईंचीं कांहीं वर्षे अतिशय सुखांत गेलीं. आमच्या आयुष्याचाहि तो सर्वांत सुखी काळ होता. पण एकाद्या शांत गांवीं स्वस्थपणें राहणें किंवा घरकामांत आनंद मानणें बाईंच्या स्वभावांतच नव्हतें. वेळ मिळेल तेव्हां घोड्यावर स्वार होऊन त्या फिरायला जात. त्यांनीं निवडलेला एक घोडा अतिशय द्वाड होता. त्यांना वाटलें तो माणसाळेल. एक दिवस मी शेतांतून फिरून घरीं परत आलें. आंत पाऊल टाकतांच मला कोणीतरी म्हणालें, " त्या द्वाड घोड्यानें बाईंचा प्राण घ्यायचा प्रयत्न केला. त्यानें त्यांना पाडलें."

" त्यांना फार लागलें का ?" मीं घाबरून विचारलें.

" नाहीं. पण त्यांना चांगलाच धक्का बसला आहे. "

माझा राग अनावर झाला. वाटेल त्या घोड्यावर न बसण्याबद्दल मीं त्यांना किती तरी वेळां बजावलें होतें. पण त्यांनीं माझें ऐकलें नाहीं. मी त्यांच्या खोलींत गेलें नि ताडताड त्यांना बोलून घेतलें. कडवटपणानें त्या हंसूं लागल्या. " मी अडचणींत असतांना मला हेंच प्रेम मिळणार का ?" त्यांनीं विचारलें.

बराच वेळ गेला. मग त्या माझ्याजवळ आल्या. " मला वाईट वाटतं हेलेन !" त्या म्हणाल्या, " पण स्वयंपाकघराचा मला कंटाळा आला. तिथें काम करायला लागलं कीं, आपण म्हातारे झालोंत असं वाटतं. मी त्यापासून पळून जायचा प्रयत्न करीत होतें. जाऊं दे. आपण सारं विसरूं या."

पुन्हा बाईंनीं घरकामाबद्दल कधीं तक्रार केली नाहीं. बऱ्याच वर्षांनंतर मला त्यांच्या त्या वागणुकीचं कारण कळलं. पण तें गुपित मला कुणालाच सांगतां येण्यासारखं नाहीं.

# १०

बाईंची दणकट प्रकृति बिघडूं लागल्याचें पाहून मला भारी वाईट वाटलें. मानसिक त्रास, अधू आणि दुखरे डोळे आणि मूल न झाल्यामुळें त्यांना वाटणारी भयंकर निराशा ह्याचा परिणाम होऊन त्यांची प्रकृति बिघडूं लागली. त्यांत आणखी कांहीं आपत्तींची भर पडली होती. आम्हीं व्याख्यानांच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वीं त्यांचें एक मोठें ऑपरेशन झालें. प्रवासांत त्यांना पडशाचा अतिशय त्रास झाला. एकदां पायऱ्यांवरून पडून त्यांचा हात मोडला नि खांद्याचें हाड निखळलें. डॉ. गोल्डवेट ह्यांनीं उपचार करीपर्यंत ह्या दुखापतींची नीट काळजी घेतली गेली नव्हती.

पण ह्या दुःखांतहि सुखाचे कांहीं क्षण होते. वुल्फबोरो, न्यू हॅंपशायर, येथें जॉननीं आम्हांला नेलें. बाईंच्या डोळ्यावर ज्यांनीं ऑपरेशन केल्यामुळें बाईंना कांहीं प्रमाणांत दिसूं लागलें होतें ते डॉ. ब्रॅडफोर्ड येथेंच रहात होते. संधिवाताने त्यांना जखडून टाकलें होतें. त्यांना बाईंच्या डोळ्यांचें केलेलें ऑपरेशन नि त्यांच्या आजाराची आठवण होती. डोळ्यांना एवढे श्रम देऊनहि बाईंचे डोळे अजून चांगले असल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें नि डोळे स्वच्छ राखण्यासाठीं तुरटीच्या पाण्याचे थेंब डोळ्यांत टाकण्याचा सल्ला दिला.

ह्या वेळीं पुष्कळ वेळां बाईंशीं मी धर्मावर चर्चा करी. त्या म्हणत, "धर्म हा एक जीवनमार्ग आहे, तो फक्त विचार नाहीं. शब्दापेक्षां आचरणांत चांगलें काय तें बघा. शतकानुशतकें धर्मश्रद्धेवर माणसें चर्चा करीत एकमेकांवर तुटून पडलीं. त्याचा काय उपयोग झाला? दुसऱ्याला चांगलें जगतां यावें म्हणून मदत करणें हें त्यापेक्षां अधिक चांगलें. दुसऱ्याच्या सद्विचारांत नि सद्वर्तनांत कधींहि अडथळा न आणण्याचा प्रयत्न करा."

मी बायबलचा अभ्यास करतें हें त्यांना सांगितलें. धार्मिक विषयावर आमचे मतभेद होते. त्या म्हणाल्या, "मला धर्मांत कांहीं तथ्य वाटत नाहीं. तुला वाटतें आपले हे प्रामाणिक मतभेद आपण स्वीकारूं आणि आपआपल्या मताप्रमाणें जगूं. माझ्या हृदयांतील भावनांमुळें मी तुझी आईच आहें असें मला वाटतें. पण तूं कांहीं माझ्या 'मालकी'ची नाहींस. तुझी मतें तूं ठरवावींस असेंच मला वाटतें. पण निरनिराळ्या वादांत पडून अतिरेकीपणानें वागूं नकोस. विरोधकांशींहि सरळ वाग."

आयुष्याचें बहुरंगी स्वरूप बाईंनीं आणि मीं एकत्र जगून पाहिलें. त्यांचा राग ओसरला कीं दुष्ट माणसांतले गुणहि त्यांना दिसूं लागत. त्यांच्या स्वभावाची घडणच अशी होती कीं कुठलाहि मनुष्य दुसऱ्याचें वाईट करण्यांत आनंद मानील ह्यावर त्यांचा विश्वास बसत नसे. त्या म्हणत, "माझा पुनर्जन्मावर विश्वास नाहीं. कारण माणूस आपल्या इच्छेप्रमाणें वागत नाहीं. म्हणून माणसाला ईश्वर जन्मभर आगींत भाजून काढतो असें म्हणणें मला पटत नाहीं. वाईट वागणारीं माणसें आपण वाईट वागतों ह्याची जाणीव होतांच दुःखी होतील व त्यांना जीवन असह्य होईल व ईश्वरालाहि त्यांना ठार मारावें लागेल. तसें झालें तर ईश्वराचें ईश्वरत्वच राहणार नाहीं."

मी म्हणालें, "अशा माणसांच्या डोळ्यावर ईश्वर पडदा टाकतो व इतरांपासून त्यांना निराळे करतों. त्यामुळें जे सच्छिल आयुष्य जगतात त्यांना त्यांचा उपद्रव होत नाहीं."

"तुझ्या श्रद्धेबद्दल मला आदर वाटतो." बाई म्हणाल्या, "कारण एखाद्या दुबळ्या माणसासारखें तूं तुझ्या आंधळेपणाच्या नि बहिरेपणाच्या आपत्तींत समाधान मानण्यासाठीं त्या श्रद्धेचा उपयोग करीत नाहींस तर जीवनांत आनंद उपभोगण्यासाठीं करतेस. ईश्वरानें सुखी होण्यासाठींच आपल्याला जन्माला घातलें आहे."

सर्व धर्मांचीं तत्त्वें सारखींच असून मानवी दोष सर्व धर्मीयांत आहेत असें बाईंना वाटे.

मला वाटतें व्यक्तिविकासासाठीं अन्यायी रूढी व संस्थांचेविरुद्ध असहकार करण्याचा महात्मा गांधींचा मार्ग बाईंना आवडला असता. व्यक्तीगत प्रगतीसाठीं इतरांच्या कार्यांत ढवळाढवळ करण्याची गरज पडूं नये. वाईट करण्यांत सहभागी न झालें म्हणजे पुरे. व्यक्तीची शक्ति ही व्यक्तीच्या हृदयांत तयार होणाऱ्या सद्भावनांवर अवलंबून आहे. स्वतःला स्वतःच्या दोषांची जाणीव होऊन सुधारण्याची आवश्यकता पटली कीं आत्मोन्नति जड नाहीं. ह्या माझ्या विचारांना माझे मानलेले बाबा जॉन हिज यांनीं उत्तेजन दिलें. त्यांनीं बाईंना सांगितलें कीं, "नैतिक बंधनें माणसावर जर जबरदस्तीनें लादलीं तर त्याची आंतरिक वाढ बंद होऊन त्याच्या अत्यंत शुद्ध आणि सुंदर विचारांना सुद्धां वाट करून देण्याची त्याची पात्रता नष्ट होईल."

"हें बघ हेलेन" बाई म्हणाल्या, "कुठल्याहि एका तत्त्वप्रणालीच्या आहारीं कां जाऊं नये हें आतां तुझ्या लक्षांत येईल. प्रत्येक मनुष्य हें एक कोडें आहे. कुठल्याहि मनुष्याच्या मनाचा थांगपत्ता कुणालाहि लागणें शक्य नाहीं व म्हणून ईश्वराखेरीज हें कोडें कुणालाहि सुटणार नाही. जर मृत्यूनंतर आयुष्य असेलच तर प्रत्येक प्राण्याला नरकांतून बाहेर खेंचण्याइतका त्याच्यांतला चांगुलपणा ईश्वराला दिसेलच."

पुष्कळ वेळां बाईंच्या बोलण्याचा स्पष्ट अर्थ मला लागत नसे.

ट्यूक्सबरीच्या भिक्षागृहांत बाईंनीं घालविलेल्या आयुष्याची कथा पुढील पंचवीस वर्षांत मला कळली. त्यावेळीं माझीं बहुतेक पुस्तकें लिहून झालीं होतीं आणि माझें "अमेरिकन फाउंडेशन फॉर द ब्लाइंड" मधील काम चांगलें प्रस्थापित झालें होतें. नेला, बाईंच्या जीवनावर पुस्तक लिहीत होत्या. जिव्हाळ्याची मैत्रीण हें काम करीत असल्याचें पाहून मला अतिशय आनंद झाला. पॉली रजा घेऊन परदेशीं गेली होती. लॉंग आयलंडवरच्या फॉरेस्ट हिल्समधील घरांत बाई आणि मी दोघीच होतों. आपली कथा सांगण्यापूर्वी बाईंनीं मोलकरणीस दुपारची सुट्टी दिली. बाईंच्या आवडत्या कुत्रीलाहि त्यांनीं तिच्या कोपऱ्यांतल्या जागीं आरामांत झोपविलें. आता

आम्ही दोघीच राहिलों होतों. आम्ही एकमेकींना अगदीं खेटून बसलों नि मग बाईंचीं बोटें माझ्या तळहातावर आपल्या बालपणाच्या नाट्यमय जीवनावरील एक एक पडदा बाजूला सारूं लागलीं. तीं बोटें दारिद्र्य, दुःख आणि रोगराईनें भरलेल्या आपल्या बालपणींच्या आयुष्यांतला एक एक प्रसंग उघडा करूं लागलीं. मी बाईंच्याकडे पाहिलें. माझ्या मनःचक्षूंपुढें एक सुंदर रुबाबदार स्त्री उभी राहिली. सारें जग त्या स्त्रीला 'माझ्या बाई' म्हणून ओळखीत होतें. साऱ्या जगानें त्यांच्या कर्तृत्वाची स्तुति केली होती आणि साऱ्या जगानें त्यांना मान्यता दिली होती. त्या सुंदर स्त्रीचें बालपण दारिद्र्याच्या ज्या चिखलांत गेलें त्याचें स्वरूप तीच व्यक्ति माझ्या तळहातावरील तिच्या बोटांच्या नाजुक स्पर्शांतून मला दाखवीत होती.

मीं गरिबी समजावून घेतली होती. दारिद्र्याचा अभ्यास केला होता. मला सारें समजेल असा बाईंना विश्वास वाटत होता. मी कल्पना करूं लागलें. तीं स्पंदन करणारीं बोटें जणूं मला माझ्या सध्यांच्या आयुष्यांतून उचलून बाईंच्या बालपणीं त्या जगलेल्या आयुष्यांत नेऊन सोडीत होतीं. अर्धवट अंधावस्थेंतील एका लहान मुलीनें सहन केलेल्या गरीबीचें तें किळसवाणें रूप मी बघत होतें. त्यांचीं बोटें तें सारें मला दाखवीत होतीं. बाई तें सारें सांगत असतां आपल्या भावाच्या, जिमीच्या, मरणाची आठवण होऊन रडूं लागल्या. हृदय पिळवटून टाकणारे ते हुंदके ऐकतांच पन्नास वर्षें त्यांनीं हृदयांत गाडून टाकलेल्या त्यांच्या दुःखाची मला कल्पना आली. मी त्या रात्रीं झोपूं शकलें नाहीं. माझ्या हृदयांतील तें दुःख मला असह्य होतें. बाईंचें जिमीवर विलक्षण प्रेम होतें. तो भिक्षागृहांत मेला. त्या दुःखानें बाईंच्या हृदयाला झालेली जखम त्यांच्या हुंदक्यांनीं स्पष्ट झाली होती. जिमीच्या मृत्यूचें हें त्यांचें दुःख त्यांच्या हुंदक्यांनीं मला कळलें होतें. तें माझ्या हृदयांतहि मला विलक्षण यातना देत होतें. मीं तें दुःख माझ्या हृदयांत पुन्हा पुन्हा नव्यानें उसळून येऊं दिलें नि मग कांहीं वेळानें बाईंचें तें दुःख माझेंच आहे, माझ्याच हृदयाला पडलेली ती जखम आहे असें मला वाटूं लागलें. मला मग बरें वाटलें. जिमीची मूर्ति आम्ही दोघींहि आमच्या हृदयांत सारख्याच प्रेमानें कुरवाळीत असल्याचें पाहून बाईंनाहि खूप बरें वाटलें.

मृत्यु किंवा अमरत्व ह्यांची चर्चा करतांना बाईंच्या हृदयाला होणाऱ्या यातनांची त्यामुळें मला कल्पना आली. मला सारें सांगून झाल्यावर त्यांनाहि जरा मोकळें वाटूं लागलें.

हें सारें बाईंनीं सांगितल्यामुळें मलाहि त्यांच्या बऱ्याचवेळीं दृष्टीस पडणाऱ्या ' चमत्कारिक ' वागण्याचा अर्थ कळूं लागला. ह्या पूर्वी त्यांच्या ह्या जीवनांत मला प्रवेश मिळाला नव्हता. शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहीं असा कांहीं उणेपणा आमच्या वागण्यांत राहिला होता. पण हें सारें जेव्हां त्यांनीं मोठ्या धैर्यानें माझ्यापुढें मोकळें केलें तेव्हां माझ्यांतहि नवें धैर्य आलें. बाईंनीं दारिद्र्याच्या त्या गर्तेत जगून शिक्षण घेतलें होतें. त्या रखरखीत वाळवंटांत त्यांना शिक्षणाचा पाणोठा सांपडतांच त्या जीवनांतून मिळालेलें सर्वस्व त्यांनीं मला वाढवण्यांत खर्च केलें होतें. जिमी कांहीं महिनेच त्या भिक्षागृहांत त्यांचेजवळ राहिला होता. त्याला ज्या हृदयांतलें प्रेम मिळालें होतें त्याच हृदयांतलें प्रेम त्याचेनंतर मला मिळालें होतें. मला त्या शूर हृदयांतून एक नवी जीवनशक्ति मिळत होती.

रेंथमच्या जुन्या आठवणीकडे पुन्हा एकदां वळतें. बाईंच्या स्वभावांतल्या आणखी कांहीं वैशिष्ट्यांमुळें मला आश्चर्य वाटत असे.

उन्हाळ्याची सुटी घालविण्यासाठीं केप कॉड येथें आम्ही गेलों होतों. जेवण मिळूं शकेल अशी खानावळ बघून आम्ही त्या खानावळीशेजारींच एक झोपडी घेतली होती. आम्ही पोहायला गेलों होतों. एकदम थंडी वाढली व गारठ्यामुळें बाईंनीं शेकोटी पेटविली. कागद जळाल्याचा वास आल्यामुळें मीं चटकन् बाईंना विचारलें, " तुम्ही काय करताहांत बाई ?" " माझी दैनंदिनी जाळून टाकतें." बाई शांतपणें म्हणाल्या, " नि त्याबद्दल मला खरंच बरं वाटतं."

मला जुने दिवस आठवले. मी तेव्हां नऊ वर्षांची होतें. एका कागदाच्या अगदीं जवळ डोकें नेऊन बाई त्या कागदावर कांहींतरी लिहीत होत्या. " तुम्ही काय लिहितां ? " मीं त्यांना विचारलें. " एवढी चौकस होऊं नकोस." त्या हंसून म्हणाल्या होत्या. " तूं मला मोकळं कधींच सोडीत

नाहींस. मी सुद्धां इंग्रजी शिकतें आहें नि दैनंदिनी लिहीत आहें. तूं जा. मला एकटीला लिहूं दे."

ती दैनंदिनी मीं कधींच पाहिली नाहीं. ती त्यांनीं जाळली म्हणून मीं किंचित् चिडून त्यांना विचारलें, "तुम्ही ती दैनंदिनी कां जाळलीत? तुमचे कांहीं नवे विचार त्यांत नक्की असले पाहिजेत. शिक्षणाबद्दलचे तुमचे विचारहि तुम्हीं तींत लिहून ठेवले असले पाहिजेत."

"मला माहीत नाहीं." त्या शांतपणें म्हणाल्या, "आणि मला त्याची पर्वा नाहीं." मला त्या दैनंदिनींतला मजकूर भयंकर, सूडबुद्धीनें लिहिलेला, एककल्ली वाटला. तूं माझें जें चरित्र लिहीत आहेस त्यांत तुला उपयोगी पडेल असें कांहीं आहे का तें मी बघत होतें. पण ती रोजनिशी चाळणें म्हणजे सुद्धां विनाकारण डोळे शिणाविणें होतें. पानामागें पानें रागानें लिहिलेल्या मजकुरानें भरलेलीं होतीं. मी म्हणूनच ती सबंध दैनंदिनी आगींत फेंकून दिली. तूं किंवा जॉननें ती वाचली असती तर एक क्षणभरहि मला बरें वाटलें नसतें."

त्यांनीं ती केव्हां लिहायला सुरुवात केली आणि केव्हां पुरी केली तें सांगितलें नाहीं. त्यांनीं एका वाक्यांतच ही चर्चा मिटविली. त्या म्हणाल्या, "ती जरी उपयोगी होती असें मानलें तरी तिचा उपयोग ह्यापुढें होण्यासारखा नव्हता." रागाच्या भरांत लिहिलेले शब्द किंवा व्यक्त केलेलीं मतें जगापासून लपवून ठेवण्याच्या त्यांच्या हृदयाची थोरवी मला पटली. माझी कल्पना अशी आहे कीं रागाच्या भरांत उद्‌भवणारे विचार त्या दैनंदिनींत लिहून आपलें मन मोकळे करीत असल्या पाहिजेत. दुष्टतेला असें नष्ट केल्यावर त्यांना मोकळें वाटत असलें पाहिजे. मग हंसतमुखानें, मोकळ्या मनानें नि प्रेमानें वागण्यासाठीं त्या जगाकडे वळत असल्या पाहिजेत.

आपल्या लहानपणच्या आठवणी त्यांनीं त्या रोजनिशींत लिहून ठेवल्या असल्या पाहिजेत ह्याबद्दल शंका नाहीं. ट्यूक्सबरीच्या भिक्षागृहांत असतां तेथील बायकांना ज्यांचेपासून मुलें झालीं त्या 'भयंकर पुरुषांचे' बद्दल

त्यांना जें जें ऐकायला मिळालें तें तें त्यांत त्यांनीं लिहून ठेवलें असणार. त्या भयंकर जागेंत त्यांच्या बालपणांतच प्रौढ स्त्री-पुरुषांच्या आयुष्याबद्दल त्यांच्या झालेल्या कल्पनाहि त्यांनीं त्यांत लिहिलेल्या असणार. कदाचित् त्यांत त्यांनीं पर्किन्स संस्थेंत सहन केलेल्या मनस्तापाचा उल्लेख असेल. त्या संस्थेंत त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनीं त्यांच्या केलेल्या अपमानाचें दर्शन त्यांत असेल. निर्बुद्धपणें हंसत सुटणाऱ्या सोबतच्या पोरींबद्दल त्यांना वाटणारा तिरस्कार त्यांत व्यक्त झाला असेल. कदाचित् घाई-गर्दींत त्यांनीं आपल्या आवडी-निवडी त्यांत लिहून ठेवल्या असतील. गरीब अपंगांबद्दल त्यांना वाटणारी विलक्षण ओढ त्यांत व्यक्त झाली असेल. आपल्या मानासिक प्रतिक्रियांची नोंद त्यांनीं त्यांत केली असेल. इतरांना नसली तरी बाईंना स्वतःला ती रोजनिशी खूपच मोलाची असली पाहिजे. वेगानें वाहणाऱ्या त्यांच्या जीवनप्रवाहांतील वेळोवेळीं आलेलीं वळणें, उठलेले तरंग त्यांत असले पाहिजेत. तें सारें त्यांच्याखेरीज कधीही कोणालाहि कळण्यासारखें नाहीं. जेव्हां जेव्हां मी त्यांना म्हणे, " बाई, तुम्हीं खूप चांगल्या आहांत ! " तेव्हां तेव्हां त्या त्या, दैनंदिनीकडे बोट दाखवीत आणि एरवींचें आपलें स्वतःचें विसंगत वागणें स्पष्ट करीत. आपण चांगल्या नाहींत असें त्या जेव्हां जेव्हां अतिशय आग्रहानें स्पष्ट करीत तेव्हां त्यांच्या विचारांची घडण मला अधिक स्पष्ट होई. स्वतःला सुख नाकारायचें नि इतरांना तें देण्यांत होणारा प्रामाणिक आनंद उपभोगायचा !

कॉलेजमध्यें असतांना एकदां अभ्यास करीत असतां होरेसच्या काव्याच्या इंग्रजी भाषांतरांतील एक गझल मीं त्यांना वाचून दाखवितांच त्या म्हणाल्या, " त्याचं म्हणणं बरोबर आहे हेलेन. अमकें एकादें निश्चित चांगलें किंवा निश्चित वाईट असें फारच थोड्या गोष्टींबद्दल म्हणतां येईल. मोठे लोक म्हणतात कीं दोषांचें समर्थन करतां येत नाहीं. पण पुष्कळ व्यक्तींच्या दोषांना चांगली बाजूहि असते. एकाद्याला आपण चिक्कू म्हणूं पण तो दुसऱ्याचें चांगलें करतां यावें म्हणूनहि पैसे वांचवीत असला पाहिजे. ज्याला आपण संतापी समजतों, असा एकादा गृहस्थ त्याच्या भोंवतालच्या लोकांच्या स्वार्थीपणावर नि हीनवृत्तीवर संतापत असेल. त्याच्या संतापांत

स्वतःचा स्वार्थ कांहींच नसतो. एकाद्याला आपण फार ‘ महत्त्वाकांक्षी ’ समजतों पण त्याच्या महत्त्वाकांक्षेचा हेतु दुसऱ्याचें कांहीं भलें करण्याची संधि गांठण्याची धडपड करणें हा असतो. तुझ्या भावना दुखावण्याचा माझा हेतु नाही. पण एकाद्या दोषाचें रोपण मनुष्यस्वभावावर लावून त्यांतूनहि एकादा मौलिक सद्‌गुण वाढूं शकतो हें तुला पटतें का ?”--मला वाटतें हें सारें बोलत असतांना बाई आपल्या रोजनिशीचा विचार करीत असल्या पाहिजेत.

“ मला असं वाटतं की दिवसभर आपण जी भाषा बोलतों आणि जें साहित्य वाचतों त्यांत सद्‌गुणांची आठवण देणाऱ्या शब्दांपेक्षां दुर्गुणांची उजळणी करणारे शब्दच अधिक असतात.” मी म्हणालें.

“ मला वाटतं अशा भाषेचा प्रवाह एकाद्या दलदलींत मिसळून नाहींसा होतो.” त्या म्हणाल्या, “ मानवी स्वभावांतील वाईट दाखविणाऱ्या शब्दांचा पुन्हा पुन्हा वापर करण्याची दुष्ट पद्धत मोडण्यासाठीं मानवी मनांतील सद्‌भावना दर्शविणारे नवे शब्द तयार करून ते आपण कां वापरूं नयेत ?”

पुढें असे शब्द एकत्र करण्याचें काम बोस्टनच्या युनिटेरियन चर्चचे डॉ. एडवर्ड एवरेट हेल यांनीं केल्याचें कळलें, तेव्हां आम्हांला आनंद झाला. डॉक्टरांनीं गेल्या पंचवीस ते पन्नास वर्षांतच तयार झालेले, मानवी सद्‌भावना आणि सद्‌विचार निदर्शक शब्द एकत्र केले होते. त्यांत ‘ आल्ट्रुइझम ’ आणि सॉलिडॅरिटी ( Altruism and Solidarity ) हे शब्दहि होते. डॉक्टरांचें म्हणणें असें होतें कीं, अजून शब्दांनीं व्यक्त न झालेल्या मानवी हृदयांतील प्रेम आणि इच्छाशक्ति ह्यांची ओळख करून देणारे आणखी किती तरी शब्द तयार करून ह्या यादींत घालतां येतील.

बाईंना असें वाटे कीं, जो ‘ चांगला ’ व्हायचा प्रयत्न करतो, त्याच्या वागण्यांत प्रामाणिकपणा आणि अंतःप्रेरणा असत नाहींत. मीं असा ‘ प्रयत्न ’ केला नाहीं. त्यांच्या सहवासांत मी सुखी होतें. माझ्या स्वभावांतील कुठलाहि दोष मी उचलून भिरकावून देत असें. असें करणें जेव्हां मला शक्य होत नसे, तेव्हां मी त्या शत्रूशीं सारखी लढाई करीत राही नि

अखेरीस लांडगा जसा आपलें भक्ष्य मिळवितो, तसा तो दोष, माझा शत्रु मी नाहींसा करीं. एकदां त्या दोषाचा निःपात केला कीं, पुन्हा त्याचा विचार करीत नसें. मला तसें करण्यास उत्तेजन दिल्याबद्दल मी ईश्वराचे नि बाईंचे आभार मानीं.

बाईंचें लोकांवर खरोखरीच खूप प्रेम होतें. त्यांच्या सामान्य जीवनापासून त्यांना खेचून आपल्याबरोबर नेण्याचा त्या सतत प्रयत्न करीत आणि इतकें असूनहि लोक त्यांना छळीत. अशा मठ्ठ लोकांशीं सहानुभूतिपूर्वक वागण्यांत बाईंनीं सारी हयात खर्च केली. त्यांच्या मूर्ख वटवटीचा त्यांना कंटाळा येई व त्यांतून त्या सुटूं पाहात. पण बाईंच्या चांगुलपणामुळें त्यांची निरर्थक बडबड बंद होई किंवा त्यांच्या आयुष्यांतला त्यांनीं सांगितलेला एखादा चांगला प्रसंग, एखादा असामान्य उद्‌गार, त्यांच्या चेहेऱ्यावर दिसलेला एखादा भाव किंवा त्यांच्या कुटुंबाबद्दल त्यांनीं सांगितलेला एखादा प्रसंग ह्यांनीं बाईंचें मन जागृत होई व त्या त्यांच्याबद्दल मनांत अनेक स्वप्नें पहात व त्यांत दंग होत. बाईंची बुद्धि ही अनेक सूर छेडण्याच्या तारा असलेल्या एखाद्या अतिशय संवेदनाक्षम तंतुवाद्यासारखी होती; पण आम्हांला भेटलेल्या बहुतेकांच्या लक्षांत हें आलें नाहीं. त्यांच्या एकमार्गी विचारांनीं बाई कंटाळत पण अशा लोकांशीं वागतांना बाईंनीं कधीं मोठेपणाची भूमिका घेतली नाहीं. अशा लोकांच्याबद्दल बाईंनीं मनाशीं ठरविलेलीं स्वप्नें जरी कधींहि सत्य झालीं नाहींत तरी त्या स्वप्नांचा परिणाम बाईंच्या मनावर राही व मग त्या माणसांचा सहवास त्या सहन करीत. पुष्कळदां अगदीं भिकार विचार-प्रदर्शन करीत बोलणारीं माणसें बाईंच्या एखाद्या उद्‌गारानें किंवा टीकेनें उत्तेजित होऊन नव्या कल्पना नि नवे विचार बोलून साऱ्या चर्चेत जिवंतपणा आणीत असल्याचें पाहून मला आनंद होई. अशा वेळीं त्या लोकांचे विचार त्यांच्यापेक्षां अधिक शिकलेल्या किंवा प्रसिद्ध व्यक्तीपेक्षांहि अधिक चांगले असत. आमच्या घरीं येऊन तासन् तास बोलत बसणारांचा वेळ बाईंच्यामुळें असा जाई.

त्याच वेळची आणखी एक सुखद आठवण येते. मानसशास्त्रावर बाई व जॉन ह्यांच्याशीं अतिशय मोकळेपणानें झालेली चर्चाही ती आठवण होय.

'द वर्ल्ड आय् लिव्ह इन्' ह्या माझ्या पुस्तकांत, मला शिक्षण मिळण्यापूर्वीचें जें माझें अस्तित्व होतें त्याबद्दल मीं लिहिलें नि त्यावर बाईंनीं व जॉननें मोकटपणानें माझ्याशीं चर्चा केली. कॉलेजमध्यें तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतांना मीं माझ्या 'जीवनकथेंत' माझ्या ह्या अवस्थेचें बरोबर वर्णन केलेलें नाहीं, हें माझ्या लक्षांत आलें. मी रॅडक्लिफमध्यें गेलें तेव्हां माझी जीवनकथा अनेक वेळां सांगून झालेली होती व त्या अर्थानें मी जरी खूप परिचित व मोठी झालेली असलें तरी व्यक्ति म्हणून मी खूप लहान आणि अपरिपक्व होतें. हेलेन नांवाची मुलगी इतर मुलींच्यासारखी आहे हें दाखवायला इतकी उत्सुक होती कीं, तिला सहजपणें आपले मनोव्यापार हे इतर मुलींच्या मनोव्यापाराप्रमाणेंच आहेत असें वाटलें. मनांत एक योजना तयार करून ती हेलेन शब्द लिहिण्याच्या आनंदाचा उपभोग घेण्यासाठीं, शब्दामागें शब्द लिहीत गेली व तसें करतांना तिचें शिक्षण सुरू होण्यापूर्वीच्या तिच्या आयुष्याचा तिनें काळजीपूर्वक विचार केला नाहीं. माझ्या 'जीवनकथे'कडे आतां मी जेव्हां नजर टाकतें, तेव्हां त्यांतील तपशीलांच्या उणीवा माझ्या लक्षांत येतात. मला असें आढळून आलें कीं, मी माझ्या विचारांची सांखळी फार आग्रहानें विणीत गेलें व त्यांत ज्या अवस्थेंत माझ्यांतील 'भुता'ला कसलीहि जाणीव नव्हती, त्या अवस्थेंतील विचारहि मांडले. ह्या स्वतःचें व्यक्तिमत्व नसलेल्या अवस्थेच्या कालखंडांत मला जाणीव नव्हती. पण त्या कालखंडाची मात्र जाणीव राहिली. माझ्या 'द वर्ल्ड आय् लिव्ह इन्' मधील 'बिफोर द सोल डॉन' (Before the Soul Dawn), ह्या दहाव्या प्रकरणांत माझें पूर्वीचें म्हणणें बदलून लिहिण्याचें मीं ठरविलें. मी आतां खालीं जो मजकूर देत आहें, त्या मजकुरामुळें माझ्या कुटुंबांत बरीच खळबळ उडाली.

'एखादी वस्तु मला समजत होती कीं नाहीं, तें मला ठाऊक नव्हतें. मी जिवंत आहें, वावरतें आहें, मला इच्छा आहेत, हेंहि मला कळत नव्हतें. मला इच्छाशक्ति नव्हती नि बुद्धीहि नव्हती. एखाद्या वस्तूकडे मी आकर्षित होई किंवा मला कांहीं करावेंसें वाटे तें केवळ प्रत्येक प्राण्यांत असणाऱ्या प्रवृत्तिमुळें. मला मन होतें नि

त्या मनामुळें राग, समाधान, इच्छा कळत. ह्या दोन गोष्टींमुळें माझ्या भोंवतालच्या लोकांना वाटे कीं, मला इच्छाशक्ति असून मी विचारहि करतें. मला हें सारें आठवतें तें मला तें तसें आहे हें कळत होतें म्हणून नव्हे. तर स्पर्शज्ञानानें येणारी स्मरणशक्ति माझ्यांत आहे म्हणून. त्या स्मरणशक्तीमुळें मला असें स्पष्ट आठवतें कीं, विचारांत गर्क होऊन मीं माझ्या कपाळाला कधीं आठी घातली नाहीं. मला कुठल्याहि गोष्टीचें पूर्ण ज्ञान नसे किंवा मला निवड करतां येत नसे.'

वरील परिच्छेद वाचून माझ्या आईच्या मनाला वाईट वाटलें नि तो मी वगळावा असें तिनें मला सांगितलें. तस्कंबियाला बाई येण्यापूर्वी मी अर्धवट असल्याचें एक-दोन लोकांनी सांगितलें होतें किंवा तसें ध्वनित केलें होतें. आईला असें वाटलें कीं, मीं वर लिहिलेल्या शब्दांमुळें मी मानसिक दृष्टीनें सर्वसाधारण नव्हतें हें स्पष्ट होईल. खरोखरीच अर्धवट पोरें शिकविण्याचा बाईंना जरी अनुभव होता तरी वरील शब्दांमुळें आपली मुलगी आजारामुळें सुप्तावस्थेंत जगत होती एवढेंच सिद्ध होतें, हें आईला पटवून देण्यास त्यांना आपलें सारें कौशल्य खर्च करावें लागलें. बाईंना ह्या प्रसंगीं वाटणारा अभिमान लपवतां येत नव्हता. ह्यामुळें मी विचारांनीं स्वतंत्र झालें. एवढेंच नव्हे, तर मीं जें आयुष्य जगलें त्याची कल्पना वाचनीय, सहज समजणाऱ्या, शब्दांनीं देऊं शकलें. ह्याचा त्यांना अभिमान तर वाटलाच; पण त्यामुळें ह्यापुढें वाङ्मयांत आपण दोघी खऱ्या सहचरी होणार आहोंत असें त्यांनीं बोलून दाखविलें. वाङ्मयक्षेत्रांत मी आत्म-प्रकटीकरणांत स्वतंत्र झाल्याचें त्यांना समाधान वाटलें. लिहितांना मला वाटणारी भीति त्यांनीं पूर्णपणें घालविली.

माझ्या पुस्तकावर टीका करायला एक नाहीं तर दोन टीकाकार होते हें बघून मला आनंद झाला. बाई आणि जॉन दोघेहि. माझें शिक्षण संपल्यावर कांहीं दिवसांतच बाईंची व माझीहि प्रकृति बिघडली. 'अंध' आणि 'अंधत्वाचा प्रतिकार'' ह्या दोन विषयांवर लेख लिहिण्याबद्दल मला

सारखे तगादे येत असत व जनतेला हवी असणारी ही माहिती देण्यांत मोठी सेवा होणार आहे असें मला सांगण्यांत आल्यानें प्रकृति धड नसूनहि मी नाहीं म्हणत नसें. मी प्रथम ब्रेलांत हस्तलिखित तयार करी आणि मग टाइपरायटरवर तें टाइप करी. रोजचा पत्रव्यवहार सांभाळून लेख टाइप करतां करतां माझे हात थकून काम करीनासे होत. बाईंची दृष्टि इतकी अधू झाली होती कीं मला पुस्तकें वाचून दाखवणें त्यांना शक्यच नव्हतें. तेव्हां जॉन हस्तलिखित मोठ्यानें वाचीत, बाई आपल्या सूचना देत, नि मग जॉन माझें हस्तलिखित दुरुस्त्या करीत करीत कित्येकदां पुन्हा पुन्हा वाचीत.

एकदां मे महिन्यांत एका अतिरम्य सकाळीं आम्ही शेताची भिंत घालीत होतों. ह्या भिंतीपर्यंतच मला शेतांतून फिरायला जायची सवलत होती व ती हद्द मीं वाढवून घेतल्यानें मोठ्या उत्साहानें आम्ही काम करीत होतों. एकावर एक दगड रचीत असतां प्रत्येक दगडावरून हात फिरवून त्याचा आकार व पृष्ठभाग, मी चांचपडून पहात होतें. त्या स्पर्शांतून आजपर्यंत माझ्यापासून लपलेलें एक नवें सौंदर्य प्रतीत झालें. मी भूगर्भ-शास्त्रावरील एक पुस्तक नुकतेंच वाचलेलें असल्यामुळें मी विशेष चौकसपणें त्या दगडांचा आकार चांचपडून पहात होतें. त्या खडबडीत दगडांतहि एक प्रकारचें सौंदर्य असल्याचा भास मला झाला. " बाई," मी जवळ-जवळ ओरडलेंच, " माझ्यांत जर पुरेसें कवित्व असेल तर ह्या दगडांत लिहितां येण्यासारखें काव्य खचित आहे."

" कां नाहीं ? " बाई उत्सुकतेनें म्हणाल्या. माझ्या बोटांच्या नाजुक स्पर्शांत तयार होत असलेलें काव्य त्या बघत होत्या व शब्दांत तें उतरावें असें त्यांना वाटत होतें. त्या तेथेंच बसल्या. भिंतीकडे त्यांनीं निरखून पाहिलें नि त्या भिंतीला झाकून टाकणाऱ्या झुडपांच्या आणि फुलांच्या सुंदर गालिच्यांचें त्यांनीं वर्णन केलें. भिंतीवर सूर्यकिरण पडून छाया-प्रकाशाचे चालणारे नाजुक खेळ त्यांनीं वर्णन करून सांगितले. त्यांचे ते शब्द पुढें मी एकांत एक गुंफून त्यांच्या काव्यपंक्ति विणल्या.

पुढें कितीतरी वेळ सगळीं कामें विसरून मी ती दगडी भिंत आणि प्युरिटन्स ह्यांचा संबंध त्या काव्यांत कसा लावणार तें बाईंना सांगत होतें. मी लिहिणार असलेल्या काव्यांत मला दगडी भिंत आणि प्युरिटनांचें शूर जीवन आणि धाडसी ध्येयवाद ह्यांची सांगड घालायची होती. दुसऱ्या दिवशीं जॉननीं आम्हाला जुन्या स्मशानांत नेऊन थडग्यावर बसविलेले नि काळानें झिजवून गुळगुळीत केलेले पण अमर विश्वासाचें प्रतीक बनलेले दगड दाखविले. स्पर्श करून मीं ते दगड पाहिले. पुढें कित्येक आठवडे योग्य शब्द शोधून काढण्यासाठीं मीं न्यू इंग्लंडचा इतिहास वाचण्यांत घालविले. बाईंना वेळ मिळाला कीं मीं लिहिलेलें त्यांना वाचून दाखवीं. मग त्याच ओळी मी त्यांना माझ्यासाठीं म्हणायला सांगे. त्यांच्या ओठावर मी हात ठेवी व त्या ओठांच्या हालचालीवरून मी लिहीत असलेले शब्द ऐकायला कसे असतील ह्याची कल्पना मला येई. माझ्या शब्दांतून नादमाधुर्य तयार होईपर्यंत बाई सूचना देत रहात. पुढें माझी कविता "सेंच्युरी मॅगझीन" नें प्रसिद्धीसाठीं स्वीकारतांच त्यांना अतिशय आनंद झाला. त्या म्हणाल्या, "शेले म्हणतो तशा जगाच्या जन्मापासून थोर पुरुषांनीं एकदिलानें ज्याची निर्मिती केली त्या 'काव्यां'त तूं, ओबडधोबड का होईना, पण भर टाकलेली पाहून मला अभिमान वाटतो." माझ्या दि साँग ऑफ द स्टोन वॉलची जन्मकथा ही अशी आहे.

मला ईश्वरानें दिलेल्या 'प्रेम', 'विचार', 'क्रिया' आणि 'शब्द' म्हणजे ज्यामुळें मला माझ्या भावना दुसऱ्याशीं व्यक्त करतां येत होते असे हे चार गुण वाढीला लावण्याचे अनेक नवे नवे मार्ग बाई माझ्यासाठीं हुडकून काढीत होत्या. आपल्या हृदयांतली उदात्तता प्रकट करण्याची इच्छा त्यांच्यामुळें इतरांना होत असे.

अंधांना कांहीं प्रमाणांत का होईना पण स्वावलंबी कसें करावें ह्या विषयावर लेखावर लेख मी टाइप करून पाठवीत होतें. अनेक अंध स्त्री-पुरुष आमचे घरीं येत होते. त्यांचा पाहुणचार करतांना आम्हांला आनंद होई. हें सारें ठीक होतें. पण व्यक्तिशः त्यामुळें आम्हांस कांहींच मिळत

नव्हतें. घरकामें करीत बाईंची अमर्याद कर्तबगारी संपुष्टांत यावी हा विचारहि मला सहन होत नसे. बाईंच्या आयुष्याची कांहींतरी तरतूद करावी असें मला वयाच्या सोळाव्या वर्षांपासून वाटत होतें कितीतरी वर्षें अनेक प्रसंगांना तोंड देत घालवल्यावर पुढें माझें तें उद्दिष्ट साध्य झालें.

# ११

१९१४ च्या अखेरीस बाईंना आयुष्यांतलें सर्वांत मोठें दुःख सहन करावें लागलें. कित्येक दिवस त्या स्वतःला कोंडून घेत नि जॉनना परत आणण्याचा मार्ग शोधीत अथवा आतां आपल्यावरील प्रेम नाहींसें झालें आहे, ह्याची जाणीव झालेली स्त्री जसें हृदय पिळवटून रडते तशा रडत. आई त्या वेळीं आमच्याबरोबरच राहात होती. बाईचें तें दुःख पाहून तिचें हृदय विदीर्ण होई. ती म्हणाली, "इतर विवाहित स्त्रियांपेक्षां बाईंच्यासारख्या सुंदर, हुशार स्त्रीला दैव अधिक सहृदयतेनें वागवतें ह्यावर माझा विश्वास नाहीं हेलेन. बाईंनीं कितीतरी बेत मनाशीं ठरविले होते. जॉनसारखा कर्तबगार पुरुष ते पुरे करूं शकला असता. आतां त्यांचें तें सारें जीवन नष्ट होत आहे, सारे मनोरे ढांसळून पडत आहेत."

बाईंच्या चेहेऱ्यावरील सुखाचें स्मित नाहींसें झालें. त्यांच्या स्वभावामुळें आपलें दुःख त्या व्यक्त करीत नसत आणि कोणीं त्यांचें सांत्वन केलेलेंहि त्यांना चालत नसे. आपलें तें हृदयभेदी दुःख त्या इतर कोणाजवळ उघड करीत नसत. रात्रीच्या काळोखांत, त्या माझ्यापुढें आपलें हृदय उघडें करीत. त्यांची प्रकृति बिघडली होती. पूर्वीं त्या भरपूर व्यायाम घेत असत. पण आतां स्थूलपणानें त्यांना तें शक्य होईना. त्यांचे डोळे अधिकच बिघडले. त्यांना वाचनाचें समाधानहि मिळेनासें झालें. पण आपल्या दुःखाचा परिणाम माझ्यावर होऊं द्यायचा नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला होता. त्यांनीं मला अतिशय निर्मळ वातावरणांत वाढविलें होतें नि त्यावर आपल्या दुःखाची छाया पडूं द्यावयास त्या तयार नव्हत्या.

१९१४ च्या सुरुवातीला अति पश्चिमेकडील भागाच्या व्याख्यान दौऱ्यावर आई आमच्याबरोबर आली होती. आतां बाई आमच्या नव्या सहचरीला सर्व समजावून सांगत होत्या. पॉली थॉमसन ही आमची नवी सहचरी. ती स्कॉटिश तरुणी होती. अमेरिका पाहावयाची नि आमची सेवा करायची ह्यापलीकडे तिच्या कसल्याच अपेक्षा नव्हत्या. थोड्या महिन्यांच्या शिक्षणानंतरच ती सर्व अमेरिकाभर आमच्याबरोबर आली. बाईंच्या स्वभावांतील सर्व लहरीपणा समजावून घेतांना पॉलीनें दाखविलेलें धैर्य दक्षिण-उत्तर ध्रुवाची पाहणी करणाऱ्या किंवा आफ्रिकेच्या निबिड अरण्यांतील अंधःकारांत पाऊल टाकणाऱ्या एकाद्या धाडसी वीरालाहि क्वचितच दाखवावें लागलें असेल.

जीवन असह्य वाटावें एवढ्या बाई त्यावेळीं दुःखी आणि उदास असत. खरोखर आपणाला वेड लागेल कीं काय अशी कांहीं काळपर्यंत त्यांना भीतीहि वाटे. पण त्यांच्या बुद्धिवर तसा परिणाम झाला नव्हता नि बुद्धीचें किंवा मेहनतीचें काम त्या अजूनहि करीत. परिणाम झाला होता तो त्यांच्या कल्पनाशक्तीवर, विचारशक्तीवर नाहीं. पण त्या दुखावलेल्या कल्पनाशक्तीनें त्यांच्या नियमित वागण्यावर परिणाम केला आणि मानगुटीवर बसलेल्या दुःखाला झटकून टाकण्याचे उद्देशानें त्यांनीं आपले कार्यक्रम आंखावयास सुरुवात केली. त्यांना पुरेशी विश्रांति मिळत नसे. सकाळच्या सुमारास त्यांचे डोळे कमी दुखत व झोप लागे. म्हणून शक्य असेल तेव्हां त्या उशिरां उठत आणि त्यांचें सारें चैतन्य जाळून टाकणाऱ्या त्या दुःखाला तोंड देण्यासाठीं तयार होत. एखादे वेळीं त्या माझ्या खांद्यावर डोकें ठेवून म्हणत, " मला ह्या दिवसाची भीति वाटते बघ. " मग त्या स्वतःला सांवरून घेत ताठ बसत आणि म्हणत, " माझं काय झालं ह्याच्याशीं आपल्या श्रोत्यांचा कांहीं संबंध नाहीं. निदान तुझी हकिकत मी त्यांना सांगेन. त्यामुळें दुःखाखालीं चिरडून जाणाऱ्या कांहीं लोकांना तरी तो भार सहन करण्याची इच्छा होईल. आपल्यासाठीं लोकांनीं किती किती केलं त्याचा विचार कर आणि निदान सेवा करून तरी त्यांचं तें ऋण फेडण्यासाठीं मला मदत कर. हेलेन, शेलेच्या त्या ओळी आठवः—"

'A ray of courage to the oppressed and poor;
A spark though gleaming on the hovel's hearth,
Which through the tyran'ts gilded domes shall soar,
A beacon in the darkness of the earth:
A sun which, over the renovated scene,
Shall dart like Truth where Falsehood yet has been."

अशा तऱ्हेनें आम्हीं प्रवास केला, व्याख्यानें दिलीं पण बाईंची तरतूद करून ठेवण्याची माझी इच्छा अजून पुरी झाली नव्हती.

आमचा खर्च व्याख्यानें देऊन भागवायचा असें आम्ही ठरविलें होतें. शक्य असेल तेव्हां लेख लिहूनहि मी पैसे मिळवीत असें. आमचे उदार मित्र अँड्र्यू कार्नेगी ह्यांनीं मला पेन्शन दिलें होतें व त्यामुळें मला खूप मोठी मदत झाली. त्यांनीं अशी मदत केली नसती तर आमच्यासारख्या दोन अपंग स्त्रियांना रेंथॅम किंवा लॉंग आयर्लंडवर घर ठेवणें शक्य झालें नसतें किंवा बाईंना प्रकृति सुधारण्यासाठीं पोर्टो रिकोला पाठविणेंहि मला जमलें नसतें.

१९१६ च्या हिंवाळ्याच्या सुरुवातीला अशक्ततेमुळें बाईंना खोकल्याचा त्रास होई. म्हणून उपचारासाठीं त्या लेक प्लॅसिडला गेल्या होत्या. पॉली बाईंच्याबरोबर गेली आणि मी व आई आलाबामाला गेलों. पॉलीनें पत्रांत लिहिलें कीं वाईट हवा, एकटेपणा, आणि भोंवतालचीं माणसें ह्यांना बाई कंटाळल्या आहेत. मनासारखें वातावरण नसलें तर त्या डॉक्टरांचेंसुद्धां ऐकत नाहींत हें मला माहीत होतें व म्हणून पॉलीनें जेव्हां बाई व ती बोटीनें पोर्टो रिकोला जाण्यासाठीं निघाल्याचें लिहिलें तेव्हां मला मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं.

आनंदानें ओथंबणारे शब्द बाईंच्या पत्रांतून जेव्हां मला वाचायला मिळाले तेव्हां कार्नेगींच्या औदार्याबद्दल मला केवढी कृतज्ञता वाटली! आयुष्यांत दुसऱ्या कोणत्याहि मदतीबद्दल मला अशी कृतज्ञता वाटली नसेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक ........... दि:
क्रमांक नों. दि:


बाईंचें पहिलेंच पत्र वाचतांच मी तर श्वासच रोखून धरला. त्या आणि पॉली बर्फाळ प्रदेशांतून जाणाऱ्या थंड झोंबऱ्या वाऱ्यांतून अकरा दिवस बोटीनें प्रवास करीत असल्याचें त्यांनीं लिहिलें होतें. हा वारा जणूं शरीर निर्दयपणें चिरीत जात असे. "हें सारेंच चमत्कृतिपूर्ण वाटतें हेलेन," त्यांनीं लिहिलें होतें, "मी जागी आहें का स्वप्न पाहतें आहें तें नक्की समजावून घेण्यासाठीं स्वतःलाच चिमटा घेऊन पाहिला. पाण्याच्या त्या निरुंद पट्टीपलीकडे उन्हांत न्हात असलेलें पोर्टो रिको खवळलेल्या सागरांत उभ्या असलेल्या एकाद्या जहाजाप्रमाणें दिसतें आहे."

त्या स्वर्गीय सौंदर्याचें नतर अनेक पत्रांतून त्यांनीं वर्णन केलें. तेथील रंगांचें अनिर्बंध नृत्य वर्णन केलें. डंवरलेले वृक्ष, गुलाबाची व अनेक तऱ्हेचीं अनोळखी फुलें ह्यांचीं वर्णनें त्यांच्या पत्रांत असत. तेथील हवा त्यांना फारच आवडली. त्या म्हणतात, "हवा उबदार आहे, पण उष्ण नाहीं." तेथील घरांचें वर्णन करतांना त्या म्हणतात, "घरांना खिडक्या मुळींच नाहींत. स्थानिक लोक अंगावर फारच थोडे कपडे घालतात. लहान मुलें तर अगदीं नागडींच राहतात. इंद्रधनुष्यांत असणारे सर्व रंग येथील घरांना दिलेले आहेत व त्यामुळें रस्ते अगदीं प्रेक्षणीय दिसतात."

बाईंनीं जुन्या अमेरिकन पद्धतीच्या ब्रेल लिपींत लिहिलेलीं तीं पत्रें पाहतांच कित्येक वर्षें त्यांची ब्रेल लिपी लिहिण्याची संवय सुटल्यामुळें त्यांना पत्र लिहितांना किती कष्ट पडत असतील ह्याची मला जाणीव झाली. माझ्यासाठीं त्यांनीं घेतलेले हे कष्ट आणि जीवन जगण्यांत त्यांना पुन्हा वाटणारा आनंद ह्यामुळें तीं पत्रें मला अतिशय प्रिय आहेत. पोर्टो रिकोला पूर्वींची आनंदी, साहसप्रिय ॲनी सलिवन् पुन्हा जिवंत झाली होती. त्यांची पूर्वींची स्वतंत्र वृत्तीहि आतां पुन्हा जागी झाली होती. त्यांच्या पत्रांत त्या लिहितात—"टेकडीवर मी एक झोंपडी घेणार असून स्वयंपाकपाणी घरींच करणार आहें. मी या जागेला कँप म्हणतें. ह्या जागेंत चार खोल्या आहेत. जरूरीचें सर्व सामान मी विकत घेणार असून राहतां येईल तितकं चांगलं राहाणार आहें. माझ्या हातून कांहीं काम होण्यासारखी

ताकद येण्यास मला बराच वेळ लागेल व इतर कुठल्याहि ठिकाणापेक्षां इथें माझा वेळ अधिक सुखांत जाईल."

बाईंच्या ह्या निर्णयामुळें आम्हांला काळजी वाटली. पण त्यांच्या पुढच्याच पत्रांत त्यांनीं आमची काळजी दूर केली. त्या लिहितात—"पोर्टो रिकोबद्दल आईचं मन विनाकारणच दूषित झालेलं आहे. तिला असं समजावून सांग कीं एप्रिलपर्यंत मी इथेंच राहणार आहें. प्लॅसिडला परत जाण्यापेक्षां मी एखाद्या सिंहाच्या गुहेंत जाऊन मान देणें अधिक पसंत करीन."

त्या पुढें लिहितात—"आपलें हित कशांत आहे तें समजून योग्य तेंच करण्याचें जर आपण सर्वांनीं ठरविलें तर हें जग किती निराळें होईल! अर्थात् तें इतकें आकर्षक राहणार नाहीं. तथापि आपल्या हिताचें काय आहे तें मात्र आपल्याला कळत नाहीं. तो प्रयोग करण्यांत मी माझे दिवस घालवीत आहें. प्रयोग पुष्कळदां मनोरंजक आणि खर्चाचें असतात. पण ज्ञान मिळवायचा ह्याहून दुसरा कुठलाहि मार्ग उपलब्ध नाहीं......इथें सुखापासून कुणी दूर राहूं शकत नाहीं हेलेन, इथें सारे सुखी, आळशी आणि ध्येयहीन बनतात, म्हणजे जीं 'पापें' करूं नयेत म्हणून आपल्याला शिकविलें आहे तीं 'पापें' करीत असतात."

बाई आणि पॉली त्या झोपडींत आतां स्थायिक झाल्या होत्या. बाई रात्रीं "केळीचीं पानें चघळणाऱ्या बैलांच्या रवंथाच्या तालांत झोपीं जात" असल्याचें त्यांनीं लिहिलें होतें. त्यांच्या खोलीचें चित्र मीं माझ्या नजरे-समोर उभें केलें. 'बरेचसे बैल ॲनीच्या खोलींत शिरले आहेत नि तिच्याकडे टक लावून पाहात आहेत. बाईंनीं पाळलेला बायामान कुत्रा जोरजोरानें त्यांचेवर भुंकतो आहे नि बाई खदखदून हंसताहेत......"

सूर्यास्त पाहण्यासाठीं त्या आणि पॉली झोंपडीच्या अंगणांत येऊन बसत. त्या दुसऱ्या एका पत्रांत लिहितात, "ह्या जागेनें मला भारून टाकलें आहे. माझ्यांतलें कांहींतरी झोपीं गेलें होतें तें आतां जागें झालें आहे. सॅन वॉनला मी उतरलें तेव्हां बऱ्याच वर्षांनीं मीं माझ्या मायदेशांत पाऊल टाकल्यासारखें मला वाटलें."

ब्रेल लिपींत हीं सर्व सुंदर वर्णनें लिहीत असतांनाच बाई पॉलीला सर्व कामें शिकवीत होत्या. त्यांची प्रकृति चांगली नव्हती. पण पॉली त्यांचेबरोबर असल्यानें मला बरें वाटलें.

पोर्टो रिकोला मोटर वापरणें फार खर्चाचें नव्हतें. आमचा शोफर हॅरी लॅब आमची गाडी तेथें घेऊन गेला. हॅरीची आपल्याला खूप मदत होईल व मोटरीमुळें त्या निर्जन जागीं आपली आतां खूपच सोय होईल असें बाईंनी लिहिलें.

ह्या ठिकाणीं बाईंना आलेला एक चमत्कारिक अनुभव त्यांनीं लिहिला आहे. रात्रीं सॅन वॉनवरून परत येत असतां हॅरीनें एका वळणावर गाडी थांबविली नि तो ओरडला-" तें पाहा. " पॉलीनें त्या अंधुक प्रकाशांत डोकावून पाहिलें. मी मात्र भीतीनें जागचे जागीं खिळून बसलें. त्या क्षणीं माझ्या मनःचक्षूपुढें दोन नग्न पुरुष प्राणांतिक द्वंद्व करीत असल्याचें दृश्य दिसलें आणि बाहेर अक्षरशः तेंच घडत होतें. हें पॉलीनें नि हॅरीनें पाहून मला सांगितल्यावर मी तर आश्चर्यानें थक्कच झालें. अद्‌भुत वाटतें नाहीं ? कारण कांहींहि असलें तरी आपण जुने प्रसंग पुन्हा पाहत आहोंत असें मला वाटतें. मनांत आलें, कदाचित् सलिवन घराण्यांतील एकाद्या आयरिश स्त्रीनें एकाद्या स्पॅनिश सैनिकावर मनापासून पण मूर्खपणानें प्रेम केलें असेल. तुला माहीतच आहे कीं इतिहासकालीं आयर्लंडवर हल्ला करणाऱ्या सैनिकांत फ्रेंच, डच, स्पॅनिश असे सर्व राष्ट्रांचे भाडोत्री सैनिक असत.

त्यांनीं आईला व मला तिकडे बोलावलें, पण त्यांना ह्वा असणारा एकांत ह्यामुळें नाहींसा होईल म्हणून मीं नि आईनें जायचें नाहीं असें ठरविलें.

कित्येकदां पत्रांतून त्या मला उपदेश करीत. एकदा त्यांनीं लिहिलें- " भविष्याची काळजी तूं करूं नयेस हेलेन, मी बरी होणार आहें. इतक्यांतच मरणार नाहीं "............" मी मेलें तरी तूं कां जगूं नयेस ? " ............" शिवाय ईश्वराची दयाळू दृष्टि तुझ्यावर आहे. तुझी श्रद्धा. ............ कुठल्याहि परिस्थितींतून एकाद्यानें बाहेर पडावयाचें ठरविल्यास मार्ग सांपडतोच......... "

माझ्या लेखनांतूनच इतरांशीं मी बरोबरी करूं शकतें ह्याची आठवण देऊन त्या लिहितात—"......एकादा योग्य शब्द सांपडावा म्हणून मोटे-मोठे लेखकहि रात्रंदिवस प्रयत्न करीत असतात......तुला मानवांची सेवा करायची आहे. लेखनाखेरीज कुठल्या मार्गानें तूं हें करूं शकशील? .."

अमरत्वावर त्यांचा विश्वास नव्हता. त्या लिहितात—"....मी तुझ्या श्रद्धेंत तुझी सहभागी होऊं शकत नाहीं. मला हेंच आयुष्य महत्त्वाचें वाटतें. आपण **आत्तां** आणि **इथें** जें करतों तेंच महत्त्वाचें आहे. कारण इतर माणसांवर आपल्या कृत्यांचा परिणाम होत असतो ......" "......काव्य म्हणून बायबल मला आवडतें, तें सुंदर आहे. पण ज्या अंतःस्फूर्तीनें उत्तम लिखाण लिहिलें जातें त्यापेक्षां निराळी स्फूर्ति हें बायबल लिहितांना ईश्वरानें दिली होती असें मला वाटत नाहीं...मला प्रेम अमर वाटतें. अमर हा शब्द मी 'माझी कल्पनाशक्ति जिथपर्यंत पोंचूं शकते तिथपर्यंत' ह्या अर्थानें वापरतें..."

मला बाईंना असें आवर्जून सांगावेंसें वाटत होतें कीं न्यू चर्चचीं तत्त्वें नि श्रद्धा मला माझ्या अंधत्वांत नि बहिरेपणांत 'समाधान' वाटावें म्हणून मीं स्वीकारलीं नाहींत, आनंदानें स्वीकारलीं. मला त्यांना आश्वासन द्यावेंसें वाटतें कीं जीवनावर मी प्रेम करतें तें जगण्यासाठीं नि बाई, तुम्ही त्या जीवनांत आलांत म्हणूनच.

# १२

बाईंची तरतूद करावी म्हणूनच मीं हॉलिवुडमध्यें जाऊन माझ्या जीवनकथेवर चित्रपट काढू देण्याचें ठरविलें. बाईंची प्रकृति बरी झाली नव्हती. पण चित्रपटाच्या कामांत त्यांचें मन रमलें. चित्रीकरणाच्या वेळीं उसंत मिळतांच आम्ही कामगार आणि डायरेक्टर ह्यांच्याशीं बोलत बसूं. बाईंचें आणि चित्रपट कंपनीच्या मालकाचें बरेच वेळां भांडण होई. त्याला

एक ‘ सनसनाटें ’ चित्र काढावयाचें होतें तर बाईंचें व माझें असें मत होतें कीं जें प्रत्यक्ष घडलें तेंच फक्त द्यावें. ह्याबाबत त्याचें व आमचें एकमत कधींच झालें नाहीं. चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांनीं आमच्या कार्याला मदत करावी अशी त्यांना विनंती करावयाचें दिलेलें आश्वासनहि त्यानें शेवटीं पाळलें नाहीं.

सारे आमच्याशीं प्रेमानें वागत, पण बाईंचें विशेष पटलें तें चार्ली चॅपलिनशीं. बाईंचें नि चार्लीचें लहानपण अतिशय दारिद्र्यांत गेलें होतें. दोघांनींहि शिक्षण घेतां यावें म्हणून परिस्थितीशीं निकराचा सामना दिला होता आणि आयुष्यांत यश मिळविल्यावर परिस्थितीनें अडलेल्यांचेकडे सहानुभूतीनें पाहिलें होतें. त्यामुळें त्यांना एकमेकांचीं मनें समजत होतीं.

माझी भरपूर स्तुति सर्वत्र होत होती व त्या मानानें बाईंच्या कार्याचा गौरव कमी होत होता हें पाहून मला फार वाईट वाटे. बाई माझें मन स्वत:च्या विचारांनीं भारून टाकतात हाहि त्यांचेवर एक आरोप होता. वास्तविक मला काय हवें तें बोलण्याचें नि लिहिण्याचें स्वातंत्र्य होतें. लोकांना मात्र वाटे कीं बाई आपलीं मतें माझेकडून वदवून घेतात. माझ्या जीवनकथेंत मला बाईंनीं स्वत:बद्दल कांहीं लिहूं दिलें नाहीं.

माझ्यावर दोन विषय सक्तीनें लादले गेले नि मला त्यांचा कंटाळा आला होता. पहिला विषय म्हणजे मी स्वत: नि दुसरा म्हणजे अंध. १९०६मध्यें मॅसॅच्युएट कमिशन फॉर द ब्लाइंड ह्या संघटनेची सभासद म्हणून बाईंचेऐवजीं माझीच नेमणूक करण्यांत आली. खरं म्हटलं तर बाईंना ह्या कामाचा दीर्घ अनुभव होता. अपंगांना मदत करण्याचे नवे नवे मार्ग शोधून काढणाऱ्या बाईंचा सल्ला घ्यावयाचेऐवजीं माझा सल्ला घेण्यांत येत होता. आमच्या रेंथमच्या घरींहि अंध, मूक आणि बहिरे ह्यांच्या प्रश्नावर बाईंच्याऐवजीं लोकांनीं माझ्याशीं चर्चा करीत बसावें, ह्याचें मला अतिशय वाईट वाटे.

रेंथमच्या घरीं आम्ही जेव्हां स्थायिक झालों, तेव्हां मीं फक्त अंधांचेसाठीं काम करावयाचें असें ठरलें होतें. अंधत्वप्रतिबंधक उपाययोजनेबद्दल

— ६ —

मीं काम करणार नव्हतें. अंधांचाच प्रश्न मला पुरेसा होता. मी फारच थोडा काल स्वतंत्रपणें काम करीत होतें व अधूनमधून मार्गदर्शनासाठीं मला बाईंचा सल्ला घ्यावा लागे. आम्ही खूप वेळ चर्चा करीत बसत असूं. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी ह्या देशांत हा प्रश्न कसा सोडविण्यांत येतो ह्याची माहिती असलेलीं इंग्लिश, फ्रेंच, जर्मन भाषेंतील पुस्तकें जॉन मोठ्यानें वाचून दाखवीत. अमेरिकेंत त्या वेळीं अंधशिक्षणाची सोय करण्याची चळवळ अगदींच बाल्यावस्थेंत होती, ह्याची आठवण हें वाचतांना ठेवली पाहिजे. त्या वेळीं अंधांना शिक्षण देणाऱ्या फारच थोड्या शाळा अमेरिकेंत होत्या व अंधांना शिकवावें कसें ह्याची माहिती असलेलीं माणसेंहि फारच थोडीं होतीं. परिस्थितीचा मीं जसजसा अधिक अभ्यास केला, तसतशा माझ्या मर्यादा माझ्या लक्षांत येऊं लागल्या.

समाजाला त्या वेळीं आणि अजूनहि वाटे कीं, सारे अंध एकसारखेच असतात. पण जशीं दोन डोळस माणसें एकमेकासारखीं नसतात, तसेंच दोन अंध एकमेकांसारखे असत नाहींत. प्रत्येक अंध व्यक्ति दुसऱ्या अंध व्यक्तीपेक्षां निराळी असते. म्हणजे जितके अंध तितके त्यांचे व्यक्तिप्रकार. अंध अर्भकांच्या शिक्षणाचा प्रश्न निराळा आहे, तर ज्या बालकांना अतिशय थोडें दिसतें किंवा अजिबात दिसत नाहीं, त्यांचा प्रश्न निराळा आहे. प्रौढ अंधांना उपजीविकेचें साधन मिळवून देण्यासाठीं त्यांना कारखान्यांतून कामें मिळवून देण्याचा किंवा त्यांचे घरीं त्यांना करतां येतील अशीं कामें मिळवून देण्याचाहि प्रश्न आहे. वृद्ध आणि अपंग अंधांचा प्रश्न आणखी निराळा आहे. अंधांच्या अशा निरनिराळ्या अडचणी दूर करणें ही सरकारची जबाबदारी आणि समाजाचें कर्तव्य आहे. हें सारें करीत असतांना नवे नवे प्रश्न सोडविणें आवश्यक झालें तर त्यांत नवल काय ? नि बाईंचा अनुभव लक्षांत घेतला तर मीं त्यांना एक देवता मानून त्यांची दूत म्हणून त्यांच्या सल्ल्यानें काम केलें तर त्यांत चमत्कारिक वाटण्यासारखें काय होतें ?

जेव्हां Ophthalmia (neonatorum' जन्मतःच येणारें अंधत्व, ह्यावर चर्चा करणें समाजांत निषिद्ध मानलें जाई तेव्हां समाजांतून ह्या रोगाचें मूळ नाहींसें करण्यासाठीं मीं लेख लिहिले, भाषणें केलीं नि त्या चळवळींत हिरीरीनें पडलें. हें मी सारें आपण होऊन केलें, कारण बाईच्या अधू दृष्टीमुळें त्यांना होणाऱ्या यातनांचें मला दुःख होत होतें. पण ह्या कामाबद्दल माझ्या एका निकटच्या मैत्रिणीनें नापसंती दाखवून मला विचारलें, " तूं ह्या भानगडींत कां पडतेस ? निष्काळजीपणानें अर्भकांची दृष्टि दुखावणें हा मानवी स्वभावच आहे नि माणसाचा स्वभाव आपण बदलूं शकत नाहीं." मीं ह्या मैत्रिणीशीं तासन् तास वाद घातला, पण तिला माझें म्हणणें कधीं पटलें नाहीं. ह्या घटनेनंतर कितीतरी काळ गेला आहे नि आज असा विचार लोक बोलून तरी कसा दाखवतात त्याचें आपल्याला आश्चर्य वाटतें. टाळतां येईल त्या सर्व प्रकारचें अंधत्व टाळावें ह्या निर्धारानें आतां दरवर्षी जागतिक परिषदा भरत आहेत.

मला अजूनहि हंसूं येतें तें अंध, मुके आणि बहिरे ह्यांना कसलेंहि ज्ञान असणें शक्य नाहीं ह्या समाजाच्या गैरसमजुतीबद्दल. त्यामुळेंच मला मिळालेल्या 'देवता', 'परी', 'अंधारांतून प्रकाशाचा मार्ग दाखविणारी देवता' इत्यादि विशेषणांचा फोलपणा माझ्या लक्षांत आला.

मॅसॅश्युएट राज्याच्या अंधांच्यासाठीं नेमलेल्या समितीवर माझी सभासद म्हणून नेमणूक झाल्याचें मीं पूर्वीं लिहिलेंच आहे. अंधांना शिकवून स्वावलंबी करण्याच्या योजनेआड येणाऱ्या समाजाच्या कांहीं गैरसमजुती दूर करण्यासाठीं सरकारला त्यावेळीं बरेच प्रयास पडले. बाई पर्किन्स संस्थेंत शिकल्या होत्या ह्याची मला आठवण होती. संस्थेचे पहिले डायरेक्टर डॉ. हो ( Howe ) ह्यांनीं राज्यांतल्या सर्व अंधांना काम देतां यावें अशी योजना आंखून संस्थेची स्थापना केली होती. पण जितकें काम व्हावयास हवें होतें तितकें झालेलें नव्हतें. तें जितकें करतां येईल तितकें करावें म्हणून मी व बाई धडपडत होतों. पण ह्या कामांत मला एक अकल्पित धक्का बसला.

त्याचें असें झालें कीं, 'स्प्रिंगफील्ड रिपब्लिकन' पत्राचे संपादक मि. एफ. बी. सॅनबर्न ह्यांची माझी ओळख होती. ट्यूक्सबरीच्या ज्या भिक्षागृहांत बाई लहानपणीं होत्या त्या भिक्षागृहाच्या नियामक मंडळाचे हे गृहस्थ सभासद होते व त्यांच्याचतर्फे बाई पर्किन्स संस्थेंत आल्या होत्या. बाईनीं ज्या चिकाटीनें आपलें शिक्षण पुरें केलें आणि जें काम त्या करीत होत्या त्यामुळें बाई ट्यूक्सबरीबाबत जी मुग्धता राखीत ती मि. सॅनबर्नना समजावी अशी माझी अपेक्षा होती. पण माझी निराशा झाली. माझें मॅसॅच्युएट्स् विधिमंडळापुढील प्रौढ अंधांच्या प्रश्नावरील भाषण झाल्यावर मला माझ्या मित्रांनीं सांगितलें कीं, मि. सॅनबर्न ह्यांनीं बाईंचा अपमान केला. ज्या गरिबींत बाई जन्माला आल्या त्या गरिबीचा उल्लेख करून ते बाईंना म्हणाले कीं, वास्तविक सरकारनेंच त्यांची जबाबदारी घ्यायची असतांना भिक्षाघरानें त्यांना विद्यार्थिनी म्हणून घेतलें, ह्याबद्दल बाईंना साधी कृतज्ञताहि वाटत नाहीं. ह्याबद्दल बाई मला कांहींच म्हणाल्या नाहींत. पण मला हे कळल्यावर मी माझा राग मि. सॅनबर्न ह्यांना एक खरमरीत पत्र लिहून स्पष्ट केला. त्यांच्या ह्या हीन वृत्तीबद्दल आजपर्यंत मीं त्यांना कधीं क्षमा केली नाहीं. त्यांच्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, इतरांचेबरोबर आम्ही कसेंहि चिडून वागलों तरी आम्ही सर्व एका स्नेहबंधनानें एकत्र बांधले गेलों आहोंत नि आम्ही एकमेकांसाठीं नि एकमेकांच्या मदतीवरच जगत असतों. मनुष्याचा अपमान करणाऱ्या अशा वागणुकीनें आमच्यांतलें जें चांगलें असेल त्याचीहि वाढ खुंटते. ही एक अतिशय कडू गोळी मला गिळावी लागली.

मनुष्य-स्वभाव असें क्रूर आणि कुरूप स्वरूप दाखवूं शकतो! ह्या गोष्टीचा परिणाम १९१४ ते १६ सालीं आम्ही जो व्याख्यानांचा दौरा काढला त्यावेळीं माझ्यावर तेवढा झाला नसावा. सर्व ठिकाणीं आमचे श्रोते माझें भाषण, माझे शब्दोच्चार धड नसतांहि अतिशय शांतपणें आणि सहानुभूतीनें ऐकत असत. मला मात्र मनांतून असें वाटत असे कीं बाईंची कदर जेवढी केली जावी तेवढी केली जात नाहीं. बाईंचें वक्तृत्व उपजतच चांगलें असल्यानें त्यांचें व्याख्यान हा मुख्य कार्यक्रम असे आणि त्यांचें

कर्तृत्व नि तेज झांकून ठेवूनहि नाहींसें होत नाहीं ह्याची जाणीव होऊन मला बरें वाटे. श्रोत्यांचीं मतें ऐकल्यावर मला हें स्पष्ट कळलें कीं इतर विषयावर मी कांहींहि बोललें तरी श्रोत्यांना माझ्या मतांची विशेष पर्वा नव्हती; त्यांना माझ्या तोंडून फक्त अंधांचेबद्दलच ऐकायचें होतें. बाईंचें भाषण मात्र श्रोते मन लावून ऐकत, म्हणून मला बरें वाटे. त्यांची जरी खूप स्तुति होत असली तरी त्यांच्या कल्पना कुणाला फारशा पटत नाहींत हें स्पष्ट दिसत होतें. सोशालिस्ट व उदारमतवादी लोकांत आम्हांला खूप मोकळें वाटत असे. पण त्यांच्यांतहि बाईंचें व्हावें तेवढें कौतुक होत नाहीं असें मला वाटे. अर्थात् शिक्षण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र अशा विषयांवरील मतांचा प्रसार व्हावयास वर्षानुवर्षें लागतात हें कित्येक वर्षांनीं माझ्या लक्षांत आलें.

ह्या विषयावरील मतें माणसाच्या मनांत वटवृक्षाच्या मुळासारखीं हळुहळू शिरतात नि मग त्यांच्या फांद्या हळुहळू विचारांत पसरूं लागतात. बाईंना हें कळलेलें होतें. माझी सामाजिक किंवा इतर विषयांवरील मतें कांहींहि असलीं तरी मला माझें आत्मिक स्वातंत्र्य पूर्णपणें मिळवितां आलें पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. आपलीं मतें दुसऱ्यावर लादून, जें मन वास्तविक विकसित करावयाचें तें स्वतःच्या अहंकारासाठीं दडपून खुरटवून टाकणाऱ्यांपैकीं बाई नव्हत्या.

बाईंची आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीनें मी जेव्हां पाहूं लागलें तेव्हां सर्वच परिस्थिति प्रतिकूल आहे असें मला वाटलें. हॉलिवुडमध्यें खूप पैसे मिळतील म्हणून खेळलेल्या जुगारांत आम्ही हरलों. त्यानंतर आम्ही करमणुकीच्या कार्यक्रमाकडे वळलों. माझा आवाज ह्या कार्यक्रमासाठीं फार महत्त्वाचा होता पण तो पुरेसा सुधारला नाहीं. प्रेक्षकांनीं माझा तो दोष सहन करायचें कांहींच कारण नव्हतें. जर पूर्वींप्रमाणें आम्ही येथेंहि हरलों तर त्यामुळें होणाऱ्या टीकेचे चावे व बोचकारे माझ्यापेक्षां बाईंना अधिक सहन करावे लागतील हें माझ्या लक्षांत आलें. पण परिस्थिति आम्हांला अनुकूल होती. श्रोत्यांतले नेहमीं गडबड करणारे गुंडहि आमचा कार्यक्रम

सहानुभूतीनें पाहात. टाळतां येतील अशा मानवी आपत्ति दूर करण्याइतकें बुद्धिसामर्थ्य व सद्भावना मनुष्यांत आहेत ह्याची जाणीव माणसानें ठेवली तर जगांत पुष्कळ सुंदर बदल घडून येतील हा माझा उपदेशहि श्रोते शांतपणें ऐकून घेत. कांहीं फार ‘ नाजुक मनांना ’ आम्ही असा कार्यक्रम करतों म्हणून धक्का बसला; पण आपली भाकरी आपण कमावीत आहोंत ह्याचें मला समाधान वाटे. आमचे व्यवस्थापक मि. हॅरी वेबर ह्यांनीं आमचा मार्ग फारच सुकर केला व लहानपणापासून बाईंचेसाठीं आपण कांहीं तरतूद करावी ही उराशीं बाळगलेली माझी आशा सफल होऊं लागली. मीं कांहीं रक्कम शिल्लक टाकली. आमच्या टीकाकारांना मि. वेबर जीं योग्य उत्तरें देत त्याबद्दल मी त्यांची कृतज्ञ आहें. जेव्हां टीकाकार मला हा करमणुकीचा कार्यक्रम सोडून सभागृहें आणि चर्चमधून व्याख्यानें देण्याचा उपदेश करीत पण आमचा आर्थिक प्रश्न सोडविण्याचे कामीं कसलीहि मदत करीत नसत तेव्हां मि. वेबर त्यांना विचारीत, “ मी त्यांना जेवढी रक्कम देतों तेवढी तुम्ही द्याल का ? ” मला उपदेश करणारे पुन्हा आपलें तोंड दाखवून ह्या प्रश्नाचें उत्तर कधीं देत नसत.

आमच्या कार्यक्रमांत बरेंच संगीत ठेवण्यांत आल्यानें आमचें काम जरी दीड तास व्हावयास हवें होतें तरी प्रत्यक्ष फक्त वीसच मिनिटें होई. शिवाय एका जागीं एक आठवडाभर आम्हांला राहायला मिळे. व्याख्यान-दौऱ्यांत आम्हांला आमंत्रण देणाऱ्यांनीं सद्भावनेनें दिलेला पण आम्हांला कंटाळवाणा होणारा पाहुणचार स्वीकारायची जी सक्ति आमच्यावर होती, तीहि आतां नव्हती.

बाईंना मात्र हीं दोन वर्षें फार कष्टाचीं गेलीं. बाईंचा आवाज फार गोड आहे असें अनेक स्नेह्यांनीं मला सांगितलें, पण व्याख्यानें देणें बाईंना कधींच आवडत नसे. स्टेजवर त्यांनीं पाऊल ठेवलें कीं तिथल्या दिव्यांच्या तेजस्वी प्रकाशानें त्यांचे डोळे खूप दुखूं लागत व त्यांना त्या असह्य वेदना सहन कराव्या लागत. एकाच ठिकाणीं अडकून राहावें लागल्यानें त्या बेचैन होत. सर्वसाधारण माणसाला किती साध्या आणि हीन गोष्टींनींहि आनंद

होतो तें पाहून त्यांच्या मनाला धक्का बसला. त्यांचें मन बाटलींत भरून ठेवलेल्या माशासारखें निराशेनें तडफडत गोल गोल घिरट्या मारीत होतें. त्या वेदनांनीं भरलेल्या त्यांच्या हृदयांतून—

पडती अग्नीचे कण, त्या न विझवी अश्रूंचें सिंचन।

प्रत्येक धंद्यांत, कलाक्षेत्रांत आढळून येणाऱ्या भांडणांचा त्यांना मनापासून तिटकारा असे. आपल्या तत्त्वावर अर्धवट विश्वास ठेवणारे लोक भेटले कीं बाई संतापत. त्या म्हणत, "कांहींहि झालें तरी चालेल, पण काम करीत राहा आणि अपयश पदरांत घेत राहा. अपयश येईल तेव्हां तेंच काम पुन्हा पहिल्यापासून करा. तुमचें सामर्थ्य वाढत जाईल नि तुमचा हेतु एक दिवस साध्य होईल. कदाचित् तुम्हीं ज्यासाठीं प्रयत्न सुरू केले तेंच उद्दिष्ट मिळायचें नाहीं; पण जें मिळेल त्याच्या आठवणीनें तुम्हांला नक्की आनंद होईल." स्वतः बाईनीं यश मिळविण्यापूर्वीं किती वेळां प्रयत्न केले, किती वेळा अपयश पदरीं घेतलें ह्याची मोजदाद तरी कोण करूं शकेल!

ज्या वयांत विश्रांति मिळावयास हवी त्या वयांत बाईंना करमणुकीचे कार्यक्रम करीत हिंडावें लागलें ह्याचें मला दुःखहि होतें व त्यांच्याबद्दल कौतुकहि वाटतें. त्यांची प्रकृति फारच ढांसळली होती. चालतांना जर पॉली त्यांच्याबरोबर नसली तर त्या अडखळत. त्यांना सारखें पडसें येई. ज्या ज्या शहरांत आम्ही गेलों व ज्या ज्या नेत्रवैद्यांना आम्ही बाईंचे डोळे दाखविले त्या त्या सर्वांनीं एकच मत दिलें—'बाईनीं डोळ्यांना विश्रांति दिली पाहिजे नाहींतर त्यांची दृष्टि कायमची जाईल.' डॉक्टरांचें म्हणणें बाईनीं कधींच ऐकलें नाहीं. त्या काम करीतच राहिल्या. १९२१ मध्यें आम्हीं टोरोंटोला पोंचलों. एका रात्रीं त्यांना एन्फ्ल्युएन्झाचा अतिशय त्रास झाल्यानें त्यांनीं अंथरूण धरलें. इतकी बिकट अडचण येईल अशी पॉलीला कल्पनाहि नव्हती. पण धीर करून कार्यक्रमाचे वेळीं बाईंचे जागीं ती काम करूं लागली. बाई थोड्या बऱ्या झाल्यावर पुन्हा काम करूं लागल्या, पण १९२२ च्या सुरुवातीला खोकल्याचा अतिशय त्रास होऊन त्यांचा आवाज इतका बसला कीं त्या बोललेलें कोणाला ऐकायला जाणें शक्य नव्हतें.

बाईंनीं पॉलीला आपलें काम शिकविलें होतें. तिनें तें चांगलें आत्मसात केलें आणि ती माझ्याबरोबर स्टेजवर काम करूं लागली. बाईंच्यावर मी सर्वस्वी अवलंबून आहें हें त्यांच्या लक्षांत येतांच माझें परावलंबित्व कमी करण्याच्या हेतूनें त्या स्वतः दूर झाल्या. त्यांनीं ह्या कामासाठीं पॉलीला तयार करून मला माझ्या पायावर उभें राहावयास लाविलें. माझ्यावर असलेल्या त्यांच्या प्रेमाचा ह्याहून अधिक मोठा पुरावा असणें शक्य नाहीं. सुरुवातीला मी भांबावून जाई. माझी स्फूर्तिदेवताच नाहींशी झाली होती. पण निधडेपणानें बाईंनीं माझ्यासाठीं जो त्याग केला त्याबद्दल शोक व्यक्त करण्याचें धैर्य माझ्यांत नव्हतें.

## १३

करमणुकीचे कार्यक्रम बंद करून आम्ही उदास मनःस्थितींतच फॉरेस्ट हिलच्या घरीं परत आलों. आपली सांपत्तिक स्थिति सुधारली ह्याबद्दल त्यांनीं माझें कौतुक केलें. पण मी ह्या कौतुकानें फसलें नाहीं. त्यांच्या जीवनांतला आनंद नष्ट झाला होता हें अगदीं स्पष्ट होतें. चालण्याचें, घोड्यावर बसण्याचें नि वाचनाचें आपलें स्वातंत्र्य नष्ट झाल्याची जाणीव झाल्यामुळें त्यांची विलक्षण तडफड चालली होती. आपण नव्या घरांत आलों ह्याऐवजीं आपली शक्ति क्षीण होत असल्याची जाणीव त्यांना झाली. त्यांनीं अगदीं धीर सोडला असें मला म्हणायचें नाहीं. आमच्या घरीं कोणीहि आले तरी त्या त्यांचेशीं आनंदानें बोलत असत. दुःखी राहणें हें हुशारीचें किंवा शहाणपणाचें आहे असें म्हणणारावर त्या तुटून पडत. जे आयुष्याकडे पाहतांना फक्त दुःखें पाहून निराश होत त्यांच्या वृत्तीचा कमकुवतपणा त्यांना सहन होत नसे. असें असलें तरी आज ना उद्यां आपली दृष्टि कायमची जाणार ही कल्पना स्वीकारायला त्यांचें मन तयार होत नव्हतें. सोळा वर्षें पर्किन्स संस्थेचे प्रमुख म्हणून काम केल्यावर डॉ० हॉव् ह्यांनीं

काढलेल्या उद्‌गारावर बाईंचा विश्वास होता. डॉक्टर म्हणाले होते, " दृष्टीशिवाय व्यक्तिमत्वाची वाढ मोकळेपणानें आणि पूर्णपणें होऊं शकते असें म्हणणें म्हणजे देवानें दृष्टीची देणगी माणसाला विनाकारण दिली असें म्हणण्यासारखें आहे. "

दृष्टिहीनांतहि कांहीं अधिक गुण असतात हें बाईंना नाकबूल नव्हतें. मिल्टननें स्वतःच्या अंधत्वावर रचलेल्या त्या जगप्रसिद्ध काव्यपंक्ति त्यांना आठवत—" They also serve who only stand and wait, " पण त्यांच्या मतें असें मिळणारें सर्व कांहीं एकत्र केलें तरी अंधाला निबिड अंधःकारानें भरलेलें जीवन जगण्याच्या ज्या यातना सहन कराव्या लागतात त्याची भरपाई होऊं शकत नाहीं. त्यांचें मन फार संवेदनाक्षम होतें. आपल्या हातून एकादी भयंकर चूक झाल्यावर किंवा आपला एकादा अवयव वाकडा तिकडा झाल्यावर जशी आपल्याला लाज वाटते तसें अंधत्व अशा व्यक्तींना लाजिरवाणें वाटतें. इतरांच्या सहानुभूतीकडे अशा व्यक्ति लक्ष देत नाहींत. विशेषतः अशा व्यक्ति जर स्वतंत्र वृत्तीच्या नि धडपड्या स्वभावाच्या असल्या तर अंधत्व हा आपल्या स्वातंत्र्यावर आणि प्रतिष्ठेवर पडलेला घाला आहे असेंच त्यांना वाटतें.

अंधत्वांत राहण्यासाठीं जरूर ती तयारी जर बाईंच्या लहानपणींच करून घेतली असती तर आपलें स्वातंत्र्य अधिक काळपर्यंत टिकविण्याचे मार्ग त्यांनीं शोधून काढले असते. तरीहि त्यांच्या हृदयांत लपलेल्या अनेक तीव्र निराशांची जाणीव फक्त त्यांच्या निकटवर्तीयांनाच होती. त्यांना पुस्तकें वाचून दाखविलीं तरी आपल्याला हवे असलेले उतारे शोधून काढणें अशक्य होईल ही कल्पनाहि त्यांना सहन होत नसे. त्यांची काळजी घेणारावर त्यांचा सर्व भार पडणार ह्यांची त्यांना फार भीति वाटे. अंधत्व एकदां त्यांनीं भोगलेलें असल्यानें त्यांना पुन्हा त्या काळोखांत जाण्याची कल्पना सहजासहजीं करवत नसे.

पण एक दोन दिवसांतच बाई आपल्या डोक्यांतून असे विचार काढून टाकीत नि एकादें चांगलें काम किंवा आनंदी होण्याचा मार्ग शोधीत.

" जीवन निरर्थक आहे असं मी म्हणालें म्हणून काय झालें ? " त्या विचारीत, " मी सरड्यासारखे रंग बदलतें हें तुम्हांला माहीत आहे. आपण एकमेकींचा भार सहन करूं या. जशी सत्यस्थिति आहे तसें आपण जगूं. दुसऱ्यांचे उपयोगी पडूं. आपल्या ज्या कांहीं संवेदना शाबूत असतील त्यांचें आपण सुखांत रूपांतर करूं. असें केलें म्हणजे परिस्थितीपासून आपल्याला आपलें रक्षण करावयाचें आहे ह्याची जाणीव आपल्यांतून कमी होईल व आपल्याभोंवतीं आनंदाचा प्रकाश आपल्याला पसरावयाचा आहे ह्याची जाणीव आपल्यांत अधिक वाढेल. मग कदाचित् मीहि माझ्या अनुभवांचा सदुपयोग करीन आणि आपल्या आयुष्याचे दिवस सुख-दुःखांच्या धाग्यांनीं विणायचें शहाणपण मला समजूं लागेल."

बाईच्या लहरी कितीहि विचित्र वाटल्या तरी त्यांच्या अंतःकरणांतील चांगुलपणा स्पष्ट व्हावा म्हणून त्यांनीं मला जें सांगावयाचा प्रयत्न केला तें मी इथें देतें. त्या म्हणाल्या, " स्नेहभावामुळें आपल्या निर्णयांतील कठोरता कमी होते. एकाकी राहिली तर मनुष्याची बुद्धि कठोर होते व मानवी दोषांबद्दल संताप वाढूं लागतो. स्नेहभावानें भरलेलें मन मनुष्याचा लहरीपणा आणि त्याची अपूर्णता हीं दोन्ही सहानुभूतीनें स्वीकारतें. जें अयोग्य त्याची नावड दूर करून मनुष्यांतल्या सुप्त मूल्यांना विकसित होण्यासाठीं मोकळें करतें आणि त्यांना उत्तेजन देतें." करमणुकीचे कार्यक्रम करतांना बाई ज्या मनोवृत्तीनें वागत असत त्याची कल्पना ह्या शब्दांवरून येते.

'फॉरेस्ट हिल्स'च्या घरीं परत आल्यावर बाईनीं आपला सर्व दिवस उद्योगांत घालविण्यासाठीं निरनिराळे मार्ग शोधून काढले. स्वयंपाकपाणी, हिशेब, येणाऱ्या जाणाऱ्यांची बडदास्त ठेवणें हीं सर्व कामें पॉली करीत असे. बाई माझ्या आवाजाच्या तालमी घेत. माझ्या आवाजांतील 'तोच-तो 'पणा आणि उच्चारांतील चढ-उताराचा अभाव हे माझे दोन मोठे दोष घालविण्यासाठीं हवी असणारी चिकाटी आणि निश्चय बाईच्याखेरीज इतर कोणांतहि असणें शक्य नव्हतें. त्या मला एखादी लहानशी कविता किंवा गद्य वाचून दाखवीत. ( त्यांच्या ओठांच्या हालचालीवरून तें समजावून

घेण्यासाठीं त्यांच्या तोंडावर हात ठेवून ठेवून माझा हात दुखून जाई. ) मग मी त्यांच्या हालचालीवरून लक्षांत आलेले आवाज काढण्याचा प्रयत्न करीत त्यांनीं वाचून दाखविलेले शब्द पुन्हा पुन्हा म्हणत राही. माझ्या बोलण्यांत मीं कधीं विनोद केला किंवा विशेष औत्सुक्य दाखविलें कीं त्यांना आनंद होई. परंतु आवाजांतले कंप मला उच्चारतांच येत नसत. त्यांना काय हवंय् तें स्पष्ट करण्यासाठीं ओढ्याचा झुळझुळ आवाज, पक्ष्याची लकेर किंवा तंतुवाद्यांतून निघणारें संगीत अशा उपमा देऊन त्या मला समजावून सांगायचा प्रयत्न करीत. पुष्कळदां माझ्या गळ्यांत सुंदर शब्द तयार झाल्याचा भास मला होई व त्यांचा उच्चार करण्यांत आपण यशस्वी होऊं असं वाटे. मी बोलल्यानंतर बाई मला सांगत कीं माझा आवाज गोड होता, पण शब्द स्पष्ट नव्हते. आम्ही माडीवर जेथें झोपत असूं तेथें सकाळ, दुपार संध्याकाळ आवाजाच्या तालमी करण्यासाठीं त्या मला सांगत. मला तें मनापासून करावयाचें होतें, पण शक्य मात्र होत नसे. स्वतःशींच मोठ्यानें वाचण्यास, गाणें म्हणण्यास रेंथमला जेवढा वेळ मला मिळत असे तेवढा इथें मिळेनासा झाला. आम्हीं इतर कामें नि व्याख्यानें टाळून रेंथमलाच राहिलों असतों तर माझें बोलणें अधिक सुधारलें असतें असें मला वाटतें.

'फॉरेस्ट हिल्स'ला स्थायिक झाल्यावर इतरांच्यासारखं आपल्याला बोलतां येणार नाहीं ह्या जाणिवेनें वाटणाऱ्या निराशेमुळें बोलणें शिकण्याचा माझा उत्साह कमी झाला. बोलतां यावें असें वाटत असलें तरी तें सुख आपल्या आंवाक्याबाहेर आहे असें वाटूं लागलें. बाईंच्या समाधानासाठीं मीं स्वतःला कोंडून घेतलें असतें आणि थकून जाईपर्यंत बोलण्याच्या तालमी केल्या असत्या. पण इतर कामें करणें भाग होतें. हजारों पत्रांचे ढीग अजून पडले होते व तीं बहुतेक सर्व पत्रें नेहमींच्या लिपींत लिहिलेलीं किंवा टाइप केलेलीं असत. पॉलीला घरकाम असल्यानें पत्रव्यवहाराकडे बघावयास वेळ नव्हता; तरी शक्य तेव्हां दोनचार ओळींचीं उत्तरें ती लिहून टाकी. त्या पत्रांच्या ढिगाऱ्यांतून आपल्या दुखऱ्या डोळ्यांना शीण देऊन महत्त्वाचीं पत्रें बाई निवडून काढून मला देत असत. अशा सर्व कामांत तासामागें तास जात व माझें बोलणें शिकण्याचें सर्वांत महत्त्वाचें काम तसेंच राही.

पण जन्मभर निराशेचें दुःख उगाळीत मला बसूं देण्यास बाई तयार नव्हत्या. त्यांनीं १९२४ च्या उन्हाळ्यांत न्यू इंग्लंडमध्यें जाण्याची एक अभिनव प्रवासयोजना काढली. पॉली रजा घेऊन स्कॉटलंडमध्यें गेली होती. हॅरी लॅंब आमच्याबरोबर आला. आमच्या मोटरींत आम्हीं एक नव्या पद्धतीचा तंबू घेतला होता. गाद्या, स्टोव्ह, बर्फाची पेटी आणि आमची लाडकी कुत्री, ह्यांना घेऊन आमची मोटर जेव्हां हिरव्यागार प्रदेशांतून धावूं लागली तेव्हां आतांपर्यंत लोपलेला बाईंचा आनंद पुन्हा ओसंडून वाहूं लागला. संध्याकाळचें चवदार जेवण संपवून आम्ही जेव्हां आमच्या तंबूंत लोळत पडलों होतों तेव्हां बाई म्हणाल्या, " ही शुद्ध हवा उपभोगणं हेंच एक मोठं सुख आहे. ती इतकी शुद्ध आहे कीं ईश्वर स्वतःच्या ओंजळींतूनच ती ओतीत असला पाहिजे."

आम्ही खूप हिंडलों. केनबेक नदीच्या पाण्यांत आंघोळी केल्या. ' मूजहेड ' तळ्यावर गेलों. नंतर मॉंट्रिअल आणि क्रेबेककडे वळलों. 'फॉरेस्ट हिल' वरील घरच्या सर्व काळज्या दूर सारून बाहेर पडायला मिळालं म्हणून बाई फार आनंदांत होत्या. बरोबरीच्या नात्यानें वागून हंसून खेळून लुटलेल्या त्या प्रवसांतील आनंदाची स्मृति जन्मभर माझ्या मनांत राहील.

आमचीं पुढील वर्षें मात्र खूप कष्टांत गेलीं. त्यामुळें हा लुटलेला आनंद आमच्या स्मृतींत जास्तीच राहिला. १९२१ सालीं ' अमेरिकन फाउंडेशन फॉर द ब्लाइंड 'ची स्थापना झाली. अंधांच्यासाठीं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना जरूर ती सर्व माहिती पुरविण्याचें काम ही संघटना करीत असे. फाउंडेशननें आम्हांला जेव्हां काम करण्यासाठीं पहिल्यानें बोलाविलें तेव्हां आम्ही आमचे करमणुकीचे कार्यक्रम करीत होतों. १९२३ सालीं न्यूयॉर्कच्या भोंवतीं असलेल्या गांवीं आम्ही पुन्हा व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. अंधांच्या शिक्षणाचा नि कामधंद्याचा प्रश्न सोडविणें मला जितकें सोपें वाटत होतें तितकें अनुभवानें बाईंना वाटत नव्हतें. कारण तसा मोठ्या प्रमाणावर संघटित प्रयत्न होत नव्हता. फाउंडेशनचें काम आमच्याहि दृष्टीनें नवें होतें. त्या कामांत आम्हाला नवे नवे अनुभव मिळाले.

निरनिराळ्या अडचणींना तोंड देतांना मनुष्याला आपल्या सर्व वृत्ति व शक्ति एकत्रित करून त्यांना परिस्थित्यनुरूप नवें वळण द्यावें लागतें. जन्मभर बाई हें करीत आल्या पण फाउंडेशनच्या कामांत बाईंना हा अनुभव विशेष आला.

स्वतःच्या इच्छेप्रमाणें काम करण्याची संधि बाईंना मिळाली असती तर त्या फक्त अंधांच्यासाठींच जन्मभर काम करीत राहिल्या नसत्या. आपला उपयोग होतो आहे असें पाहून त्या माझ्या कामांत मनापासून मदत करूं लागल्या. मीहि केवळ स्वतः अंध आहें म्हणून ह्या कार्यांत पडलें नाहीं, तर मानवी दुःखें दूर करण्याचें तें एक कार्य आहे म्हणून. अंधांना मनःचक्षू असतात नि त्या डोळ्यांनीं त्यांना दिसतें. तसेंच मलाहि दिसत होतें. ह्या जगांत इतर माणसें जशीं जन्माला येतात, तसेच अंधहि जन्माला येतात नि आपल्या मानवबंधूंची दुःखें दूर करण्यासाठीं आपली शक्ति खर्च करतात. माझ्या स्वभावाची घडण अशी आहे कीं, अंधांचेऐवजीं इतर अपंगांचेसाठीं जरी मला काम करायला सांगितलें असतें तरी तें मीं तितक्याच उत्साहानें केलें असतें.

फाउंडेशनमध्यें काम करायला लागल्यावर पहिल्या वर्षींच बाईंच्या व्यक्तिमत्वाचा नवा पैलू माझ्या लक्षांत आला. कामाबाबत फाउंडेशनचे कार्यकर्ते बाईंचा नेहमीं सल्ला घेत व बाईंच्या मतांची छाप फाउंडेशन ठरवीत असलेल्या धोरणावर स्पष्ट दिसत असे. मॅसॅच्युएटचा एक कार्यकर्ता बाईंना खूपच मान देत असे. हा गृहस्थ अतिशय उत्साही होता व कामाबद्दलच्या त्याच्या कल्पना अतिशय प्रागतिक होत्या. त्यालाहि असें वाटत असे कीं, अंधांचा प्रश्न सोडवायचा असला तर त्यांना जीवन कळलें पाहिजे. बाईंनाहि असें वाटत असे कीं, अंधांनीं डोळस असणारांची मिळवितां येईल तेवढी माहिती स्पर्शज्ञानानें मिळवावी. मला त्यांनीं त्याच पद्धतीनें शिकविलें होतें.

कींव ! कींव ही अंधांच्या कार्यांतली मोठी धोंड आहे हें बाईंना ठाऊक होतें. दयाबुद्धीनें अंधशाळा निघाल्या, पण त्यांना ' आश्रम ' म्हणत,

शाळा नव्हे. दुसऱ्याचें दुःख पाहून अश्रु ढाळण्यांत बरेंच काव्य असेल, पण शरीराच्या उणीवा भरून काढण्यासाठीं त्या उणीवा असणारांची इच्छाशक्ति अधिक बलवान करण्याचा मार्ग मात्र अश्रु हा नाहीं. ज्याच्या शरीरांत व्यंग असतें, त्या माणसाला आपण सर्वसाधारण माणसासारखें वागवून त्याच्या आयुष्याची घडण त्याची त्याला करूं दिल्याशिवाय त्या व्यंगावर मात करणाऱ्या त्याच्यांतील आंतरिक शक्तींची ओळख त्याला कधींहि होणार नाहीं. ह्याचसाठीं प्रागतिक विचारांचे कार्यकर्ते नेहमीं बाईंचा सल्ला घेत.

शिक्षण ' शिक्षण ' म्हणून द्यायचें असतें, अपंगांनाहि तें भीक म्हणून द्यायचें नसतें ह्यावर बाईंचा दृढ विश्वास होता. मीं इतरत्र सांगितल्याप्रमाणें माझ्यांतील उणीवांची त्यांना कधीं जाणिवच नसे. त्यांच्या दृष्टीनें जीवनाचा शोध घेणारी मी एक शोधक होतें. सर्वसाधारण डोळस मुलांच्या कामांतील सर्वांत चांगल्या कामाच्या बरोबरीनें माझें काम झाल्याशिवाय त्यांनीं माझें कधीं कौतुक केलें नाहीं कीं माझी पाठ थोपटली नाहीं. मी कधीं अडखळलें, पडलें किंवा गुलाबाचीं फुलें काढतांना मला कांटे बोंचून माझे हात रक्ताळले तरी त्यांनीं त्याची विनाकारण काळजी केली नाहीं. कारण अशा अनुभवामुळेंच मी माझी काळजी घ्यावयास शिकेन ह्याची त्यांना खात्री होती. ज्या अंधांना अशी संधि मिळाली त्या अंधांनीं आपलें आयुष्य समृद्ध करून स्वावलंबी जीवनाचें महत्त्व पटवून दिलें आहे.

१९२३ सालीं आमच्यापुढें जे प्रश्न उभे होते त्यांत अंधांचेबद्दल अनेक सद्हेतूंचा माजलेला गोंधळ कसा दूर करावा हा एक प्रश्न होता. अंधांचेसाठीं कागदाचे पृष्ठभागावर उंच दिसणाऱ्या नि त्यामुळें बोटें फिरवून अक्षरें वाचतां येतील अशा पांच लिप्या त्यावेळीं होत्या व त्या पांची लिप्यांचे पाठीराखे आपलीच लिपी सगळ्यांत चांगली आहे हें सिद्ध करण्यासाठीं इतके भांडत होते कीं आम्हांला त्या चर्चेचा कंटाळा येई नि उघड सभेंत हा विषय चर्चेला घेण्याचें धाडसहि आमच्यानें होत नसे.

१९१५ सालीं ' नॅशनल सोसायटी फॉर द प्रिव्हेन्शन ऑफ ब्लाइंडनेस ' ची स्थापना होईपर्यंत अमेरिकेंत अंधांचें कार्य करणारी संघटना नव्हती. त्यापूर्वी कांहीं ठिकाणीं संस्था चालू असल्या तरी त्यांचें काम संघटित रीतीनें चालत नसल्यानें पैसा व श्रम बरेच फुकट जात. संघटित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचें अंधांनींच ओरडून सांगितल्यामुळें अमेरिकन फाउंडेशनची स्थापना झाली. डोळसांचेप्रमाणें कार्यप्रवण आयुष्य जगणें अंधांना शक्य व्हावें हें ध्येय साधण्याचें फाउंडेशन हें एक प्रतीक आहे असें बाईंना वाटे. संधि दिली तर आपण अपंग आहोंत ह्या भावनेऐवजीं आपल्यांत शिक्षण घेण्याची पात्रता आहे नि आपल्याला काम करतां येतें ही जाणीव अपंगांत तयार होते. म्हणूनच बाईंना कार्याचें अतिशय महत्त्व वाटे.

आमच्या कार्यामागील आमचे हेतु जुनेच होते. त्यांत नवीन कांहीं नसलें तरी बाईंनीं अंधांच्या जीवनांतलें नवें युग सुरू केलें असें मला वाटे. भविष्यकालचा लांबच लांब रस्ता चालण्याची शक्ति माझ्यांत येण्यासाठीं ह्या स्फूर्तिदेवतेची मूर्ति सतत माझ्या नजरेसमोर मीं ठेवली पाहिजे. दुबळ्या शरीरांतीलहि स्वत्व जागृत करण्याचें ध्येय त्यांनीं मला स्पष्ट दाखविलें.

फाउंडेशनच्या कामासाठीं आम्ही देशभर फिरलों. प्रत्येक गांवांत आम्ही एकदोन दिवस थांबून, सभा घेऊन त्यांत फाउंडेशनचा हेतु स्पष्ट करीत असूं. गांवचे पाद्री आमच्या संघटनेला आशीर्वाद देत. गांवचे एक दोन प्रमुख नागरिक इतर नागरिकांना उदारपणें आम्हांला मदत करायला सांगत, फाउंडेशनचा कार्यकर्ता राष्ट्रीय कार्यक्रम समजावून सांगे, मग मी बोलत असें. स्वतः आंधळे आहोंत अशी कल्पना करून आंधळ्यांच्या अडचणी समजावून घेण्याची विनंती मी श्रोत्यांना करीं व अंधशिक्षणासाठीं जास्तींत जास्त साहाय्य देण्याची आवश्यकता पटवी. एक अंध कलावंत आमच्याबरोबर प्रवास करीत होता. पैसे गोळा करतांना तो आपलें वाद्य वाजवी. लोकांचें औदार्य पाहून माझें मन भरून येई. क्षणाचाहि विचार न

करतां ते पैसे देत. सर्वांनींच आम्हांला मदत केली. वर्तमानपत्रांनीं आणि नियतकालिकांनीं माझी विनंती चांगल्या रीतीनें प्रसिद्ध केली. प्रसिद्ध-अप्रसिद्ध व्यक्ति, स्त्रिया आणि पुरुष आम्हांला मदत देत. लहान मुलेंहि आपले खाऊचे पैसे आम्हांला देऊन टाकीत. ज्यांचे हृदयांत खरें प्रेम आहे अशा नागरिकांनीं दिलेल्या छोट्या छोट्या देणग्यांतूनच निधीची बहुतेक रक्कम आम्हीं उभी केली. पैसेवाल्या मोठ्या लोकांच्या दारीं जाऊन भीक मागण्याची आम्हांस नेहमींच लाज वाटे. जरी अंधांना दया दाखविण्याची तयारी आम्हांला सर्वत्र आढळली तरी आम्हांला अंधांना स्वत.च्या पायावर उभें राहून काम करण्याची संधि देणारे लोकच हवे होते. अंध कलावंतांना किंवा कुशल कामें करणारांना कामें मिळणें तेव्हां फार जड जात होतें.

बाईंनीं जरी स्वतःला कामांत बुडवून घेतलें आणि वर वर त्या आनंदी दिसल्या तरी त्यांना वेदना होत होत्या हें त्यांचेकडे निरखून पाहणाराला दिसे. डोळे फारच अधू झालेले, अधून मधून होणारा खोकल्या-पडशाचा त्रास होत होताच; त्यांत आणखी एका आजाराची भर पडली. त्यांना कुठल्याहि वस्तूचा वास येईनासा झाला. निरनिराळ्यां सुगंधांनीं बाईंचें मन बहरून जायचें. आतां त्यांच्या जीवनांतला तो आनंदहि नष्ट झाला.

अशा वेळींसुद्धां बाई माझ्या भविष्याचा विचार करीत. माझ्याबरोबर जगण्यासाठीं आवश्यक तें सारें शिकवून त्यांनीं पॉलीला तयार केलें. बाईंच्या शिवाय माझें कसें होईल ह्याची मला धास्ती होती. पण पॉली एकजीव होऊन माझ्याबरोबर काम करील असा बाईंना विश्वास होता. बाई आजारी असतांना पॉलीच माझेबरोबर येई व आम्ही बोलावयास उभ्या राहिलों कीं श्रोते आमचें हार्दिक स्वागत करीत.

# १४

१९२७ सालीं बाई मला म्हणाल्या, " डबलडे प्रकाशकांचा तुला इतका सारखा आग्रह चाललाय्. तूं एक वर्षभर इतर कामें सोडून तुझ्या आत्मकथेंत आजपर्यंतचे प्रसंग लिहून कां काढीत नाहींस ? "

" नाहीं. " मी म्हणालें, " त्याऐवजीं मी तुमचें चारित्र लिहीन. लहानपणापासून मी नोंद ठेवीत आलें. आतां जर तें मला लिहायला मिळालं नाहीं तर माझी भयंकर निराशा होईल."

" हेलेन, " त्या म्हणाल्या, " असं बोलूं नकोस. तूं जें तुझें चरित्र लिहिशील तेंच माझेंहि चरित्र असेल."

कुठल्यातरी आंतरिक आवेशानें मीं चटकन् उत्तरलें, " तें फक्त एकाच दृष्टीनें खरें आहे. तुम्ही माझें जीवन आहांत. मी त्याबद्दल कितीहि आभार मानीत राहिलें तरी तें ऋण संपायचें नाहीं. पण आपल्या दोघींचें व्यक्तिमत्व निरनिराळें आहे नि तुमचें व्यक्तिमत्व हिरावून घेण्याचा मला अधिकार नाहीं." त्या कांहींच बोलल्या नाहींत नि मग आम्हीं तो विषय सोडून दिला.

' माय रिलिजन ' हें माझें पुस्तक लिहून झाल्यावर बाई मला म्हणाल्या, " आपण दोन निरनिराळ्या व्यक्तिमत्वाच्या आहोंत असा तुझा आग्रह आहे ना ? माझें व्यक्तिमत्व मीं तुझ्यासाठीं बाजूला ठेवलें आहे. आतां आपण जागा बदलूं. तूं माझ्या जागीं आहेस अशी कल्पना कर आणि आपण गेल्या वीस वर्षांत एकत्र केलेल्या कामाबद्दल लिहून काढ. आपल्या व्यक्तिमत्वाबद्दल नाहीं– अंधांच्या उन्नतीच्या कार्यांतील साधन म्हणून आपला जेवढा उपयोग झाला तेवढेंच."

त्या असं म्हणाल्या तरी माझ्या ' मिडस्ट्रीम ' पुस्तकांतील ' माय गार्डियन एंजल ' हें प्रकरण लिहितांना त्यांनीं माझ्यावर अयोग्य बंधनें घातलीं. बाईंचा जन्म झाला तेव्हांची त्यांची गरीबी, भिक्षागृह, त्यांच्या

निराशा, त्यांचीं दुःखें ह्यांचा त्यांनीं उल्लेखही करूं दिला नाहीं. मी त्यापुढें त्यांच्याशीं ' मिडस्ट्रीम ' बद्दल कधीं बोललेंच नाहीं.

१९२७ ते १९३० चा काळ अतिशय घाईगर्दींत गेला. बाईंची दृष्टि कायम जाणार हें ठाऊक असल्यानें माझें मन दुःखानें भारावलें होतें. त्यांना चष्म्याशिवाय तर वाचतां येत नसेच पण साधा चष्माही त्यांना उपयोगी नव्हता. न्युयॉर्कचे डॉ. सी. ई. बेरेन्स ह्यांचे उपचार चालू होते. ते मनापासून त्यांचेवर उपचार करीत व संध्याकाळीं त्यांचे डोळे तपासायला येत. डोळ्यांत घालायचें औषध त्यांनीं दिलें व टेलिस्कोपिक डबल कांचा असलेला चष्मा वापरायला सांगितला. त्या चष्म्याचें वजन बरेंच होतें. त्यामुळें आणि त्यांना सतत वाटणाऱ्या अस्वस्थतेमुळें त्यांना फार वेळ वाचतां येत नसे. त्यांच्या डोळ्यांना पांढऱ्या कापडाचाही त्रास होई नि दिवा किंवा मेणबत्ती समोर आली कीं त्यांना तीव्र वेदना होत. पॉली स्कॉटलंडला गेली असतां मीं फार आर्जवें केलीं म्हणून त्यांनीं वाचन बंद केलें; पण त्या कसातरी स्वयंपाक करीत. आमची न्याहारी तयार झाली कीं बाई आमच्या कुत्रीला आमच्या दोघींच्या मध्यें घेऊन बसत. आमच्या अन्नांतला हिस्सा मागणारं किंवा चोरणारं कुत्रं जवळ नसलं तर बाईंना जेवण मुळींच आवडत नसे. ही कुत्री अगदीं लहानपणापासून आमचेजवळ होती व बाईंवर तिचें भारी प्रेम होतें. बाईंचें मन जणूं तिला कळे. जर एकादा रिकामटेकडा गप्पाष्टकी शेजारीं आला तर त्याचा बाईंना कंटाळा येतो हें हिच्या लक्षांत येई आणि त्या माणसाला ती ढकलून द्यायचा प्रयत्न करी. एकदां ती बाईंच्या खांद्यावर पुढील पंजे ठेवून उभी राहिली नि त्यांचे गाल चाटूं लागली. मग तिनें आपला मऊ मऊ कान हळूच बाईंच्या डोळ्यांवरून फिरविला. जणूं बाईंचे डोळे दुखताहेत हें तिला माहीत होतें !

कंटाळा येऊं नये म्हणून बाई निरनिराळ्या पाहुण्यांना बोलावीत नि त्यांचें आदरातिथ्य करीत. आपली काळजी करण्यांत वेळ न घालवतां गरजूंचें कार्य करण्याचा आग्रह त्या मला करीत. बाईंच्या धैर्याचें मला कौतुक वाटे पण मला असेंहि वाटे कीं त्यांनीं जर आपले डोळे फार शिणवले नसते तर त्यांना आणखी कांहीं काळ चांगलें दिसलें असतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ... वि: ९९

डॉ. बेरेन्स डोळ्यांत पाणी आणून त्यांना औषध घालायला आणि डोळ्यांना विश्रांती द्यायला सांगत. पण डॉक्टर, मी किंवा आणखी कोणीहि त्यांना विश्रांति घेण्यास भाग पाडूं शकलों नाहीं. त्यांचें डोकें सतत पुस्तकांत खुपसलेलें असे. वाचन हेंच आतां त्यांचें सर्वस्व झालें होतें. रोजच्या टपालांतलीं महत्त्वाचीं पत्रें त्या मला वाचून दाखवीत नि बाकीचीं गुंडाळून कपाटांत टाकून देत. पॉली परत आल्यावर तिनें सर्व पत्रें शोधून काढलीं. पॉली नसतांना टेलिफोन किंवा दारावरची घंटा जगाच्या अंतापर्यंत वाजत राहिली तरी बाई तिकडे लक्ष देत नसत. मला तर ऐकायलाच येत नसे.

'माय रिलिजन'चा आराखडा तयार झाल्यावर आणि सक्तीनें लादलेली विश्रांती संपल्यावर बाईनीं ते कागद वाचायला घेतले. पण त्यांच्या टेलिस्कोपिक चष्म्यानींहि त्यांना अक्षरें दिसेनात. आमचीं मनें खिन्न झालीं. मृतवत् शांततेनें आमचें घर ग्रासून टाकलें.

आतां वाचणें कायमचें बंद झालें ह्याची खात्री पटल्यावर बाईनीं आपलें मन ताळ्यावर आणलें. पण स्वस्थ राहणें हा त्यांचा स्वभावच नव्हता. कोहासेटजवळील बेटावर एका झोपडींत उन्हाळ्याची सुटी घालवण्याचें आमंत्रण त्यांनीं स्वीकारलें. आमच्याबरोबर नेला कांहीं दिवस आल्या. आनंदांत गेलेले बाईंचे हे शेवटचेच दिवस होते असें म्हटलें पाहिजे. त्या आमचेबरोबर फिरायला येत. आमची कुत्री एक वर्षापूर्वी मेली होती. तिच्या मृत्यूनें बाईंना फार दुःख झालें. पुढें बाईनीं दोन कुत्रीं पाळलीं. आमच्या कुटुंबांत ही नवी भर पडली म्हणायची. माझें 'मिडस्ट्रीम' पुस्तकहि याचवेळीं तयार झालें.

१९२८–२९ सालचे हिंवाळ्यांतले माझे दिवस फार कामांत गेले. निधि जमा करण्याचें माझें काम चालूच होतें. पॉली माझ्याबरोबर असायची. बाई साध्या शब्दांतूनहि नवा अर्थ तयार करीत. शब्दांचा परिणाम श्रोत्यावर कसा होत असेल ह्याचा त्या नेमका अंदाज घेऊन मला नवे नवे वाग्बाण तयार करून देत व मग मी ते माझ्या धनुष्यांतून श्रोत्यांवर सोडीं.

१९२९ च्या उन्हाळ्यांत डॉक्टरांनीं बाईंच्या उजव्या डोळ्यावर शस्त्रक्रिया केली. नंतर मीं आणि पॉलीनें त्यांना लॉंग लेक वरील एका झोपडींत विश्रांतीसाठीं नेलें. ती जागा अतिशय सुंदर होती पण मी फिरायला गेलें किंवा पोहायला गेलें तरी माझेबरोबर येणें बाईंना शक्य नव्हतें. ऊन नसलें कीं आम्ही मोटर बोटींतून तळ्यावर तरंगत फिरत असू. त्यावेळीं तेथलें सौंदर्य वर्णन करून सांगत असतां त्यांचा जुना उत्साह पुन्हा जागृत झाल्यासारखें वाटे.

# १५

१९३० सालीं बाई नि मी परदेशीं गेलों. बाईंच्या डाव्या डोळ्याला विश्रांति मिळणें आवश्यक होतें. पूर्ण विश्रांति द्यायची तर त्यांना परदेशीं नेणेंच योग्य असल्यानें मीं फाऊंडेशनकडून रजा घेतली.

बाईंच्या सर्व लहरी मला माहीत आहेत असें मला वाटत होतें पण स्वतःच्या वागण्याचें स्वतःच निःपक्षपातीपणानें मूल्यमापन करणाऱ्या बाई अनपेक्षितपणें चमत्कारिक वागल्याचें पाहून मला धक्काच बसला.

पहिल्यानें आम्ही फ्रान्सला जावें अशी सूचना करण्यांत आली. ती सूचना ऐकतांच बाई एकदम म्हणाल्या, "छे, छे, कांहीं झालें तरी त्या देशांत मी पाऊल टाकणार नाहीं." "काय?" मीं जोरानें विचारलें, "तुम्हीं स्वत: मला वर्णन करून सांगितलेली पॅरिस, सीन, नॉत्र दाम, व्हर्साय सारखीं ठिकाणें तुम्हाला बघावयाचीं नाहींत?"

"मी जाणार नाहीं." हात हलवून नकार दर्शवीत त्या म्हणाल्या.

आमचे स्नेही त्यांना आग्रह करू लागले. मला वाटतं आम्हीं जरा जास्तच आग्रह केला. त्यांना राग आला नि शिष्टाचाराचीहि पर्वा न करतां त्या वागल्या. त्यांच्या साऱ्या शब्दांचा मारा मीं मुकाट्यानें सहन केला. त्याहि गप बसल्या. मला वाटलें त्या आमचें ऐकणार ! त्यांचें मन

बदलण्यापूर्वीं त्यांना हलविण्याचे विचारानें मीं आणि पॉलीनें तयारी केली व प्रेसिडेंट हार्डिंग बोटीनें निघावयाचें ठरविलें. पण निघण्यापूर्वीं कांहीं तास आमची गफलत आमच्या लक्षांत आली. कितीहि आग्रह केला किंवा जबरदस्ती केली तरी घरून हलायला बाई तयार नव्हत्या. आमचीं तिकिटें आम्हांला रद्द करावीं लागलीं.

मग एखाद्या स्वप्नांतून जाग्या झाल्यासारख्या बाई जाग्या झाल्या. पॉली दुःखी, थकलेली दिसते व तिनें अबोला धरल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. मी एक शब्दही न बोलतां माझ्या कामाकडे वळलें. बाईंना पश्चात्ताप झाला. त्यांनीं विचारलें, "ह्यानंतर आपल्याला केव्हां बोट मिळणार ?"

एक एप्रिलला आम्ही 'प्रेसिडेंट रूझवेल्ट' बोटीनें न्युयॉर्क बंदर सोडलें तेव्हां हवा फार छान होती. कुठें राहायचं तें आम्हीं ठरवलं नव्हतं. पण बाईंना त्याची पर्वा नव्हती. लवकरच वादळानें आमच्या जहाजावर झडप घातली व कित्येक दिवस तें हटेना. आमच्या खोलींतील टेबल-खुर्च्या आमच्या पलंगावर आदळल्या. फळांची एक करंडी पालथी झाली व जमिनीवरून घरंगळत जाणारीं संत्रीं व सफरचंदें पकडण्यासाठीं पॉलीनें झडप घातलीं. "मी घरीं राहिलें असतें तर बरें झालें असतें !" वैतागून बाई म्हणाल्या. पण चांगली झोप मिळाल्यावर आमच्याबरोबर त्या हसूंखेळूं लागल्या.

आमच्या बोटीनें ब्रिटनच्या टोकाला 'लॅन्ड्स एंड' येथें स्पर्श केला. कॉर्नवॉलमधील लूए गांवीं आमचेसाठीं जागा घेऊन ठेवण्यांत आल्याचें प्लायमाऊथ येथें पॉलीच्या बहिणीनें आम्हांला सांगितलें. हवा छान होती. तेथील दृश्य पाहतांच माझें मन आनंदानें नाचूं लागलें. ह्याच कॉर्नवॉलमधून माझे पूर्वज नवें जग शोधण्यासाठीं अमेरिकेंत गेले होते. आजूबाजूला निरनिराळीं फुलें फुललीं होतीं. बाईंचा आनंद त्यांच्या हृदयांत मावेनासा झाला. सबंध मोटर भरून जाईल एवढीं फुलें त्यांनीं विकत घेतलीं. आमच्या रस्त्याच्या बरोबरीनें एक नदी वाहत होती व सर्वत्र व्हायोलेट फुलांचे निळे पुंजके फुललेले होते. अखेरीस, आम्ही डोंगरमाथ्यावर

दा. क्र. ८८०३

असलेल्या बंगल्यावर पोंचलों. बंगल्याभोंवतीं समुद्रपक्षी थव्याथव्यानें उडत व ओरडत होते. त्यांचा घंटानादासारखा आवाज अमेरिकन समुद्रपक्ष्याहून निराळा होता.

ह्या ठिकाणीं आम्ही दोन महिने राहिलों. बाईंची प्रकृति सुधारली आणि त्या आनंदी दिसूं लागल्या. थंडी नसली म्हणजे त्या माझ्याबरोबर डोंगरावरून निघणाऱ्या रस्त्यानें चालत येत व तळाशीं असलेल्या शेतांतील मेंढरांच्या कळपांत जाऊन बसत. कांहीं मेंढ्या माझ्याजवळ येऊन माझ्या कपड्यांचा वास घेत. ह्या कपड्यांची चव कशी असेल ह्यांचीच जणूं त्या परीक्षा घेत. तेथील दृश्यांचीं वर्णनें जेव्हां बाई करूं लागल्या तेव्हां माझें बालपण परत आल्यासारखें मला वाटलें. कित्येकदां आम्ही मेंढरांच्या कळपांतून चालत जात असूं नि मेंढ्यांचीं मऊ मऊ केसाळ शरीरें आम्हांला घासून जाऊं लागलीं कीं आम्हांला गम्मत वाटायची. आम्ही फिरायला जायच्या तो रस्ता त्याच्या दोन्ही बाजूंना फुललेल्या फुलझाडांमुळें सुशोभित दिसायचा. फुलांचा सुवास हवेंत दरवळत असायचा. त्या दृष्टीनें बाईंचा चेहेरा प्रफुल्लित होई. आम्ही मोटरीनें जात असतां तेथील जुन्या राजांच्या कथा ऐकण्यांत बाई गुंग होऊन जात. त्या साऱ्या गोष्टी मग त्या मला सांगत. अमेरिकेंतील इतर अंधांनाहि त्या ऐकायला मिळाव्या म्हणून पुढें मीं त्या टाइप करून अंधांचेसाठीं निघणाऱ्या झिग्लर मासिकाकडे पाठवून दिल्या.

थॉमस हार्डी ज्या खोलींत बसून लिहीत असे ती खोली बघावयास आम्ही गेलों. त्या झोंपडीच्या खिडक्यांतूनहि गुलाबाचीं फुलें ताटव्यावर उभीं राहून डोकावत होतीं. ह्या एकांतांत बसून मानवी दुःखाबद्दल सहानुभूति व्यक्त करणाऱ्या हार्डीचा देह जवळच्याच चर्चमध्यें चिरनिद्रा घेत होता.

त्याच वर्षी जूनमध्यें बाई, पॉली व मी 'बॅली कॉटन' बोटीनें आयर्लंडला गेलों. आयर्लंडमध्यें बाईंच्या कुटुंबीयांचा शोध घेण्याचें आम्हीं ठरवलें होतें. आयर्लंडच्या सौंदर्याची ख्याति मी बरीच ऐकली होती. ह्या भूमीच्या एका कन्येनें माझें जीवन परिपूर्ण केलें होतें. त्या भूमींत पाऊल ठेवतांच माझें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें.

बाईंना आपल्या दारिद्याची आठवण झाली. आयर्लंड दरिद्री होतें. बाईंचें अंतःकरण ब्रिटिशांचे विषयीं वाटणाऱ्या तीव्र तिरस्कारानें भरून गेलें. कांहीं काळापूर्वींच इंग्लंडच्या सौंदर्यानें त्या मोहित झाल्या होत्या. आयर्लंडचें दारिद्य आशियांतील, आफ्रिकेंतील किंवा फिलिपाइन्समधील दारिद्यापेक्षां निराळें नाहीं हें त्यांनाहि कळत होतें व अतिशय स्वच्छ विचार करण्याच्या संवयीनें त्यांच्यांतील प्रादेशिक भावना जाऊन सर्व जगांतील गरजूंच्याबद्दल त्यांना सहानुभूति वाटत होती. इंग्लंडचा राग तरीहि त्यांना आला. त्या म्हणाल्या, " मी अयोग्य वागतें हें का मला कळत नाहीं ? पण ही भावना माझ्यांतून जात नाहीं." आम्ही इंग्लंडला परत आलों तेव्हां मला बरें वाटलें.

'फॉरेस्ट हिल'ला आम्ही परत आल्याबरोबर न्युयॉर्कमध्यें एप्रिल १९३१ ला भरणाऱ्या जागतिक अंध परिषदेसाठीं पैसे उभारायचें काम मला हातीं घ्यावें लागलें.

१९३१ ची आणखी एक आठवण माझ्या हृदयांत कायम ठसलेली आहे. मि. एडवर्ड न्यूटन आणि त्यांचे सहकारी ह्यांनीं केलेल्या आग्रहामुळें टेंपल विद्यापीठानें बाईंना Doctor of Humane Letters ची पदवी दिली. शिक्षणक्षेत्रांत बाईंना योग्य तें स्थान दिल्याबद्दल मि. न्यूटन ह्यांचेबद्दल मला नेहमीच कृतज्ञता वाटते. " बहिऱ्याच नव्हे तर एकंदर मुलांच्या शिक्षण-क्षेत्रांतहि बाई थोर तज्ज्ञ आहेत " असें डॉ. बेल म्हणत. १९१५ सालीं सॅन-फ्रॅन्सिस्को येथें भेटल्या असतां डॉ. मारिया मॉंटेसरी ह्यांनींहि बाईंच्याबद्दल अतिशय गौरवाचे उद्गार काढले होते. बाईंना लिहीलेल्या पत्रांत त्यांच्या कार्याचा मि. न्यूटन ह्यांनीं खूपच गौरव केला. बाईंनीं पहिल्यानें पदवी स्वीकारायचें नाकारलेंच होतें. मी स्वतः मात्र पदवी स्वीकारायचें ठरविलें. पुढें आम्हां दोघींना मोठ्या सन्मानानें 'फेलोज ऑफ द एज्युकेशनल इन्स्टिटयूट, स्कॉटलंड' नेमण्यांत आलें.

त्यावेळीं आपल्या जाहीर भाषणांत बाई म्हणाल्या कीं, " इतर सर्व शिक्षक जें करतात त्यापेक्षां अधिक आपण कांहींच केलें नाहीं." बाईंच्या ह्या थोर निगर्वी हृदयावर मीं प्रेम केलें आणि मला त्या हृदयाच्या शिकवणीमुळेंच उच्च पदावर जातां आलें.

आतां बाईंच्या व माझ्या व्यक्तिमत्वाबद्दल मी स्पष्टपणें लिहिणार आहें.

तसें तौलनिक दृष्टीनें पाहिलें तर अंधांना सर्वसाधारण माणसासारखें जगतां यावें ह्या हेतूनें चालू झालेली चळवळ नवीनच आहे आणि फारच थोड्यांना तिचा अर्थ नीट कळतो. जरी अंधांनीं आजपर्यंत आपल्या बुद्धिचातुर्यानें जगाला थक्क केलें, तरी अंध हे सामान्य माणसापेक्षां निराळे आहेत असाच समज पुरातन काळापासून रूढ आहे. होमर आणि मिल्टन ह्यांनीं अंधत्वाच्या निबिड अंधःकारांत रचलेल्या काव्याचें सर्व जगानें कौतुक केलें. पण ह्या आणि अशा थोर लोकांत असलेले लोकोत्तर गुण हे ते अंध होते म्हणून त्यांच्यांत आले नाहींत.

बहुसंख्य अंध हे इंधनाच्या लांकडासारखे, कोळशासारखे असतात. त्यांना पेटविण्यासाठीं डोळस मनांतून ठिणगी मिळायला हवी, पण पुष्कळदां जे बघूं शकतात त्यांचींच मनें डोळस नसतात. अंध करीत असलेल्या कामांत ते नसलेले गुण असल्याचें सांगतात; पण अंधाजवळ शिल्लक असलेलीं ज्ञानेंद्रियें अंध कशीं वापरतात तें समजावून घेत नाहींत हेंच बहिरे अथवा इतर अपंग ह्यांचे बाबतींतहि खरें आहे.

ह्या अंधःकारांत बाईंनीं प्रकाशझोत टाकला. बाईंनीं मला डोळे आणि कान शाबूत असलेल्या मुलासारखेंच वाढविलें. फरक एवढाच कीं माझ्याशीं शब्द बोलायच्याऐवजीं त्या त्या शब्दांचीं अक्षरें माझ्या हातावर लिहीत. त्यांनीं कोणालाहि माझ्याबद्दल कींव दाखवूं दिली नाहीं. मी जें करी तें नीट केल्याशिवाय कुणालाहि त्यांनीं माझी स्तुति करूं दिली नाहीं. सर्वसामान्य मुलांशीं बोलतात तसें माझ्याशीं बोलायचें टाळून कोणी जर बाईंशीं बोलायला लागलें तर त्या स्पष्ट नापसंती दाखवीत. मला भाषा लवकर यावी म्हणून माझ्या कुटुंबीयांना त्यांनीं मोकळेपणानें माझ्याशीं वाटेल तें बोलण्याचें स्वातंत्र्य दिलें. ह्यासाठीं त्यांना खरोखरीच फार मोठें धैर्य दाखवावें लागलें. कारण त्यांच्या ह्या कृत्यांचा अर्थ कुटुंबियांत फक्त आईला नि काझिन लीलालाच कळला होता.

माझ्या भूमितीच्या बाईंनीं माझ्यावर टीका केली नि फ्रेंचच्या प्रोफेसरांनीं माझ्या चुकीबद्दल माझी हजेरी घेतली तेव्हां मला खरंच बरं वाटलं. बाई

माझ्या यशापयशाबद्दल करीत असलेल्या सूचनांमुळें मला माझा तोल राखतां आला. पुढें ' द वर्ल्ड आय् लिव्ह इन् ' ह्या माझ्या पुस्तकांत मीं प्रकाश, रंग, देखावे, आवाज ह्यांचेबद्दल लिहिलें तेव्हां अशा शब्दांचा अर्थ मला कळणें शक्य नाहीं असें म्हणणाऱ्या टीकाकारांना मी हंसत होतें. माझ्यापासून लपलेलें हें सौंदर्य मला दिसेल अशाच रीतीनें माझ्या आयुष्याची घडी बाईनीं बसविली होती.

मला जें म्हणावयाचें आहे तें हें कीं जी माझी स्तुति झाली आहे ती माझ्या कर्तृत्वामुळें झाली असें मी मानीत नाहीं. लोकोत्तरता माझ्या अंगांत नव्हती. लोकोत्तरता ही अनेक दुःखें सहन करण्यांत असते नि ती पात्रता माझ्यांत नाहीं. तिन्ही बाजूंनीं मी अडलेलीं असल्यानें मी साधें काम करण्यासाठींहि खूप कष्ट केले एवढेंच. मला व बाईनाहि इंग्रजी वाङ्मयाची आवड होती हें माझें नशीब. त्या माझे ' डोळे ' आणि ' कान ' होत्या नि मला त्यांनीं नुसतें लिहायला शिकविलें, एवढेंच नव्हे तर अपंगांना भाषेचा उपयोग होऊं शकेल अशा पद्धतीनें भाषा वापरण्यास लावलें. बाईनीं माझ्यासाठीं उज्ज्वल भविष्य तयार केलें. त्यांचा असा दृढ विश्वास होता कीं प्रत्येक मनुष्यांत असे अनेक गुण असतात. मात्र ते शोधून काढावे लागतात. यश हें सर्वोच्च सुख आहे, पण तीव्र संग्रामानंतरच तें मिळतें.

आपल्या व्यंगांचें बाईनीं भांडवल केलें नाहीं. त्या आपलें आयुष्य स्वतःच्या सामर्थ्यावर जगल्या. माझ्या दुर्बलतेचे लाड करण्यासाठीं त्यांनीं आपलें वागणें बदललें नाहीं तर माझ्यांतील उणीवा भरून काढण्यासाठीं माझ्यांतील आंतरिक शक्ति त्यांनीं जागृत केल्या. ज्याच्यांत अशा शक्ति जागृत करणें शक्य होतें, त्याच्यावर त्यांनीं कोणालाहि ' दये 'चा मारा करूं दिला नाहीं.

ह्या ध्येयापासून आज अंधांचे क्षेत्रांत काम करणारे प्रामाणिक कार्यकर्ते सुद्धां किती तरी दूर आहेत ! बाईच्या ह्या दीर्घ अनुभवाचा नि संपन्न ज्ञानभांडाराचा फारच थोड्या वेळीं उपयोग करून घेण्यांत आला ह्याचें मला वाईट वाटतें. समाधान एवढेंच कीं, आतां अंधांच्या कार्याकडे अधिकाधिक लक्ष सर्वत्र पुरविण्यांत येतें.

# १६

१९३१ मध्यें भरलेल्या पहिल्या जागतिक अंधपरिषदेचें काम केल्यावर बाई अगदीं थकून गेल्या म्हणून उन्हाळ्यांत आम्ही ब्रिटनमधील कॉकार्नु गांवीं गेलों. पण तिथेंहि आम्हांला विश्रांति मिळूं शकली नाहीं. युगोस्लाव्हियांतील अंधांचेसाठीं निधि उभारण्याचें काम करण्यासाठीं त्या देशाचें आम्हांला बोलावणें आलें. अमेरिकेबाहेर असें काम करावयाचा हा पहिलाच प्रसंग होता. बाईंनीं घरीं राहावयाचें साफ नाकारलें. प्रवासाचा बाईंना अतिशय त्रास झाला. त्या म्हणत, "आयरिश लोकांचीं सर्व स्वभाववैचित्र्यें माझ्यांत असलीं तरी देशोदेशीं भटकण्याची त्यांची आवड मात्र माझ्यांत नाहीं."

फ्रेंच भाषेची अडचण त्यांनीं अगदीं निकरावर येऊन पुढें केली होती. पण हीच 'अडचण' आमचें घरकाम करणाऱ्या स्त्रीशीं बोलतांना त्यांना कधीं आडवी आली नाहीं. खाणाखुणा, हातवारे नि निरनिराळे आवाज काढून त्यांनीं त्या इंग्रजीचा एक शब्दहि न येणाऱ्या बाईबरोबर चांगलें जमवलें. ती बाई त्या खेड्याबाहेर पंचवीस मैलहि कधीं गेली नव्हती. पॅरिस बघायला ती अतिशय उत्सुक होती. म्हणून बाईंनीं तिला आमच्याबरोबर पॅरिसला नेलें. तिला बघायला मिळालेल्या दृश्यांनीं ती विस्मयचकित झाली. अशा भोळ्या अंतःकरणाच्या मैत्रिणीला सोडून जातांना आम्हांला अतिशय वाईट वाटलें.

पण इंग्लंड आणि स्कॉटलंडनें आमचा केलेला पाहुणचार अविस्मरणीय होता. १९३२ सालीं ग्लासगो विद्यापीठानें मला दिलेली पदवी घेण्यासाठीं मी स्कॉटलंडला गेलें, तेव्हां आमचेसाठीं डॉ. जेम्स लव्ह ह्यांनीं डालनिन येथें आम्हांला राहायला एक छान झोपडी दिली. गुलाबाच्या ताटव्यांनीं ही झोपडी झाकून गेली होती. खिडकींतून मी ओणवी झालें कीं, कळ्या उमलून फुलें फुलत असल्याची जाणीव मला होई. सकाळीं मी बाहेर पडलें कीं बाई माझ्याबरोबर येत. आतां त्यांना फारच कमी दिसत होतें. त्यांना निसर्गाशीं

हितगुज करीत सबंध उन्हाळा कॉर्नवॉलमध्यें घालवायचा होता. पण ग्लासगो विद्यापीठ मला देत असलेल्या पदवीमुळें त्यांना अतिशय अभिमान वाटला व न कुरकुरतां त्या माझ्याबरोबर आल्या. बाईंच्या मदतीशिवाय अनेक मुलाखती, पत्रें, तारा, छायाचित्रें ह्यांच्या जंजाळांतून मी बाहेर पडूं शकलें नसतें. पदवीदान समारंभाच्या कार्यक्रमाची खरं म्हटलं तर आम्हांला भीतीच वाटत होती. पण डॉ. लव्ह ह्यांनीं फार समजूतदारपणानें आमची व्यवस्था केली. त्यानंतर अनेक आमंत्रणें आम्हीं स्वीकारलीं. अंध आणि बहिरे ह्यांच्या शाळा पाहण्याची मला अतिशय इच्छा होती. आम्हीं एडिंबर्गची बहिऱ्यांची शाळा प्रथम पाहिली. ह्या शाळेची मला विशेष आठवण राहण्याचें कारण म्हणजे तिथल्या डायरेक्टरांनीं बाईंचा केलेला गौरव.

डालवीनहून आम्ही लंडनला गेलों. लंडनला आम्हांला रोज दोन ते पांच समारंभांना जावें लागे. खूप थकलेल्या असतांनाहि माझीं भाषणें श्रोत्यांना ऐकवण्यासाठीं बाई किती श्रम करीत ह्याची मला चांगली आठवण आहे. हे समारंभ अनेक प्रकारचे असत. हाऊस ऑफ कॉमन्समधील खाना, बकिंगहॅम पॅलेसमध्यें झालेला उद्यानोपाहार व त्यावेळीं बाईंची, पॉलीची व माझी पांचवे जॉर्ज बादशहा व राणी मेरी ह्यांचेशीं करून देण्यांत आलेली ओळख, हॅम्टन कोर्ट पाहायला जाणें असे कार्यक्रम होते. 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ब्लाइंड'लाहि आम्हीं भेट दिली व या संस्थेचे प्रमुख मि. इगर ह्यांनीं बाईंच्याबद्दल खूप स्नेहभाव व्यक्त केला. सरेमधील लेदरहेड येथील 'रॉयल स्कूल फॉर द ब्लाइंड'मध्येंहि आम्हीं एक अविस्मरणीय दिवस घालविला. पण सर्व कार्यक्रम संपल्यावर बाईंना खोकल्याचा पुन्हा त्रास होऊं लागला नि पॉली व मीहि फार थकून गेलों. डॉक्टरांच्या सांगण्यावरून बाईंना बरें वाटावें म्हणून आम्ही स्कॉटिश हायलँडला पळ काढला.

आम्ही घाईघाईने डोंगरमाथ्यावरील टेन गांवीं गेलों. तेथें पॉलीचा भाऊ व त्याचें कुटुंब विश्रांतीसाठीं आलें होतें. मोसम चालू असल्यानें आम्हांला राहायला जागा मिळेल कीं नाहीं ह्याबद्दल शंका वाटत होती.

पण अखेरीस डोंगरमाथ्यावर एक घर आम्हांला मिळालें. मन मोहित करून टाकणारे स्कॉटलंडच्या पहाडाचे हिरवे सोनेरी रंग येथून दिसत. त्या निसर्गसौंदर्यानें बाईंना खूपच बरें वाटूं लागलें. अतिशय शांत जागा, पिकलेलीं शेतें आणि फुलांनीं बहरून गेलेल्या रानझाडांची सोबत असें तें मन भारून टाकणारें वातावरण होतें. गुरांचें हंबरणें, मेंढरांचा आवाज किंवा उडणाऱ्या पक्ष्यांच्या पंखांचा फडफडाट हेच काय ते शांततेचा भंग करणारे आवाज. आम्ही त्या वनश्रींतून भटकत असूं. बाईंचा खोकला कमी झाला. पण हिंवाळ्यांतील काम सुरू करावयाचें असल्यानें तें रम्य ठिकाण सोडून आम्ही न्युयॉर्कला परत आलों.

अंधांचें शिक्षणकार्य आतां अमेरिकेबाहेर सुद्धां बरेंच वाढलें आहे ह्याची जाणीव मला होती. म्हणजे आतां 'अमेरिकन फाऊंडेशन फॉर द ब्लाइंड'ला बराच मोठा निधि लागणार होता. ह्यावेळीं निधि जमा करायच्या कामासाठीं मी आणि पॉली दोघीच होतों. भाषणें देण्याबरोबरच वृत्तपत्रांच्या अनेक प्रश्नांना आम्हांला उत्तरें द्यावीं लागत. बहुतेक वार्ताहरांना असें वाटे कीं अंधशिक्षणाचा प्रश्न हा सगळीकडे सारखाच आहे व आम्हांला नक्की काय मदत हवी तें आम्ही सांगावें. अशावेळीं बाईंच्या खुसखुशीत संभाषणांची मला आठवण होई. मी वार्ताहरांना निरनिराळ्या मार्गांनीं हें सांगायचा प्रयत्न करीं कीं सगळे अंध सारखे नसतात. कांहींना थोडें दिसतें म्हणजे त्यांचें शिक्षण पूर्ण अंध असलेल्यांचेपेक्षां निराळ्या पद्धतीनें व्हायला हवें. सर्वच अंधांचे बाबतींत एक मार्ग उपयुक्त ठरण्यासारखा नसतो आणि प्रत्येक व्यक्तीप्रमाणें मार्ग भिन्न असूं शकतात.

फॉरेस्ट हिल्सवरील घरांत बाई एकट्याच होत्या. त्यांची आठवण झाली कीं माझ्या अंतःकरणांत कालवाकालव होई. दोन कुत्र्यांनाहि त्याच सांभाळीत. घरांत नोकरचाकर कोणीच नव्हतें. त्या स्वयंपाक कशा करीत असतील–का उपाशीच राहात असतील अशा शंकांनीं माझा जीव घाबरून जाई. त्यांना कशी मदत करावी ह्याचा विचार करीत मी रात्रीच्या रात्री जागून काढल्या. एकादेवेळीं खूप लांबचा प्रवास केल्यावर मी व पॉली मध्यरात्रीपर्यंत घरीं पोंचत असूं. घरांत पाऊल ठेवतांच आपल्या नजरेला

काय पडणार ह्याच्या कल्पना मनाशीं करून मी घाबरून जाई. आम्ही घरांत पाऊल ठेवलें कीं बाई आमच्या घाबरटपणाला हंसत. त्या जाग्याच असायच्या. पण त्या हंसल्या तरी आम्हांला बरें वाटत नसे. दिवसेंदिवस त्यांची शक्ति क्षीण होत आहे ह्याची जाणीव आम्हाला होती; परंतु त्यांची काळजी घेण्यासाठीं आमचीं कामें सोडूं देण्यास त्या तयार नव्हत्या.

मला एवढंच समाधान होतं कीं स्कॉटलंडच्या सृष्टिसौंदर्यानें बाईंच्या मनांतील सौंदर्यप्रेम एखाद्या पक्षिणीप्रमाणें आपल्या पंखाखालीं उबवून जिवंत केलें होतें. आमचीं कामें शक्यतों लवकर संपवून १९३३ च्या जूनमध्यें मी आणि पॉली साऊथ आर्कनला परत आलों. त्यांची प्रकृति सुधारते आहे असें प्रथम वाटलें. त्यांच्या जीवनांतला तो ग्रीष्महि मला त्या आनंदाच्या भरांत वसंतापेक्षां अधिक सुंदर वाटला.

कॅलेडोनियाच्या सौंदर्यानें पुन्हा बाईंचें अंतःकरण उचंबळून आलें. आम्ही पुन्हा डोंगरमाथ्यावर राहायला गेलों. आतां त्यांना बसतां येत असल्यानें पक्ष्यांचा किलबिलाट ऐकत त्या शांतपणें बसून राहात व दाराशीं जमलेल्या पक्ष्यांना दाणे घालीत. आपल्या मनःचक्षूंपुढें गिरिसौंदर्याचें, त्यांतून खळखळ वाहणाऱ्या निर्झरांचें सौंदर्य उभें करून तें पाहत त्या तल्लिन होत. त्यांची दृष्टी आतां त्यांच्या डोळ्यानें त्यांना हें सौंदर्य दाखवूं शकत नव्हती. अंधत्वानें एक काळा पडदा त्या सौंदर्यावर पसरला होता नि तें त्यांचेपासून झाकून टाकलें होतें. कधीं कधीं त्या गाडींतून लांबवर फिरून येत.

आपल्या भोंवतीं स्नेहाचें, प्रेमाचें वातावरण आहे ह्याची जाणीव झाल्यानेंच बाईंना जीवन अधिक सुंदर वाटलें असावें. गेल्या वर्षी ओळख झालेले पुष्कळ स्नेही बाईंना भेटायला येत. त्यांच्या हृदयांतील स्नेहभाव, प्रेम हा बाईंचा अमोल ठेवा होता. कित्येक वर्षें बाई, ॲन सलिव्हन मेसी, अतिशय अस्वस्थ जीवन जगली होती. तिला तें जीवन जगतांना अतिशय जागरुक, सावध राहावें लागलें होतें. त्याचा तिच्या मनावर पडणारा विलक्षण ताण आतां ढिला झाला होता. ह्या प्रेमाच्या वातावरणांत तिला सावध राहावयाची गरज नव्हती. आयुष्यांत प्रथमच शांत चित्तानें निर्धास्तपणें तिला जगायला मिळालें होतें. हृदयांत तयार झालेल्या ह्या

भावना बाई माझ्याशीं बोलून दाखवीत. त्या म्हणत, अंतर्यामीं होणारे हे *बदल आमच्या बाह्य, दृश्य जीवनांतहि बदल करतात.* जुन्या जखमा भरून *निघतात. हृदयांत* नव्या आशा जन्माला येतात. हृदयांतून निघणारी अंतःचक्षूंची दृष्टि अधिक तेजस्वी होते. बाई पुन्हा आनंदानें हंसूं लागल्या, येणाऱ्यांचा पाहुणचार करूं लागल्या. पॉलीचीं माणसें आमच्याकडे नेहमीं येत असत. डॉ. व मिसेस् लव्ह, मि. ईगर आणि अनेक सुहृद आमच्याकडे कित्येक दिवस येऊन राहिले. भोंवतालच्या गांवीं राहणारे स्नेही सुद्धां बाईंना आनंदी ठेवण्यासाठीं कांहींतरी करीत असत. खरोखर, असें प्रेमरूपी औषध आयुष्यांत क्वचित्च मिळतें.

मी, पॉली व तिचा भाऊ बाईंना घेऊन ऑर्कनीज आणि शेटलंड पाहायला जहाजानें गेलों. त्यामुळें त्यांना बरें वाटेल असें मला वाटलें. आम्ही ऑर्कनीजला थांबलों. पाषाण युगांतील स्कारा ब्रे हें खेडें पाहावयासाठीं आम्हीं गेलों. अरुंद, लांबच लांब असलेल्या जिन्यानें आम्ही खालीं उतरलों. एके ठिकाणीं दोन भिंतींमधल्या चिंचोळ्या भागांत मी अडकलें. मला वळतांहि येईना नि खालीं उतरतांहि येईना. सुदैवानें कोणीतरी येऊन मला सोडविलें. त्या दगडांत कोरलेल्या घराचें छप्पर इतकें खालीं होतें कीं, घरांत वांकूनच उभें राहावें लागे. त्या दगडांत पलंग, कपाटें, कपडे ठेवण्याचे कप्पे, दागिने सुरक्षित ठेवायच्या जागा, शस्त्रागारें ज्या कौशल्यानें कोरून काढलीं होतीं तें कौशल्य पाहून आम्ही थक्क झालों. मासे खारवून ठेवायची त्यांची जागाहि मीं पाहिली. मध्येंच शेकोटीची जागा होती व तिच्यांतला धूर जाण्यासाठीं वर एक भोंक पाडलेलें होतें.

आम्हीं निघालों, तेव्हां त्या समुद्रप्रवासाचा आनंद मनमुराद लुटायचा निश्चय बाईंनीं केला होता. पण समुद्राच्या पाण्यावर पडलेलें ऊन त्यांना सहन होईना. म्हणून त्या डेकवरून खालीं जात व पडून राहात. शेटलंडमधील वातावरणाचा आस्वाद घ्यायला तरी त्या बऱ्या होतात कीं नाहीं, अशी मला शंका वाटत होती. पण त्या बऱ्या झाल्या व आमच्याबरोबर फिरल्या.

भावना बाई माझ्याशीं बोलून दाखवीत. त्या म्हणत, अंतर्यामीं होणारे हे बदल आमच्या बाह्य, दृश्य जीवनांतहि बदल करतात. जुन्या जखमा भरून निघतात. हृदयांत नव्या आशा जन्माला येतात. हृदयांतून निघणारी अंतःचक्षूंची दृष्टि अधिक तेजस्वी होते. बाई पुन्हा आनंदानें हंसूं लागल्या, येणाऱ्यांचा पाहुणचार करूं लागल्या. पॉलीचीं माणसें आमच्याकडे नेहमीं येत असत. डॉ. व मिसेस् लव्ह, मि. ईगर आणि अनेक सुहृद आमच्याकडे कित्येक दिवस येऊन राहिले. भोंवतालच्या गांवीं राहणारे स्नेही सुद्धां बाईंना आनंदी ठेवण्यासाठीं कांहींतरी करीत असत. खरोखर, असें प्रेमरूपी औषध आयुष्यांत क्वचित्च मिळतें.

मी, पॉली व तिचा भाऊ बाईंना घेऊन ऑर्कनीज आणि शेटलंड पाहायला जहाजानें गेलों. त्यामुळें त्यांना बरें वाटेल असें मला वाटलें. आम्ही ऑर्कनीजला थांबलों. पाषाण युगांतील स्कारा ब्रे हें खेडें पाहावयासाठीं आम्हीं गेलों. अरुंद, लांबच लांब असलेल्या जिन्यानें आम्ही खालीं उतरलों. एके ठिकाणीं दोन भिंतींमधल्या चिंचोळ्या भागांत मी अडकलें. मला वळतांहि येईना नि खालीं उतरतांहि येईना. सुदैवानें कोणीतरी येऊन मला सोडविलें. त्या दगडांत कोरलेल्या घराचें छप्पर इतकें खालीं होतें कीं, घरांत वांकूनच उभें राहावें लागे. त्या दगडांत पलंग, कपाटें, कपडे ठेवण्याचे कप्पे, दागिने सुरक्षित ठेवायच्या जागा, शस्त्रागारें ज्या कौशल्यानें कोरून काढलीं होतीं तें कौशल्य पाहून आम्ही थक्क झालों. मासे खारवून ठेवायची त्यांची जागाहि मीं पाहिली. मध्येंच शेकोटीची जागा होती व तिच्यांतला धूर जाण्यासाठीं वर एक भोंक पाडलेलें होतें.

आम्हीं निघालों, तेव्हां त्या समुद्रप्रवासाचा आनंद मनमुराद लुटायचा निश्चय बाईंनीं केला होता. पण समुद्राच्या पाण्यावर पडलेलें ऊन त्यांना सहन होईना. म्हणून त्या डेकवरून खालीं जात व पडून राहात. शेटलंडमधील वातावरणाचा आस्वाद घ्यायला तरी त्या बऱ्या होतात कीं नाहीं, अशी मला शंका वाटत होती. पण त्या बऱ्या झाल्या व आमच्याबरोबर फिरल्या.

आम्हीं परत फिरलों नि ऑर्कनीजच्या मार्गानें आलों. ऑर्कनीज-जवळून जात असतां बाईंचा चेहेरा आकस्मिकपणें आनंदी दिसूं लागला. समुद्रावर मोठमोठ्या छाया फेंकीत सूर्य मावळूं लागला होता. तो बुडेपर्यंत त्या तें दृश्य पाहात राहिल्या. बाईंनीं आपल्या नजरेनें टिपून आपल्या हृदयांत सांठवलेलें तें शेवटचें दृश्य होतें. त्यांच्या अंतरींच्या प्रकाशाचें तेजस्वी वलय आम्हांला त्यांचेभोंवतीं दिसत होतें. पण दृष्टीनें बघण्याचें त्यांचें भाग्य लोपलें. त्यांची दृष्टि गेली. त्यांना अंधत्व आलें. त्यांचें स्वातंत्र्य गेलें. तें स्वातंत्र्य सम्राज्ञीच्या सिंहासनापेक्षां त्यांना अधिक मोलाचें वाटत होतें !

हिंवाळा आला. बाईंची प्रकृति सुधारली नाहीं, हें माझ्या लक्षांत आलें. म्हणून मीं एक वर्षाची सुटी मागितली व फाऊंडेशननें ती दिली. त्या जुन्या घरांत आम्हीं राहूं लागलों. मलासुद्धां आतांपर्यंत विश्रांति कधींच मिळालेली नव्हती. फाऊंडेशनच्या कामास मीं आनंदानें स्वतःला वाहून घेतलें होतें. पण लेख, पुस्तकें, प्रवास, करमणुकीचे कार्यक्रम, भाषणें ह्यांनीं बाईंच्या व माझ्या प्रकृतीवर अतिशय ताण पडला होता. माझ्या मनांत बाईंच्या प्रकृतीची व डोळ्यांची काळजी कायम ठाण देऊन बसली होती. दक्षिणेंतल्या प्रशस्त शेतावर जन्म घेतलेल्या व वाढलेल्या मला न्युयॉर्कचें आयुष्य व प्रसिद्धि मानवण्यासारखी नव्हती. स्कॉटिश डोंगरमाथ्यावर आणखी राहावयास मिळावें अशी मला तीव्र इच्छा होती. जेव्हां आम्हांला एक वर्ष रजा दिल्याचें फाऊंडेशनचें पत्र मिळालें तेव्हां अगदीं मनासारखें घडत असल्याचा आनंद मला झाला. मी मग तासचे तास त्या रानांत गवतावर लोळत पडे. खूप लिहून झालें कीं, सर्व विचार थांबवून शांतपणें पडून राहण्याची डब्ल्यू. एच्. हडसन ह्यांची संवय लावून घ्यायचा मी प्रयत्न करूं लागलें. कांहीं प्रमाणांत मला यशहि आलें. माझें मन शांत, पुनः ताजेतवानें होऊं लागलें. माझीं थकलेलीं गात्रें पुन्हा जिवंत होऊं लागलीं. मला वाटे, त्या वनसराईचें आणि छोट्या ऑरिन नदीचें सौंदर्य ओठांनीं टिपून घ्यावें. ऊन पडल्यामुळें हृदयाला आनंदाची सुखद ऊब वाटूं लागली.

पण हिंवाळ्याचीं पाऊलें ऐकूं येऊं लागलीं होतीं. अपंगत्वाची असहाय्यता बाईंच्या हृदयाला वेदना देऊं लागली. ख्रिसमससाठीं आम्हीं ग्लासगोला गेलों व कांहीं आठवडे तेथेंच राहिलों. डॉ. लव्ह ह्यांनीं निष्णात डॉक्टरांचे उपचार बाईंना कळविले. आमच्यावर अंतःकरणापासून प्रेम करणाऱ्या सुहृदांनीं आम्हांला आपल्या प्रेमाच्या उबदार पांघरुणांत झांकून टाकलें. पण नशिबानें सर्व प्रयत्न अयशस्वी केले. बाईंना बरें वाटेना. आम्ही खिन्न मनानें साऊथ अर्कानला परत गेलों. वर्षभर बाईंना झालेल्या काळपुळीचा त्रास होत होता. खरं म्हटलं तर पॉलीलाहि विश्रांति हवी होती. पण ती सतत बाईंची शुश्रूषा करायची, त्यांना वाचून दाखवायची, घरकाम करायची आणि आमच्या कुत्र्यामागें धांवपळ करायची. माझी टेरियर कुत्री व शेटलंड कॉली कुत्रा नेहमीं सशांच्या शिकारीसाठीं हुंदडत फिरायचे. शिकारीसाठीं भटकून भटकून थकले कीं, ते दोन्ही उनाड कुत्रे घरीं येत, उडी मारून बाईंच्या अंथरुणावर बसत आणि त्यांचेबरोबर जेवत. त्या दोघांच्या सोबतीशिवाय ते हिंवाळ्याचे दिवस पार पडले नसते असें बाई म्हणाल्या.

जेव्हां बाईंना बरें वाटे तेव्हां त्या मी 'टॉवर' नियतकालिसाठीं लिहीत असलेल्या लेखांचे विषय सुचवीत. मी त्यांचें पहिलें चरित्र लिहीत होतें. तेंच हस्तलिखित आमचें वेस्टपोर्टचें पहिलें घर जेव्हां जळालें तेव्हां त्यांत अग्निमुखीं पडलें. व्यवहारी जगाच्या दाहकतेला भिऊन लपून बसणारे विचार आतां ह्या विश्रांतीचे काळांत रात्रंदिवस त्यांच्या मनांत येत. अतिशय हळुवार मनानें बाई आपल्या सर्वांच्या हृदयांत जन्माला येणाऱ्या उदात्त शक्तींचा आवाज ऐकत होत्या. ही उदात्तता आपल्या सर्वांच्या हृदयांत तयार होते, पण आपलें व्यवहारी जग त्यांचा नाजूक आवाज आपल्यापासून झाकून टाकीत असते. स्वतःला व्यथित करणारे विचार बाई बाजूला करीत — दुसऱ्याला होणाऱ्या व्यथेचा अधिक विचार करीत. ह्या मनोवस्थेंत त्यांनीं तो हिंवाळा घालवला. न्युयॉर्कच्या हिंवाळ्याचे मानानें ह्या वर्षीच्या हिंवाळ्याचे दिवस थोडे होते. परंतु हवा दमट होती, धुकें दाट होतें, शरीराला चावे घेणारी थंडी होती. बर्फ फारसें पडलें नाहीं तरी थंडीनें गारठलेल्या मेंढरांचें नि गुरांचें ओरडणें ऐकूं येत असे.

वसंताच्या सुरुवातीच्या दिवसांत बाई माझ्या मदतीनें कांहीं पाऊलें टाकूं शकत होत्या. फुलांच्या फुललेल्या ताटव्यांतून आम्ही चाललों कीं त्या फुलांना स्पर्श करीत म्हणत, " हेलेन, ह्या फुललेल्या ताटव्यांतून तुला चालायला मिळतं, तूं खरी भाग्यवान् आहेस." त्यांना बरें वाटलें कीं आपल्या स्नेह्यांना त्या उपाहारासाठीं घरीं बोलवीत व गप्पांच्या नि आनंदाच्या भरांत आमचे कित्येक तास भरकन् उडून जात. पण माझ्या हृदयांत मात्र भविष्याची कृष्णछाया पसरत होती.

' बोलक्या पुस्तकां'चा शोध लागल्याचें फाऊंडेशननें जाहीर केलें व अंधांना अमोल ठरणारें हें ज्ञानभांडार तयार करणारीं यंत्रें बनविण्यासाठीं लागणारा पैसा उभारण्याचे कामासाठीं मला आमंत्रण पाठविलें. प्रौढ अंधांना ह्यामुळें करमणुकीचेद्वारां शिक्षण देण्याचें उत्तम साधन हातीं आल्याचें बाईंच्या लक्षांत आलें. प्रौढांना ब्रेल लिपी शिकणें कठीण होतं व त्या लिपींतलें साहित्य वाचतांना ते कंटाळत. हीं यंत्रें तयार करण्यासाठीं पैसा उभारण्याचा आग्रह बाईंनीं मला केला. पुढील हिंवाळ्यांत मीं तें काम केलें, पण बाईंचें समाधान झालें नसल्याची जाणीव मला झाली. मीं जो निधि उभारण्याचें कार्य हातीं घेतलें होतें तो निधि पुरा व्हायला त्यांना हवा होता. शिवाय जे आंधळे बहिरेहि होते त्यांचेसाठीं कांहींच करण्यांत येत नाहीं, म्हणून त्या निराश होत. ह्या जबाबदारीखालीं मी वाकलें आहें हें त्यांना ठाऊक होतें. फॉरेस्ट हिल्समध्यें राहात असतांना आणखी एका अंध व बहिऱ्या असलेल्या जीवाला शिकवायचा त्यांचा विचार होता. केंटकींतील ल्यूसवेल येथें एक आंधळें व बहिरें बालक सांपडलें. तें बालक पाळायचें त्यांच्या मनांत होतें. पण त्यांच्या प्रकृतीची पूर्ण कल्पना असल्यानें त्यांनीं तसें करूं नये म्हणून त्यांना समजावतां समजावतां आम्हांला नकोसें झालें. तरीहि अपंगाला साहाय्य करण्याच्या त्यांच्या इच्छेची ज्योत त्यांच्या हृदयांत तेवतच राहिली. अंधत्वांत त्या ज्योतीचा प्रकाश पडे. त्या मला जगभर पसरलेल्या अंधबहिऱ्यांना मदत करण्याची सतत आठवण देत. त्या म्हणत, " त्यांना पोटाशीं घे, त्यांच्याशीं एकरूप होऊन स्वतःला विसर, निष्ठेनें त्यांच्या कल्याणासाठीं झटत राहा. हेलेन, हेंच माझें खरें स्मारक तूं उभारूं शकशील. तुला त्यांचेपासून दूर ठेवणारी एकादी भिंत मध्यें उभी

असेल. पण ती भिंत पाडून टाक, तिचा दगड अन् दगड खणून काढ. मग हें करीत असतांना फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या परिचारिका अतिश्रमानें जशा मरून पडल्या तसा हवा तर तुझा शेवट होऊं दे. ”

खूप कामें अजून व्हायचीं राहिलीं होतीं. बोलक्या पुस्तकांच्या यंत्रांसाठीं निधि जमा करण्याचें काम चालू होतें व त्यासाठीं न्युयॉर्कहून मला सभांचीं, चहापानांचीं आमंत्रणें येत. पुन्हा पॉलीला व मला बाईंना सोडून जावें लागलें. मी कधींहि त्यांचेजवळ बसलें कीं कांहीं महत्त्वाच्या कामाकडे दुर्लक्ष करून तर मी हें सुख उपभोगीत नाहीं ना अशी शंका माझ्या मनांत येई. त्यांच्या खोलीला लागूनच माझी अभ्यासिका होती, पण त्या अभ्यासिकेंत बसल्यावर आम्हा दोघींत खूप अंतर आहे असें मला वाटे. आतां बाईंना एकट्या सोडून जायची गरज नव्हती. हर्बर्ट हाव नांवाचा एक तरुण आमच्याकडे राहायला आला होता. तो हंसरा, खेळाडू, विनोदी आणि हरकामी होता. आम्ही घरीं नसलों कीं तो बाईंची करमणूक करी. लवकरच तीं दोघें एकमेकांवर मनापासून प्रेम करूं लागलीं. पुढें आमच्याच घरांत एका खोलींत तो राहूं लागला व खरेंखुरें घर मिळाल्यामुळें त्याला जो आनंद झाला तो अवर्णनीय होता. त्याचे आईबाप वारले होते. त्याचे वडील संगीततज्ज्ञ होते आणि त्याची आई परिचारिका होती. हलुवार हातानें शुश्रूषा करण्याचें तो आपल्या आईपासून शिकला होता. बाईंना त्याचा हा गुण फार आवडे. तो घराची सर्व व्यवस्था पाहूं लागल्यामुळें पॉलीच्या डोक्यावरचें जबाबदारीचें बरेंच ओझें कमी झालें. आमच्याजवळ मोटर असली कीं तो ती चालवी, पत्रव्यवहार पाहूं शके, टाइपरायटर व माझें ब्रेल लिपी लिहिण्याचें यंत्र तो दुरुस्त करी. माझ्या हातावर स्पेलिंग करायला नि ब्रेल लिपी लिहायलाहि तो शिकला. त्यामुळें माझे लेख तो ताबडतोब लिहून काढूं शके. कुत्र्यांनासुद्धां तो फार आवडायचा. बाईंच्या दृष्टीनें आणखी कांहीं महत्त्वाचें नव्हतें. तो हुशार, प्रामाणिक व उत्तम कार्यकर्ता होता नि फटकळ बोलण्यानें नि चेष्टेखोरपणानें तो सगळ्यांना हवाहवासा वाटे.

पॉलीनें व मीं बोलक्या पुस्तकांचेसाठीं निधि जमवायला सुरुवात केली व उदारपणें मदत करण्यासाठीं अनेकांना विनंती केली. प्रसिद्ध तत्त्वज्ञ

आणि विनोदाचार्य विल रॉजर्स ह्यांनीं रेडिओवर आमची विनंती ध्वनिक्षेपित केली. मिसेस विल्यम मूर ह्यांनीं मोठी देणगी माझ्याकडे पाठविली. इतर देणगीदारांच्या साहाय्यानें फाऊंडेशननें एक प्रयोगशाळा उघडून त्या यंत्रांची उपयुक्तता पटवण्यासाठीं प्रयोग केले व ते यशस्वी ठरून सरकारनें बोलकीं पुस्तकें आणि कोरीव अक्षरांनीं लिहिलेल्या साहित्याच्या उत्पादनासाठीं मोठी रक्कम मंजूर केली.

१९३५ च्या वसंतांत अनेक उपाधींवर इलाज करण्यासाठीं न्युयॉर्कच्या डॉक्टर्स हॉस्पिटलमध्यें बाई गेल्या. त्यांना शांततेची अतिशय आवश्यकता असल्याचें आम्हांला सांगण्यांत आलें. अधून मधून मला कांहीं मिनिटेंच त्यांच्याशीं बोलायला मिळे. कारण माझ्या कामांत त्या लक्ष घालीत नि मग त्याचा त्यांचेवर ताण पडे. त्या पुऱ्या थकल्या होत्या. अंधत्वाविरुद्ध त्यांनीं पुकारलेलें बंड अयशस्वी ठरलें होतें. “ एकाद्या अवखळ मुलासारखीं मी वागलें ” त्या मला म्हणाल्या, “ मीं चंद्रासाठीं हट्ट धरला. त्या हट्टाच्या भरांत प्रत्येक अपंगाला वागविण्यांत आपल्या धैर्याची कसोटी लागते हें माझें स्वतःचेंच तत्त्व मीं मोडलें.” पुष्कळदां त्यांचे मनांत अनेक कल्पना येत नि मीं त्या लिहून काढाव्यात असें त्यांना वाटे. पण मी भेटून त्या लिहिण्यापूर्वींच त्या विसरून जात व पुन्हा त्या त्यांना आठवत नसत. आपल्या हृदयांतील विचारांना वाट करून देण्याचा किंवा सुंदर कल्पना शद्बांत उतरविण्याचा मार्ग बंद होण्याची शिक्षा बिचाऱ्या बाईंना अंधत्वापेक्षां अधिक अवघड वाटे.

त्या उन्हाळ्यांत मी, पॉली व हर्बर्ट बाईंना घेऊन ‘कॅट्स्किल्स्‌ला’ गेलों. तेथें वृक्षांच्या छायेंत, पर्वतांच्या सान्निध्यांत आणि तळ्यांच्या किनारीं त्या मनःशांति शोधूं लागल्या. पुन्हा जीवनेच्छेनें त्यांच्या शारीरिक क्षीणतेवर जय मिळविला. त्यांना बरें वाटावें म्हणून पाहुणे बोलावून गप्पागोष्टींत आनंद मानण्याचा प्रयत्न मीं व पॉलीनें केला. आमचेकडे आलेल्या पाहुण्यांत फाऊंडेशनचे अध्यक्ष मि. मिगेल आणि डॉ. बेरेन्स हे होते. मासे मारण्यांत आम्ही बराच वेळ रमत असूं, पण बाई आमच्याबरोबर येऊं शकल्या नाहींत. माझ्या ‘ माय रिलिजन ’ पुस्तिकेपेक्षां सामान्य वाचकाचे

दृष्टीनें अधिक योग्य पुस्तिका लिहिण्याचा बाईंनीं आग्रह केल्यामुळें मीं ' पीस ॲट इव्हनटाइड ' ( Peace at Eventide ) ही पुस्तिका लिहिली.

बाई बऱ्या झाल्या नाहींत. अस्वस्थतेनें त्यांना ग्रासून टाकलें होतें. त्यांची धाडशी वृत्ति घातक ठरत होती. ' पोर्टो रिको ' बद्दल त्या सारख्या बोलत असत. तिथें पुन्हा जाण्याची इच्छा त्यांनीं बोलून दाखविली. ऑक्टोबर १९३५ मध्यें वेस्टइंडीजमध्यें जमैकाला जाण्यासाठी आम्ही निघालों. हें बेट खूप सुंदर होतें. त्यावरील हिरवीगार झाडी, नारळी–पोफळीचीं झाडें, तुटलेले डोंगर, आणि जुनीं प्रेक्षणीय मंदिरें ह्यांतहि बाईंचें मन रमलें नाहीं. पोर्टो रिकोबद्दल त्यांना जें आकर्षण वाटत होतें तें ह्या बेटाबद्दल त्यांना वाटेना. आणि त्या कितीतरी थकल्या होत्या !

मृत्यूपेक्षां वृद्धापकाल वाईट ह्या भावनेनें त्यांच्या मनांत ठाण मांडलें होतें. कारण चटकन् मृत्यु येण्यापेक्षां जीवनांतलें चैतन्य हळुहळू नाहींसें होणें अधिक दुःखप्रद असतें. आपल्या परावलंबित्वाचें त्यांना फार दुःख होई व अंधत्वामुळें त्यांना आपला वृद्धापकाल अधिक जाणवे. पण त्यांच्यावरील खरी आपत्ति ही नव्हती असें मला वाटतें. खरी आपत्ति ही होती कीं लहानपणीं त्यांना अधिक स्वतंत्रपणें राहण्यास, दुसऱ्याचा योग्य सल्ला मानण्यास आणि आपल्या अधू दृष्टीचा वापर बेतानें करण्यास कोणीं शिकविलें नाहीं किंवा तशी मनोवृत्ति त्यांच्यांत तयार झाली नाहीं. शरीर आणि मन वृद्ध होणें ही आपत्ति आहे हें त्यांचें मत मलाहि मान्य होतें. पण गरिबीच्या मगरमिठींत न सांपडलेले पुष्कळ तथाकथित तरुण जीवहि पुष्कळदां अगदीं टाकावू झालेले असतात ह्याची मीं त्यांना जाणीव दिली. मी पुष्कळदां म्हणे,

The wise want love, and those who love want wisdom,
And all best things are thus coufused to ill

" जे विचारांनीं आणि मनानें संकुचित असतात अशांना, मग ते तरुण असोत कीं वृद्ध असोत, केवळ रूढी आणि परंपरा म्हणून मानवी व्यवहारावर सत्ता गाजवूं देऊं नये. " मी बाईंना म्हणालें, " बाई, तुम्हीं परिस्थितीवर मिळविलेला विजय हें सर्व विचारी स्त्री–पुरुषांना एक प्रचंड आव्हान आहे. जर प्रगति अडविणाऱ्या निराशावादाचा

किंवा आंधळ्या आशावादाचा कचरा झटकून टाकला तर जिवंत हृदयाचें, सत्याप्रत नेणारें आणि ध्येयवादी नवें जीवन निर्माण करण्याचें अधिक सामर्थ्य येईल ह्याची साक्ष तुमचें यश आहे. ”

“ तें कांहीं मला निश्चितपणें सांगतां येत नाही हेलेन ” बाई म्हणाल्या, “ पण तुझ्या मनाला सारें ऐकायला येतें नि दिसतें. त्याच्या साहाय्यानें तूं ह्या कार्यांतील तुझें आघाडीवरचें स्थान टिकवून ठेवशील अशी मला आशा वाटते. ”

पुन्हा फाऊंडेशनच्या निधी जमविण्याचे कामांत मी व पॉली अडकलों. आम्ही घरीं क्वचितच असूं. असेंच एकदां घरीं आलों असतां जपानमधील अंधविमोचन चळवळीचे नेते टाकेओ इवाहाशी आम्हांला भेटायला आले. अंधविमोचन कार्यांत अमेरिकेंत वापरण्यांत येणाऱ्या पद्धतींचा अभ्यास करण्यासाठीं ते अमेरिकेला आले होते. त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व पाहून आम्ही आश्चर्यानें थक्क झालों. ते स्वत: अंध होते. पण त्यांच्या हृदयांत जणुं उत्साहाची ज्वलन्त ज्योत तेवत होती. जपानमध्यें जाऊन तेथील अंधांच्या जीवनांत मीं प्रकाशकिरण आणावेत असा त्यांनीं मला आग्रह केला. बाईंना त्यांना भेटण्याइतकेंहि बरें वाटत नव्हतें. बाईंच्या प्रकृतीची अवस्था मीं त्यांना समजावून सांगितली व बाईंना सोडून जाणें मला शक्य नसल्याचें सांगितलें. जेव्हां आमच्या भेटीची बातमी बाईंच्या कानावर गेली व टाकेओंनीं मिळविलेलें यश त्यांना कळलें तेव्हां त्या म्हणाल्या, “ ही संधि तूं फुकट घालवूं नयेस हेलेन.”

“ पण तुमच्याशिवाय मी जाणार नाहीं बाई, ” मी म्हणालें, “ नि तुम्हांला येणें अशक्य असल्यानें मी हें आमंत्रण स्वीकारूं शकत नाहीं. ”

“ हेलेन ” बाई आग्रहानें म्हणाल्या, “ मी मेल्यावर तूं आणि पॉली जपानला जाऊन तेथील अपंगांच्या काळोख्या विश्वांत प्रकाश आणाल असें वचन मला दे. ”

“ आम्ही प्रयत्न करूं.” मी म्हणालें, “ पण ह्या अपरिचित क्षेत्रांत उडी घेण्याचा विचार निदान आज तरी मी करूं शकत नाहीं. ”

आपल्या डोळ्यांचें ऑपरेशन करण्याचा आग्रह बाई डॉ. बेरेन्सना करीत होत्या. ऑपरेशनमुळें कांहींहि फायदा होणार नाहीं असें डॉक्टरांनीं बाईंना स्पष्ट सांगितलें. पण बाईंनीं डॉक्टरांचे गळ्याला मिठी मारली आणि रडत रडत ऑपरेशन करायचा आग्रह केला. त्यांनीं कबूल केलें. पण त्यांचें म्हणणें बरोबर होते. ऑपरेशनचा कांहींच उपयोग झाला नाहीं. निराश, व्यथित, आणि अस्वस्थ बाईंकडे बघून माझ्या हृदयाचें पाणी पाणी होई. त्या हॉस्पिटलमध्यें असतांना अलेक्झांडर वूलकॉट त्यांना सुंदर सुंदर पत्रें लिहीत व सुवासिक फुलांचा गुच्छ पाठवीत. त्यांच्या लहरीपणाचें आणि विनोदबुद्धीचें बाईंना भारी कौतुक वाटे. पण आमच्या फॉरेस्ट हिल्सच्या घरीं जेव्हां ते बाईंना पहिल्यानेंच भेटायला आले तेव्हां बाई किती लाजल्या तें मला आणि पॉलीला चांगलें आठवत होतें. अशा हुशार, प्रसिद्ध आणि उमद्या पुरुषाला आपल्याबद्दल एवढें आकर्षण कां वाटावें तें त्यांना कळेना. पण ते मात्र आग्रहानें बाईंशीं बोलत बसत नि त्यांना वाचून दाखवीत. हळुहळू बाईंचा संकोच कमी झाला व त्या त्यांचेशीं मोकळेपणानें वागूं लागल्या. बाईंचें व्यक्तिमत्व स्पष्ट करून सांगणाऱ्या थोड्या व्यक्तींपैकीं मि. वूलकॉट होते. त्यांच्याबद्दल मला आपलेपणा वाटतो.

आपण बऱ्या होत नाहीं ह्याची जाणीव होऊन बाईंनीं पॉलीला उन्हाळ्याचे दिवस घालविण्यासाठीं एखादी जागा शोधून काढण्यास सांगितलें. लॉरेंटियन डोंगरावरील ' ला कॉर्निश ' गांवीं हर्बर्ट आम्हांला घेऊन गेला. क्वेबेकपासून कांहीं अंतरावर हें गांव होतें. प्रवासाचा शीण बाईंना सहन झाला नाहीं. त्यांना अंथरुणांतच पडून राहावें लागे. आमची जागा एका झाडींत होती व तेथून आम्हांला तळें स्पष्ट दिसे. हर्बर्टनें एक शब्दहि न बोलतां आणि खर्चाची पर्वा न करतां त्या झाडींतून मला आणि आमच्या कुत्र्यांना जातां येईल असा एक छोटासा रस्ता तयार केला. त्या जागेच्या सौंदर्यानें माझें अंतःकरण व्यथित होई. कारण तें सौंदर्य मला बाईंना सोडून एकटीला पाहावें लागे. आम्ही दोघी एकत्र असल्याशिवाय कुठलेंहि सुख पूर्णपणें आम्हांला उपभोगतां येत नाहीं ह्याची जाणीव त्यांना झाली नव्हती. आजूबाजूला पसरलेलें सौंदर्य आपल्याला नि मला उपभोगतां येत नाहीं ह्याचें त्यांना आश्चर्य वाटे. त्या मला म्हणाल्या, " हेंच तर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
माझगांव मुंबई वि: ११९
क्रमांक नों: दि:

आपल्याला हवें होतें नाहीं का? इतर सारें विसरून वनश्रीनें नटलेल्या सौंदर्याचा आस्वाद उच्छृंखलपणें घेण्याचेंच मनमुराद स्वातंत्र्य आपल्याला हवें होतें." त्याच असले शब्द बोलू जावोत! माझा वाढदिवस आम्ही त्यांच्या खोलींतच साजरा केला. तोंडावर मीं कितीहि आनंद दाखविला तरी आंतून मला वाटत होतें कीं बहुधा बाईंच्या सहवासांत साजरा होणारा हा माझा शेवटचाच वाढदिवस असावा! घरीं परत जाऊन कसेंतरी जगण्याची मनाची तयारी केली पाहिजे असें त्या मला म्हणाल्या.

पण त्यांच्या त्या शब्दांनीं मी फसलें नाहीं. मृत्यूचे हात त्यांच्या बाजूनें सरकत असल्याचें माझ्या लक्षांत आलें. अंधत्व आलें तेव्हांच बाईंची जगण्याची इच्छा नाहींशी होईल असें मला मनांतून वाटत होतें. पण हल्लीं त्या अजिबात बोलत नसत. मला मनांतून त्यांच्याशीं खूप खूप बोलावंसं वाटे पण जीवनाचा जो दरवाजा त्यांनीं बंद केला तो आपण एकादेवेळीं मोडून उघडूं, ह्या भीतीनें मीं तसा प्रयत्न केला नाहीं. ऑगस्टमध्यें आम्ही सर्व न्युयॉर्कला परत आलों. कांहीं दिवस चॅथॅम हॉटेलमध्यें राहिल्यावर लॉंग आयलंड भागांत ग्रीनपोर्ट येथें समुद्रकिनारीं एक झोंपडी घेऊन आम्ही तिथें गेलों. उरलेले दिवस जगण्यासाठीं बाईंना शक्ति यावी ह्या दृष्टीनें शेवटचा प्रयत्न म्हणूनच आम्ही तेथें राहायला गेलों. एक दिवस त्या स्वत: चालत पाण्याजवळ गेल्याचें व पाण्यांत शिरल्याचें पाहून मला आश्चर्य वाटलें. खारें पाणी आपल्याला उचलून धरील असें बहुधा त्यांना वाटलं असावें. त्यांना एकदम भोंवळ आली आणि त्या खालीं पडल्या. आम्ही त्यांना जवळ जवळ उचलूनच झोंपडीत नेलें व झोपविलें. हुंदके देत त्या म्हणाल्या, "तुमच्यासाठीं जगायचा मी आटोकाट प्रयत्न करतें आहें." त्यांची जीवनज्योत मंद होत असली तरी त्यांची इच्छाशक्ति प्रज्ज्वलित होत होती हें माझ्या लक्षांत आलें. त्या इच्छाशक्तीच्या जोरावरच वेदना सहन करून माझ्या कामांत मला मदत, सल्ला देण्याचा त्या आटोकाट प्रयत्न करीत होत्या. पण दुसऱ्या दिवशीं त्यांना ॲम्ब्युलन्समध्यें घालून हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. जाण्यापूर्वीं त्या मला म्हणाल्या, "माझ्या अंधत्वाबद्दल दुःख करण्यांत मीं विनाकारण वेळ फुकट घालविला. मला त्याचं फार वाईट वाटतं. पण जें झालं तें झालं. माझ्या जीवनाच्या

प्याल्यांतलें हलाहल मीं चाखलें. पण तुझी ईश्वरावरील श्रद्धा दृढ असेल तर ईश्वर थोर, गंभीर आणि अमर विचार कधींहि नाहींसे होऊं देणार नाहीं. ”

हॉस्पिटलमध्यें डॉक्टरांनीं व परिचारिकांनीं आपल्याला फार आपलेपणानें वागविल्याचें त्यांनीं मला सांगितलें. एकदां मी त्यांना भेटायला गेलें असतां त्या मला म्हणाल्या, “ ह्या हॉस्पिटलमध्यें पडल्या पडल्या मला असें वाटतें कीं आपण ईश्वराचे चरणापाशीं आहोंत. ” जेव्हां करतां येण्यासारखे सर्व इलाज करून झाले तेव्हां आम्ही त्यांना घरीं घेऊन आलों.

त्यानंतरचे दिवसांत माझ्या हृदयाचें स्पंदनच बंद पडतें कीं काय असें मला वाटे. त्यांची लहर सतत बदले. त्या भारी निराश होत. माझ्या नि पॉलीच्या दुःखाची जणूं त्यांना जाणीवच नव्हती. कुणी त्यांची खोली व्यवस्थित लावली कीं त्या म्हणत, “ मृत्यु आतां माझ्यासाठीं येत आहे. त्याच्या स्वागतासाठीं सारें व्यवस्थित लावून ठेवा. ” मग नुकतेंच आपण काय बोललों तें सारें विसरून माझ्या कामाची व फाऊंडेशनच्या निधीसाठीं मला कांहीं मिळालें का त्याची चौकशी करीत. दुसऱ्याच क्षणीं त्या मला म्हणत, “ तूं तुझा पत्रव्यवहार जरा बाजूला ठेव नि मी जिवंत आहे तोंपर्यंत माझेजवळ राहा. ”—पण त्यांनीं मला तसें कधींच करूं दिलें नाहीं. एकदां मी त्यांच्याजवळ बसलें असतां कांहीं जरुरीच्या कामासाठीं फाऊंडेशनचा एक कार्यकर्ता माझेकडे आला. बाई त्यावेळीं अर्धवट शुद्धींत होत्या. पण त्यानें माझ्या हातावर स्पेलिंग करून मला काय सांगितलें तें मला मोठ्यानें त्यांनीं सांगायला लावलें. तो ओशाळला पण तो गेल्याबरोबर त्यानें सांगितलेलें काम ताबडतोब करावयास त्यांनीं मला सांगितलें.

बाईंच्या उदार हृदयाची आणि व्यथित अंतःकरणाची खरी ओळख त्यांच्या मृत्यूपूर्वीं एक आठवडा आम्हांला झाली. पॉलीच्या जागीं बाईंकडे बसण्यासाठीं परिचारिका आली. कां कोणास ठाऊक पण बाईंना वाटलें कीं पॉली आम्हांला सोडून जाणार ! “ पॉली, पॉली, तूं जाऊं नकोस ग !” असें ओरडत त्या धडपडत असतांनाच मीं बाईंना धरलें. पॉलीनें त्यांच्या

अंगावरून हात फिरवून त्यांचें सांत्वन करीत त्यांना सांगितलें, "मी तुमचा चहा आणायला खालीं जातेंय्." माझ्याकडे वळून बाईंनीं स्पेलिंग करून मला विचारलें, "पुढच्या उन्हाळ्यांत तुम्ही दोघी माझ्याबरोबर स्कॉटलंडला याल ?" ती सुंदर भूमि माझ्या हृदयांत कायमची येऊन बसली आहे. तिथें मला खरी शांतता मिळेल." मीं येण्याचें त्यांना वचन दिलें.

बाईंचा माझा परिचय सबंध जीवनभराचा. त्यांच्या ह्या व्यक्तिमत्वाचें अखेरचें दर्शन मला ऑक्टोबरमध्यें एका संध्याकाळीं झालें. त्या जाग्या होत्या अन् आराम खुर्चीवर बसल्या होत्या. आम्ही सारीं त्यांचेभोंवतीं बसलों होतों. हर्बर्ट त्यांना आपण पाहिलेल्या घोडदौडीची गम्मत सांगत होता नि त्या हंसत होत्या. हर्बर्ट जें सांगत होता तें सर्व त्या स्पेलिंग करून मला सांगत होत्या. त्यांचा हात प्रेमानें मला स्पर्श करीत होता. अमर्याद प्रेमाचा तो स्पर्श मला असह्य झाला. तो सुंदर, गोड स्पर्श ! त्या स्पर्शानें अंधाराचीं कवाडें फोडून मला बाहेरच्या जगाशीं संबंध जोडायचें भाग्य मिळालें होतें, समदु:खी जीवांचेबद्दल वाटणाऱ्या प्रेमाला त्या स्पर्शानें जन्म दिला होता, माझ्यांत नवें ज्ञान निर्माण केलें होतें. त्यानंतर त्यांची शुद्धि गेली. ह्या जगांत त्यांना पुन्हा जाग आली नाहीं.

ऑक्टोबर २१ ला बाईंच्या पार्थिव देहाचें दहन करण्यांत आलें. त्यांची रक्षा वॉशिंग्टनच्या नॅशनल कॅथेड्रलमध्यें ठेवण्यांत आली. मी व पॉली स्कॉटलंडला गेलों. पॉलीच्या भावानें माझें मन ताळ्यावर येईपर्यंत तीन महिने आम्हांला राहावयास लावलें.

मनुष्याच्या अमरत्वावरचा माझा विश्वास कधींच ढळला नाहीं. पण बाईंच्या मृत्यूनें माझें जीवन इतकें विस्कळित झालें कीं तें सुराळित मार्गावर येण्यासाठीं किती तरी महिने जावे लागले. नि अजूनहि पूर्णपणें मी तें करूं शकलें नाहीं. त्यांचा आत्मा भिन्न आहे ह्याची मला इतकी तीव्र जाणीव होती कीं त्या जशा आपल्या भावाला कवटाळून बसल्या होत्या तशा त्यांच्या ऐहिक अस्तित्वाला मी कधींच कवटाळलें नाहीं. त्या आज माझ्या हृदयांत जिवंत आहेत असें मी म्हणूं शकत नाहीं. अंध:कारांत नि नि:शब्दतेंत अडकून पडलेलें माझें व्यक्तिमत्व विकसित व्हावें म्हणून

ईश्वरानेंच त्यांना माझ्याकडे पाठविलें. मी देवाजवळ अधिक काय मागूं? माझें मागणें एकच आहे. देवा, तूं दिलेल्या देणगीची माझ्याकडून नीट कदर व्हावी म्हणून माझ्यांत अधिक पात्रता निर्माण कर. ग्रीक पुराणांत मिलिगरची एक गोष्ट आहे. त्याचें आयुष्य त्याच्या आईनें जळत ठेवलेल्या मशालीवर अवलंबून होतें. एकदां रागाच्या भरांत त्याच्या आईनें ती मशाल विझवून टाकली अन् तो ठार मारला गेला. मी मेलें नाहीं, पण माझ्यांतली सारी शक्ति नष्ट झाल्यासारखें मला वाटूं लागलें. मला जीवनांतला प्रकाश दाखविणारी, मला मधुर संगीत ऐकविणारी, जीवनांतल्या वैभवाचें दर्शन घडविणारी माझ्या बाईंची प्रकाशज्योत विझली होती. भाषा समजण्याची देणगी त्यांनीं मला दिली. ती देणगी माझ्या हातांत अजूनहि होती. पण त्या ज्ञानाला प्रदीप्त करणारी गूढज्योत विझली होती. माझ्याजवळ सदैव राहणारी, माझ्या जीवनावर पसरूं पाहणाऱ्या कृष्णछाया दूर करणारी शक्ति नष्ट झाली होती. त्या कृष्णछाया दूर हांकलून देण्याची शक्ति माझ्यांत तेव्हां नव्हती. पॉली नि मी ‘आसामा मारु’ बोटीनें जपानला गेल्यावर तेथें नव्या कार्याची ज्योत माझ्या अंतःकरणांत प्रज्ज्वलित झाली नि तिनें सारा अंधःकार दूर केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 22683
संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि: ..........
नों: दि: ..........
क्रमांक ..........
REFBK-0008893

आपली प्रत राखून ठेवा !

## केल्यानें होत आहे रे !

प्रगति नेहमींच अंतःस्फूर्तीतून आणि सामुदायिक कार्यांतून होते. हें सत्य जगांतल्या सर्वांत संपन्न देशांतही खरें ठरलें आहे.

खेडयांतील जनतेच्या कार्याची ओळख करून देणारें हें पुस्तक अवश्य वाचा.

किंमत दीड रुपया.

## मुक्ता आणि इतर गोष्टी.

अंबादास अग्निहोत्री यांच्या लेखणींतून उतरलेलीं महाराष्ट्रीय स्त्री जीवनाचीं चित्रें.

सर्व प्रमुख वृत्तपत्रांनीं वाखाणलेला हा कथासंग्रह आपल्या संग्रहीं अवश्य हवा.

आजच आपली प्रत मागवा.

**कैलास प्रकाशन** **किंमत तीन रुपये.**

माणिक भुवन,
आग्रारोड, ठाणें.